# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



## अनुक्रमणिका


**4**
सुरुवातीचे–
**पक्ष फोडून संपत नसतो!**
– जयंत पाटील



**5**
प्रबंध संपादकीय–
**नव्या उमेदीने उभे राहूया**
– दिलीप वळसे पाटील



**6**
संपादकीय–
**बोक्याचे स्वप्न अर्धवटच...**
– डॉ. सुधीर भोंगळे

**12**
शरद पवार यांची पत्रकार परिषद
पक्षांतरासाठी केंद्र व राज्य सरकारकडून सत्तेचा गैरवापर
– शरद पवार



**22**
वास्तवाशी संबंध नसलेली धोरणदृष्टी
– अभय टिळक



**36**
अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पासंबंधी...
१) संकल्प दिवाळखोरीचा...
२) एक हुकलेली संधी..40
३) उदंड स्वप्नात वास्तव कुठे?–44
४) अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर...50
– डॉ. सुधीर भोंगळे



**54**
मोदी सरकारची अति घाई अपघाताला निमंत्रण देई?
– आकाश, नवी दिल्ली

**64**
भाजपा–शिवसेनेत गेलेल्या राष्ट्रवादीतील गद्दारांविषयी विशेष लेख
नियतीचा संकेत
– मुकुंदानंद



**74**
चव्हाटा (राजकीय विनोदी किस्से)
– घंटाकर्ण



**84**
देवसाने–मांजरपाडा जलपूजन समारंभ
महाराष्ट्राच्या धरतीवरचे पडलेले पाणी अडवा
– छगन भुजबळ




**88**
मराठवाड्याच्या दुष्काळाची दाहकता सांगणारी 'खजाना बावडी'
– डॉ. सतीश साळुंखे



**94**
लोकसभेतील भाषण
पिक विमा योजनेमुळे खासगी विमा कंपन्यांचेच उखळ पांढरे
– डॉ. अमोल कोल्हे



**102**
शेवटचे पान... सज्जनांची निष्क्रियता अधिक घातक
– हेमन्त टकले





**संचालक**
हेमन्त टकले

**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील

**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६

**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर

**सजावट व मांडणी**
दिलीप रोडे

**छायाचित्रे**
प्रशांत चव्हाण

**वर्गणीचे दर–**
वार्षिक रु. ५००/–

**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.

www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने
मीडिया आर ॲण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३,
सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप,
कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७
येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.


**संपादक–**
डॉ. सुधीर जगन्नाथ भोंगळे

# पक्ष फोडून संपत नसतो!

आपल्या पक्षातली माणसे त्यांच्या पक्षात ओढून घेण्याची भाजप-सेनेमध्ये स्पर्धा चालू आहे. जिथे त्यांच्याकडे सक्षम उमेदवार नाहीत तिथे काँग्रेस-राष्ट्रवादीतले नेते पैशाची, सत्तेची, तिकीटाची, मंत्रीपदाची लालूच दाखवून ओढून घेतले जात आहेत. स्वेच्छेने जर ते येण्यास तयार नसतील तर सत्ताधारी पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद, धमक्या, धाकदपटशा जेवढे म्हणून मार्ग असतील ते सर्व वापरले जात आहेत. ज्या नेत्यांना आपल्या स्वतःच्या ताकदीवर निवडून येऊ असा आत्मविश्वास राहिलेला नाही ते स्वतः होऊन भाजप-सेनेचे उंबरठे झिजवून त्यांच्या कळपात शिरत आहेत, शिरले आहेत आणि भविष्यातही शिरण्याचा प्रयत्न करणार आहेत. अर्थात त्यामुळे आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी डगमगून व घाबरुन जाण्याचे काहीही कारण नाही. बरीच प्रसिद्धी माध्यमे ही निरनिराळ्या कारणांमुळे सत्ताधारी पक्षाची तळी उचलून त्यांचाच बेलभंडारा व खोबरे उधळीत आहेत. आपल्या विरुद्ध अनेक खोट्यानाट्या वार्ता पसरवून समाजामध्ये अविश्वासाचे व गैरसमज वाढीला कसा लागेल या दृष्टीने वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्यामुळे आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी चित्त विचलीत होऊ देवू नका. आपण सतत समाजाला उपयोगी होईल असे चांगले काम करीत राहिले पाहिजे. जनतेच्या ज्या अडीअडचणी व प्रश्न आहेत त्यांची सोडवणूक करण्यासाठी मदतीचा हातभार लावला पाहिजे. सत्तेत पक्ष असला तरच मदत करता येते हा विचार कार्यकर्त्यांनी डोक्यातून काढून टाकला पाहिजे. सत्ता असो किंवा नसो मी गरीबांना, रंजल्या गांजलेल्यांना मदतच करणार ही भूमिका असेल तर कामाचा मार्ग निश्चित सापडतो. चांगले काम चोख केले तर आपल्याच मनाला आनंद लाभतो. यातून आणखीन चांगले काम करण्याचे सामर्थ्य मिळते. आपल्यातला मोठेपणा नकळत जागा होतो.

भाजप-सेनेसारखे जातीयवादी, धर्मांध व खोटारडे सरकार येत्या विधानसभा निवडणुकीत सत्तेवरुन खाली खेचणे आणि धर्मनिरपेक्ष, लोकशाही व समता प्रस्थापित करणारे काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस समविचारी आघाडीचे सरकार सत्तेवर बसविणे हे चांगले काम आहे. त्यासाठी हीच शुभ वेळ आहे असे समजून धीटपणे अंग झाडून कार्यकर्त्यांनी कामाला लागले पाहिजे. मरगळ झटकली पाहिजे. कोण काय देतो आहे याकडे लक्ष न देता मी समाजाला कोणत्या प्रकारची सेवा पूर्ण ताकदीनिशी देवू शकतो याचा विचार करून त्या कामाला सुरुवात केली पाहिजे. निर्भयता, प्रामाणिकपणा व सत्याची आणि सेवेची कास हीच आपल्या कामाची बलस्थाने असली पाहिजेत. तरुण कार्यकर्तेच असे उत्कृष्ट कर्मयोगी निर्माण करु शकतात. आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदराव पवार साहेब यांनी असे हजारो-लाखो कार्यकर्ते व नेते महाराष्ट्र आणि देशभर उभे करुन दाखविले. कामासाठी आसुसलेली उत्साही तरुणांची उत्कृष्ट फळी उभी करुन त्यांनी आपले गुरु मा. यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या मार्गावर विचारांची कास धरीत अखंडपणे वाटचाल चालविली आहे. भाजप आज पैशाने आपले कार्यकर्ते व नेते विकत घेत आहेत. अनेक राज्यात सत्तेवर येण्यासाठी भाजप विरोधी आमदारांना कोट्यावधी रुपये देत आहे. हे आपण कर्नाटक, गोवा, मणिपूर या राज्यात सरकारे उलथून टाकण्याचे भाजपने जे प्रयोग नाट्ये केली ते पाहून आपल्या लक्षात आले असेल. पैशाने स्वार्थी, लबाड गैरधंदे करणारे नेते विकत घेता येतील. पण चांगली निष्ठावंत, प्रामाणिक, विचारी माणसे पैशाने कधी निर्माण झाल्याचे ऐकलं आहे काय? अशी माणसे विकत घेता येत नाहीत. ते शेंडी तुटो व पारंबी तुटो आपल्या विचारांशी कधीही गद्दारी करीत नाहीत. त्यांचे मन आणि मुख एकच असते. आपल्या कामात आपण बोलल्यासारखे वागू शकलो तर लोक आपोआप आपल्याशी जोडले जातात. आपल्यावर विश्वास ठेवतात. अडीअडचण व मदतीला धावून येतात. कार्यकर्ता आणि जनता या दोघांचेही असे निस्सीम प्रेमाचे व गाढ विश्वासाचे नाते आपण निर्माण करायला हवे. त्यासाठी मतदारांच्या तुम्ही सतत व नियमितपणे संपर्कात असले पाहिजे. हे काम पक्षाच्या बूथ बांधणी व उभारणीतूनच होऊ शकते. प्रत्येक बूथवरच्या दहा कार्यकर्त्यांनी हजार म्हणजे प्रत्येकाने शंभर माणसे सांभाळायची हे काम फार अवघड नाही. त्यासाठी दिवसातले तास-दोन तासही पुरेसे आहेत.

सोशल मिडीया हे मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आता प्रभावी माध्यम बनले आहे. फेसबुक, ट्विटर, व्हॉटस्‌अप, इन्स्टाग्राम, ईमेल, एसएमएस, क्राऊडॲप यांसारख्या अनेक माध्यमांचा वापर आता आपले विचार पोहोचविण्यासाठी व प्रचाराचे माध्यम म्हणून वापरता येईल. निवडणुका आता केवळ रस्त्यावरच्या प्रचाराच्या आणि जाहीर सभांच्या राहिलेल्या नाहीत. सभेला माणसांनी प्रचंड गर्दी केली तरी ते मते देतीलच याची खात्री नाही. त्यामुळे सभेच्या गर्दीवरुन विजयाचा अंदाज बांधता येणार नाही. लोकजागृती करण्यासाठी सोशल मिडिया हेच प्रभावी माध्यम आहे. त्याच्या मार्फतच आपल्याला आगामी विधानसभेची निवडणुक लढायची आहे. पक्षातून काही नेते भाजप-सेनेत गेले असले तरी कार्यकर्ते जागेवर आहेत ते नेत्यांबरोबर गेलेले नाहीत. शेवटी कार्यकर्ता हीच पक्षाची खरी ताकद असते. कार्यकर्त्यांचा अजूनही पवार साहेबांवर विश्वास आहे. त्यांची ताकद, उर्जा ही न संपणारी आहे. पक्ष कुणी सोडून गेले म्हणून वाईट वाटून घेऊ नका. कुठलाही पक्ष असा फोडून संपत नसतो. विचारांची लढाई विचारांनीच लढावी लागते. पक्ष हा वैय्यक्तिक हव्यासापोटी फुटतो. नेते जातात. पण नवीन तरुण कार्यकर्ते त्या जागी येतात. पोकळी भरुन निघते. विकासाच्या नावाखाली जाणारे तर अत्यंत भोंदू व लबाड असतात. योग्य वेळी या गयारामांना जनता त्यांची जागा दाखविते यावर विश्वास ठेवून तुम्ही नेटाने कामाला लागा. सावध राहा ! रात्र वैऱ्याची आहे !




## सुरुवातीचे



# नव्या उमेदीने उभे राहूया

कार्यकर्ता हा पक्षाचा पाया असतो. तो पायातला चिरा असतो. तो कोणालाही फारसा दिसत नाही. पण त्याच्या जीवावरच पक्षाची पुरी मदार असते. सगळी इमारत उभी असते. तो जरासा जरी इकडे-तिकडे झाला की इमारतीला हादरे बसतात, तडे जातात. ती कमकुवत होते. राजकीय पक्षाचे नेते मंदीरावरल्या कळसासारखे असतात. सगळ्यांचे लक्ष कळसाकडे असते. पण तो कळस पायातल्या चिऱ्यांनी म्हणजे तळागाळातल्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी तोलून धरलेला असतो. कार्यकर्ते जीवाची बाजी लावून, अहोरात्र मेहनत व त्याग करतात म्हणून नेता मोठा होतो. कार्यकर्त्याने कष्टपूर्वक वाढवलेल्या झाडाला जी सुंदर गोड फळे येतात ती फळे म्हणजे नेते असतात. आपले नेतेपण कार्यकर्त्यांच्या श्रमावर अवलंबून आहे, याचे भान नेत्यांनी कायम ठेवले पाहिजे. चांगला नेता होण्यासाठी अगोदर चांगला कार्यकर्ता व्हावे लागते. एका रात्रीत सहसा कुणीही नेता होत नाही आणि झालाच तर तो फार काळ टिकत नाही. लोकही त्याला मनापासून मानत नाहीत. त्याच्यावर जीव तोडून प्रेम करीत नाहीत.

कार्यकर्त्यांच्या मागे हजारो लोक उभे असतात. एका अर्थाने कार्यकर्ता हा जनतेचा तारणहार असतो. फोटोत कोणाचेही चेहरे दिसू देत, पण नेता जेव्हा बोलायला उभा राहतो त्या वेळेला त्याच्या एकमुखी संवादातून अनेक कार्यकर्त्यांच्या मुखाच्या कृतीचे चिंतन उभे असते. नेता हा कार्यकर्त्यांच्या मनाचा सुंदर आरसा असतो. तो आरसा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे तरच नेत्याचे प्रतिबिंब त्यातून स्वच्छ दिसते. कार्यकर्ता लोकांसाठी असतो. तो लोकांना हवा असतो. कार्यकर्त्यांच्या अभ्यासाची परिपक्वता त्याच्या कृतीतून व्यक्त होते. म्हणून कार्यकर्त्याने नेहमी एक लक्षात ठेवावे. पूर्ण सामर्थ्यानिशी आपण कोणत्याही प्रश्नाशी लढले पाहिजे. एखादा प्रश्न हाती घेतला तर तो शेवटपर्यंत निभावून नेला पाहिजे. त्यासाठीचा कणा निःस्वार्थी व कणखर हवा. कोण आपल्या बरोबर येतो, येत नाही, मधूनच सोडून जातो त्याचा विचार करु नये आणि डगमगूही नये. आला तर उत्तम माझ्या समवेत, नाही आला तर तुझ्याशिवाय पुढे जाईन हा निर्धार पक्का हवा. यासाठी कार्यकर्त्याला लोकांशी संवाद करता आला पाहिजे. लोकांना सत्य समजावून सांगण्याची तयारी पाहिजे. कार्यकर्त्यांचे ईमान जसे त्याच्या नेत्याशी असते तसे ते त्याने निर्माण केलेल्या कार्यप्रणालीशी असते. आपल्या कार्यपद्धतीत कार्यकर्त्याने सर्वांना सामावून घेतले पाहिजे. वेळ पडल्यास जर आपल्याला नवीन काही सुचत नसेल तर नवीन लोक काय म्हणतात ते जाणून घेतले पाहिजे. यासाठी कार्यकर्त्याने जुन्या-नव्याचा प्रितीसंगम घडवून आणला पाहिजे. हे काम आजही पवार साहेब जेव्हा करतात, तेव्हा खरोखरच मन थक्क होते. कामाची झेप काय आहे ते कळते. आपल्या कामाचे ईमान किती निरपेक्ष मनाने करता येते तेही कळते. मा. अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या एका कवितेत असे म्हटले आहे की, "तुम्ही पंख व्हा. तुमचे आकाश निर्माण करा. परंतु झेप घेताना आपल्या मातीचे विस्मरण होऊ देवू नका." याला ईमान म्हणतात. मा. पवार साहेबांच्या विचारधारेत व दृष्टीकोनात असे ईमान अग्रस्थानी असते. त्यामुळे पक्षांतर्गत कोण आले आणि कोण गेले याबाबत ते कधीही बोलत नाही. त्याची चिंताही करीत नाहीत. आजपर्यंत अनेक लोक त्यांच्याकडे आले, गेले. त्यांनी अनेकांना हाताला धरुन राजकारणात आणले, मोठे केले. त्यातले काहीजण मंत्री, मुख्यमंत्री, आमदार, खासदार आणि अनेक पदांवर गेले. काहींनी त्याची जाणीव ठेवली. काही संधीसाधू त्यांना विसरून विरोधी कळपात गेले. पण साहेबांनी त्याबद्दल कधीही मनात कटुता बाळगली नाही. त्यांनी पुन्हा जोमाने, कष्टाने, मेहनतीने पक्ष उभा केला. असे एक वेळा नव्हे तीन-चार वेळा घडले. त्यामुळे त्यांच्या लेखी या आयाराम-गयारामांना किंमत शून्य आहे. तेव्हा माझीही तुम्हांला विनंती आहे आपल्या पक्षातून कोण निघून गेला त्याची चिंता करीत बसू नका. त्याच्या नावाची चर्चाही करु नका. चर्चेने उलट आपण त्यांना मोठे करतो. अनुल्लेखाने मारण्यासारखी दुसरी मोठी शिक्षा नाही. त्यामुळे जे नेते पक्ष सोडून गेले त्यांचे नावही घेऊ नका. त्यांच्या दारात लाचार व लोचटासारखे परत जाऊ नका. जे स्वतः स्वार्थी आहेत ते दुसऱ्यांना काय मदत करणार? तेव्हा त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा करु नका. या पक्ष सोडून गेलेल्या गद्दारांना त्यांची जागा आपल्याला आपल्या कामातून, त्यांचा पराभव करुन दाखवायची आहे. यासाठी येत्या विधानसभा निवडणुकीत आपण सारेजण एकजुटीने कंबर कसून कामाला लागूया. आपले आपापसातील मतभेद, गटबाजी, भांडणे, कुरबुऱ्या, चढाओढ, जुन्या दुश्मन्या संपुष्टात आणू या. भाजप-शिवसेना सरकारला आपल्याला सत्तेवरुन खाली खेचायचे आहे हा एकच निर्धार आपला असला पाहिजे. अर्जुनाला झाडावरच्या पोपटाचा जसा एकच डोळा दिसत होता तसे आपल्यालाही सत्तेत यायचे आहे एवढेच लक्ष्य असले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक मतदारापर्यंत जाऊन त्याचा विश्वास संपादन करा. जनतेच्या विश्वासाची मोहोर मतदानातून तुम्हांला निश्चित सत्तेपर्यंत घेऊन जाईल एवढा विश्वास बाळगा! व त्यासाठी जीवतोडून मेहनत करा. श्रमाचे फळ निश्चित पदरात पडेल.



## प्रबंध संपादकीय



# बोक्याचे स्वप्न अर्धवटच राहिल

भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी श्री. चंद्रकांत पाटील यांची 16 जुलै 2019 रोजी नियुक्ती करण्यात आली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शहा यांनी नियुक्तीची ही घोषणा केली आहे. श्री. पाटील यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करताना तीन मुख्य गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. त्या म्हणजे ते जातीने मराठा आहेत. ते अमित शहा यांच्या मर्जितले आहेत. दिल्लीतून त्यांना पाठबळ मिळणार असून विधानसभा निवडणुकीसाठी पक्ष संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. आणखीन एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक होते ते म्हणजे चंद्रकांतदादा हे बरीच वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व अभाविपचे पूर्ण वेळ प्रचारक व संघटक होते. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी आणि अमित शहा या दोघांनीही आता पक्षावर पूर्ण ताबा मिळवून भाजपमधली लोकशाही गाडून टाकून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारसरणी पूर्णपणे जशीच्या तशी स्वीकारण्यास नकार दिला आहे. पानातल्या चटणी-लोणच्यापुरता संघाचा भाजपवाले चवीचवीने वापर करीत आहेत. चंद्रकांतदादांची प्रदेशाध्यक्षपदी झालेली नेमणूक हे त्याचेच निदर्शक आहे. या नेमणुकीतून संघाचा कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष झाला आहे असे चित्र सर्वांना दिसेल. संघ स्वयंसेवकही त्यामुळे क्षणभर सुखावतील. पण प्रचंड पैसा गोळा करुन (कामाच्या मोबदल्यात) मते विकत घेण्यासाठी आणि उमेदवार व कार्यकर्ते फोडण्यासाठी हा पैसा जेव्हा वापरला जाईल व जनता ते खुल्या व उघड्या डोळ्यांनी जेव्हा पाहील तेव्हा संघ कार्यकर्त्यांचा वापर राजकीय पक्षाच्या स्वार्थासाठी व किती खालच्या कामासाठी केला जातोय हे पाहून सच्चा व प्रामाणिक संघ सेवकाच्या



हृदयात चलबिचल झाल्याशिवाय राहणार नाही. डॉ. हेडगेवार, गोळवलकर गुरुजी, दीनदयाळ उपाध्याय यांना असले भ्रष्टाचारी आणि राजकीय पक्षाचे एजंट म्हणून काम करणारे संघ स्वयंसेवक अभिप्रेत होते काय? असा प्रश्न संघनिष्ठावंतांना निश्चित पडल्याशिवाय राहणार नाही.

प्रदेशाध्यक्ष झालेल्या चंद्रकांतदादांनी केवळ पैसे वाटण्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या काळात बारामतीत भाडेतत्त्वावर फ्लॅट घेतला आणि आजही तो विधानसभा निवडणुकीत पैसे वाटायचे म्हणून ठेवला आहे हे काही लपून राहिलेले नाही. खासदार सुप्रियाताई सुळे यांना लोकसभा निवडणुकीत बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभूत करण्यासाठी चंग बांधून पाटलांनी कोट्यावधी रुपये वाटले. काही निष्ठावंत संघ सेवकही या पैसे वाटण्याच्या कामाला लावले होते. अमित शहांचा रोड शो, पवारांना उखडून टाकण्याची भाषा आणि चंद्रकांतदादांच्या केवळ पैसे वाटण्याच्याच नाही तर अत्यंत खालच्या पातळीला जाऊन राजकारण खेळण्याच्या कृतीला बारामतीतल्या जनतेने जशास तसे उत्तर देऊन मागच्या (2014) वेळेपेक्षा दुप्पट मताधिक्याने सुप्रियाताईंना निवडून दिले आणि भाजपला सणसणीत चपराक दिली. या लोकसभा निवडणुकीवरुन चंद्रकांत दादांनी काही बोध घेतला आहे असे दिसत नाही. हाच खेळ ते आता पुन्हा विधानसभेला करु इच्छितात आणि करणार आहेत असे जेव्हा भाजपच्याच कार्यकर्त्यांकडून उच्चारवाने सांगितले जाते तेव्हा प्रदेशाध्यक्षांचे मडके थोपटून ते तपासण्यासाठी एखादा कुंभार राष्ट्रवादीने तयार ठेवलेला बरा! हरामचा पैसा असल्यामुळे तो वाटताना दुःख होत नाही. कष्टाचा पैसा असा कुणी वाटणार नाही. चंद्रकांतदादांनी महसूल


## संपादकीय



खाते ताब्यात असल्यामुळे जमिनींच्या व्यवहारात किती प्रचंड भ्रष्टाचार केला आहे याची असंख्य प्रकरणे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या जयंत पाटील यांनी शेवटच्या विधानसभा अधिवेशनात अगदी कागदोपत्री पुराव्यासह मांडली. या भ्रष्टाचाराच्या कागदपत्रांच्या बॅगाच्या बॅगा जयंतरावांनी ओढत ओढत विधानभवनात आणून सभागृहात नेऊन दाखविल्या. प्रामाणिक तत्त्ववादी म्हणून गौरविला जाणारा संघ स्वयंसेवक, अभाविपचा कार्यकर्ता किती भ्रष्ट असू शकतो याचे दर्शन संपूर्ण सभागृहालाच काय पण जनतेलाही पाहायला मिळाले आहे. असा भ्रष्टाचाराने बरबटलेला व प्रामाणिक सेवेचा खोटा ढोंगी मुखवटा धारण केलेला माणूस भाजपचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे. आता त्याचे कोणत्या शब्द सुमनांनी स्वागत करावे व कसे करावे हा प्रश्न सर्व विचारी व एकनिष्ठ प्रामाणिक कार्यकर्त्यांना पडलेला आहे. हे कार्यकर्ते आज मूठभर असले तरी त्यांच्याच जीवावर पक्ष उभा आहे हे कुणीही विसरु नये.

प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबरोबर पहिली प्रतिक्रिया देताना चंद्रकांत पाटलांनी महाराष्ट्र काँग्रेसमुक्त करणे हे आपले ध्येय व प्राधान्याचा कार्यक्रम असल्याचे जाहीर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसमुक्त भारताची घोषणा केली. त्याच धर्तीवर चंद्रकांतदादांनी काँग्रेसमुक्त महाराष्ट्राची घोषणा केलेली दिसते. मोदींच्या घोषणेचे काय झाले हे चंद्रकांतदादांनी थोडे डोळे उघडे ठेवून बघितले असते तर बरं झालं असतं. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड या तिनही राज्यात लोकांनी काँग्रेसला पुन्हा सत्तेवर बसविले आणि तिथे 15 वर्षे सत्तेत असलेल्या भाजपला सत्तेवरुन खाली खेचले. हे कशाचे लक्षण मानायचे? कर्नाटक, गोवा, मणिपूर या राज्यातही जनतेने भाजपच्या विरोधी कौल दिलेला असताना राज्यघटना धाब्यावर बसवून राज्यपाल यंत्रणेचा सरकारे पाडण्यासाठी वापर करुन केंद्र सरकारने लोकशाहीचा जो खेळखंडोबा देशात मांडलेला आहे तो जनता रोज उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. आमदार खरेदी करण्यासाठी भाजपवाले किती पैसे ओतताहेत (कर्नाटकात फोडलेल्या एकेका आमदाराला भाजपने 70 कोटी दिले असे इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून आम्ही ऐकले आहे. नेमकी रक्कम किती हे घेणारे आणि देणारे दोघांनाच माहिती!) आणि काँग्रेसची निरनिराळ्या राज्यातली सरकारे पाडण्यासाठी केवढा भाजपवाल्यांचा व मोदी शहा जोडगोळीचा आटापिटा चालू आहे. अशा पद्धतीने सरकारे पाडून देश काँग्रेसमुक्त होणार आहे का? काँग्रेस ही नेमकी काय आहे? ती देशातल्या प्रत्येक गावागावात आणि वाडीवस्ती व घराघरात कशी पोहोचली आणि ती भाजप नेत्यांच्या असल्या उटपटांग वागण्यातून नष्ट होणार का? याचा आपण शांतपणे विचार करण्याची गरज आहे.


इ.स. १८८५ साली देशातील नवशिक्षित बुद्धिमंतांनी व विचारवंतांनी पुढाकार घेऊन काँग्रेस ही संघटना स्थापिली होती. या संघटनेतील आरंभीच्या काळातील महत्त्वाचे नेते सुरेंद्रनाथ बॅनर्जी, दादाबाई नौरोजी किंवा महादेव गोविंद रानडे हे कुणीच प्रचलित अर्थाने धर्मपुरुष नव्हते. व्रते, उद्यापने, धार्मिक आचरण यांचे जाहीर प्रदर्शन या नेत्यांनी मांडलेले नव्हते. तरीही दिवसेंदिवस त्यांचा पाठिंबा वाढतच गेला होता. इ.सन. १८९० पासून काँग्रेस संघटनेत आणखीन काही नवे नेते उदयाला आले. यामध्ये लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, चित्तरंजन दास, बिपिनचंद्र पाल यांचा समावेश होता. १९२० मध्ये जेव्हा लो. टिळक वारले त्यावेळी काँग्रेस संघटना ही संपूर्णपणे देशातील नवशिक्षित, कर्तबगार व बुद्धिमान विचारवंत मंडळींची संघटना होती. या मंडळीत जहाल, मवाळ असे दोन गट होते. काँग्रेममध्ये असलेले हे दोन्ही गट अडाणी, अंधश्रद्ध, धर्मभोळ्या भारतीय जनतेचे गट नव्हते. काँग्रेस नवशिक्षित मंडळींनीच भरलेली होती. महात्मा गांधींनी भारतीय राजकारणात खऱ्या अर्थाने प्रवेश केला तो १९१५ साली. त्यापूर्वी वंगभंगाचे




सुरेंद्रनाथ बॅनजी



न्या. महादेव गोविंद रानडे




दादाभाई नौरोजी



महात्मा गांधी



सुभाषचंद्र बोस



लोकमान्य टिळक

एक मोठे आंदोलन होऊन गेलेले होते. आपला स्वार्थत्याग, निर्भयता आणि बलिदानाची तयारी यामुळे ज्यांनी देशाच्या जनतेत एक स्थान निर्माण केलेले होते, शहरात ज्यांच्या सभांना लाख लाख माणसे जमत, असे नेते काँग्रेसजवळ उपलब्ध होते. १९२० साली लो. टिळक वारले. त्यानंतर एक दोन वर्षातच गांधीजी भारताचे आणि काँग्रेसचे सर्वश्रेष्ठ नेते बनले. भारतीय जनतेने गांधीजींचे नेतृत्व मान्य केले या वाक्याचा खरा अर्थ काँग्रेसने गांधीजींचे नेतृत्व मान्य केले आणि भारतीय जनता काँग्रेसमागे जमा झाली असा आहे.


सुभाषचंद्र बोस यांच्यासारखा तरुण गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्येच वाढला. १९२० ते ३८ सुभाषचंद्र अहिंसेवर व्याख्याने देत होते. सत्याग्रहाचे महत्व समजावून सांगत होते. स्वतः खादी वापरुन खादीचा प्रचार करीत होते. सुभाषचंद्रांच्या मनात गांधीजींविषयी प्रचंड आकर्षण होते. हे आकर्षण इतके उत्कट होते की, गांधीजींशी भांडून सुभाषबाबू काँग्रेसबाहेर पडले, आणि जेव्हा त्यांनी हिंदी राष्ट्रीय फौज निर्माण केली तेव्हा शस्त्रबळाने भारत स्वतंत्र करण्याला वचनबद्ध झालेल्या या सेनानीने तोफांच्या सलामीत चरखांकित काँग्रेसध्वज राष्ट्रध्वज म्हणून स्वीकारला व राष्ट्रपिता म्हणून गांधीजींचाच जयघोष केला. जे सुभाषबाबूंना लागू आहे तेच पं. नेहरु, सरदार पटेल आणि सर्व समाजवादी नेत्यांना लागू आहे. खरे म्हणजे ही सर्वच माणसे काँग्रेस-संघटनेत होती. आणि काँग्रेस ही गांधीजींनी बलवान केलेली भारतीय जनतेची सर्वात बलशाली राजकीय संघटना होती. पण ही संघटना गांधीवादी कधीच नव्हती. गांधीजी हे नेहमीच बिनगांधीवादी संघटनेचे नेते होते. याची जाणीव जशी गांधीजींना होती, तशीच ती काँग्रेस नेत्यांनाही होती. काँग्रेसने कधीही आपला कार्यक्रम म्हणून अपक्ष लोकशाहीची भूमिका घेतली नाही. १९२० ते १९४७ ही २७ वर्षे काँग्रेसमध्ये गांधीजींचे नेतृत्व होते. पण काँग्रेसच्या मागण्या प्रौढमतदानावर आधारलेल्या संसदीय लोकशाहीच्या होत्या. काँग्रेससाठी अहिंसा हा राजकीय ध्येयधोरणाचा भाग होता. तो जीवननिष्ठेचा भाग नव्हता.

गांधीजींनी स्वतः सत्याग्रहाचे एक तत्त्वज्ञान बनविले. त्यांचा हृदयपरिवर्तनावर विश्वास होता. प्रेमाने शत्रूचे अंतःकरण जिंकावे व बदलावे असे ते म्हणत. पण काँग्रेसला सल्ला देताना नागपूर काँग्रेसच्या अधिवेशनात गांधीजी म्हणाले, ''अहिंसक लढ्याचा कार्यक्रम तुम्ही स्वीकारावा अशी माझी विनंती आहे. ही विनंती करताना माझ्या डोळ्यांसमोर नैतिक चांगुलपणाचे प्रश्न नाहीत. व्यावहारिक राजकारणातील राजकीय शहाणपणाचे प्रश्न आहेत.'' हे सत्याग्रहाचे शस्त्र काँग्रेसने नैतिक चांगुलपण म्हणून स्वीकारलेले नव्हते, ते राजकीय शहाणपण म्हणूनच स्वीकारलेले होते. जनतेचा पाठिंबा संपूर्णपणे काँग्रेसला आहे हे दाखविण्याचा सत्याग्रह हा एक शांततापूर्ण मार्ग होता. काँग्रेसच्या आज्ञेने लाखो लोक सत्याग्रहात सामील होत होते. मतदानाचा अधिकार श्रीमंत व वरिष्ठ मध्यमवर्गाला मिळाला तरी काँग्रेस निवडून येते. हा अधिकार व्यापक करुन जनतेला दिला तरी काँग्रेसच निवडून येते. म्हणून लोकमतानुवर्ती सरकार या देशात काँग्रेसच्या संमतीशिवाय चालविणे शक्य नाही हे इंग्रजांना पटवून देण्याचा सत्याग्रह हा मार्ग होता. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी काँग्रेसने जो संघर्ष केला, लढा दिला, त्याग केला, अनेकांनी प्राणांचे बलिदान दिले, हालअपेष्टा व कारावास सोसला म्हणून स्वातंत्र्याची पहाट १५ ऑगस्ट १९४७ रोजी जनतेला पाहायला मिळाली. काँग्रेसचे हे योगदान जनता कधीच विसरु शकत नाही. स्वातंत्र्यानंतरही ६० वर्षे काँग्रेस देशात सत्तेवर राहिली. या काळात देशाचा प्रचंड विकास घडवून आणि काँग्रेसने जगभर भारताचा नावलौकिक पसरविला व मजबुतीने देशाला उभे केले हे जनतेला पक्के ठावूक आहे आणि त्याबद्दल ती काँग्रेसची कृतज्ञही आहे. म्हणून भारत काँग्रेसमुक्त करण्याची पंतप्रधान मोदींची भाषा जनतेला नाही आवडली, नाही पसंत पडली.


त्यांनी जाणीवपूर्वक मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड येथे पुन्हा काँग्रेसला निवडून दिले. महाराष्ट्र काँग्रेसमुक्त करण्याची भाषा करण्यापूर्वी चंद्रकांतदादांनी ही पार्श्वभूमी व हा इतिहास लक्षात घ्यावयास हवा होता.

आपल्या सोयीसोयीने इतिहास सांगण्याचे व रचण्याचे कौशल्य भाजपला चांगलेच अवगत झाले आहे. खरा इतिहास खोटा ठरवून पुन्हा खोटा इतिहास खरा म्हणून लिहून घेण्याचे षडयंत्र सत्तेवर आल्यापासून भाजपने रचलेले आहे. त्यासाठी मोठमोठ्या लेखकांना सुपाऱ्या देऊन इतिहास बदलण्याचे व खोटा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करुन हिंदुत्ववादी व धर्मनिष्ठ नेत्यांचा उदोउदो करण्याचा जो डाव भाजपने टाकलेला आहे त्यामुळे देशाची एकात्मता व अखंडता पुन्हा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरदार पटेल, स्वातंत्र्यवीर सावरकर, सुभाषचंद्र बोस हे गांधी नेहरुंच्या कसे विरोधात होते आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या आमच्याच बाजूचे व आमच्याच विचारांचे होते हे सतत निरनिराळ्या मार्गांनी लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न भाजपने चालविलेला आहे. खरा इतिहास माहित नसणाऱ्या किंवा त्याचा अभ्यास न करणाऱ्या व विशेषतः नवीन आंग्लाळलेल्या पिढीला हिंदुत्ववाद्यांचा खोटा इतिहास खरा वाटण्याचा मोठा धोका आहे, भिती आहे. म्हणून सगळ्या धर्मनिरपेक्ष शक्तींनी एकत्र येऊन सत्य जनतेला सांगितले पाहिजे व खरा इतिहास लोकांपुढे नेण्याचा सातत्याने आग्रह धरला पहिजे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांना अंदमानच्या तुरुंगातून सोडविण्यासाठी महात्मा गांधींनी प्रचंड प्रयत्न केले हे सावरकरांचे भक्त आणि हिंदुत्ववादी जनतेला कधीही सांगत नाहीत. भाजपवाले तर त्याबद्दल अवाक्षरही बोलत नाहीत. सावरकरांना अंदमानच्या तुरुंगात ठेवले होते तेव्हा म. गांधी आफ्रिकेत होते. सन १९०९ च्या दसरा महोत्सवाची सभा आटोपल्यानंतर गांधीजी लगेच आफ्रिकेत परतले, तर सावरकरांना ते फ्रान्सहून परत येताना १३ मार्च १९१० या दिवशी लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर ब्रिटिश पोलिसांनी अटक केली. नंतरच्या काळात त्यांच्यावर दोन खटले चालविले गेले आणि त्या दोहोतही त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. ही शिक्षा त्यांनी वेगवेगळी भोगावयाची होती. ही सगळी शिक्षा त्यांना भोगावी लागली असती तर त्यांची सुटका २४ डिसेंबर १९६०या दिवशी झाली असती. मात्र ६जानेवारी १९२४ ला सावरकरांनी केलेल्या अनेक अर्ज-विनंत्या आणि सुटकेसाठी केलेले अर्ज व लिहून दिलेला माफीनामा या सर्वांचा विचार करुन ब्रिटिश सरकारने अनेक अटी लादून व विशेषतः राजकारणात भाग न घेण्याची अट सावरकरांकडून मान्य करुन घेतली. त्यानंतरच त्यांची अंदमानच्या कारागृहातून सुटका झाली. ही सुटका व्हावी यासाठी म. गांधींनी काँग्रेसला प्रयत्न करणे भाग पाडले. यावेळी गांधी काँग्रेसच्या राजकारणात सक्रिय होते. गांधींना असे प्रयत्न करणे आवश्यक वाटण्याचे एक कारण सावरकरांना अंदमानात दिली जाणारी अमानुष वागणूक हे; तर दुसरे प्रत्यक्ष सावरकर आपल्या सुटकेसाठी सरकारकडे नियमित अर्ज करीत होते, हेही होते. या अर्जांमध्ये "यापुढे आपण सरकारविरुद्ध कोणतीही कारवाई करणार नाही आणि सरकारला अडचणीतही आणणार नाही" असे सावरकर लिहून देत होते. त्यांचा होत असलेला छळ आणि त्यांनी आपल्या सुटकेसाठी चालविलेले अर्ज-विनंत्यांचे प्रयत्न गांधींची संवेदनशीलता चाळविणारे होते. म. गांधींनी सावरकरांच्या सुटकेसाठी जे अथक परिश्रम घेतले त्याबद्दल हिंदुत्ववादी जाणीवपूर्वक मौन बाळगतात. त्याबद्दल कधीही कृतज्ञतेचा एक शब्दही बोलत नाहीत हे आपण आवर्जून लोकांसमोर नेले पाहिजे. १९१७ मध्ये मुंबईत भरलेल्या काँग्रेसच्या प्रादेशिक अधिवेशनात म.



डॉ. केशव बळीराम हेडगेवार




गोळवलकर गुरुजी



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर


गांधींनी सावरकरांच्या सुटकेची मागणी करणारा ठराव सर्व प्रतिनिधींच्या संमतीने मंजूर करुन घेतला. इतकेच नव्हे तर नंतरच्या काळात दक्षिणेत काकीनाडा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अखिल भारतीय अधिवेशनातही त्यांनी तसा ठराव आग्रहपूर्वक संमत करुन घेतला. एवढ्यावरच गांधी थांबले नाहीत. तुरुंगातून सावरकर सुटल्यानंतर त्यांना रत्नागिरीत स्थानबद्ध करण्यात आले होते. तेव्हाही गांधीजी कस्तुरबांना घेऊन सावरकरांना भेटण्यासाठी रत्नागिरीला गेले. सगळी औपचारिक चर्चा संपल्यानंतर गांधींनी सावरकरांना त्यांच्या पत्नीला बाहेर बोलविण्याची विनंती केली. त्यावर आश्चर्यचकित होऊन कशाकरिता? असा प्रश्न सावरकरांनी विचारला. तेव्हा उत्तर



पं. जवाहरलाल नेहरू

देताना गांधी म्हणाले, "देशासाठी अनिवार कष्ट उपसलेल्या देशभक्ताच्या पत्नीच्या वाट्याला कोणत्या यातना येतात, ते दाखवायला मी कस्तुरबाला माझ्यासोबत आणले आहे. तिला सौ. सावरकरांना पाहायची व भेटायची इच्छा आहे." गांधींच्या मनाचा किती हा मोठेपणा !


साऱ्या जगाने डोक्यावर घेतलेल्या गांधींना गुरुदेव टागोरांनी 'महात्मा' म्हटले आणि त्यांच्याशी मतभेद असतानाही सुभाषबाबूंनी त्यांचा 'राष्ट्रपिता' म्हणून गौरव केला. सरदार पटेलांचे मतभेद नुसते नेहरुंशी नव्हते, ते महात्मा गांधींशीही होते. पण तरीही आपल्याशी मतभेद असणारा एक जडवादी गांधींनी स्वतःचा वारस केला आणि या वारसाने सर्व मतभेद असूनही धार्मिक गांधीजींच्यावर कमाल श्रद्धा ठेवली. गांधीजींनी तीव्र मतभेद असलेल्या सरदार पटेलांच्या हाती संघटनेची सूत्रे दिली आणि सरदारांनीही जाहीर रितीने आपण फक्त गांधींच्या हातातले बाहुले आहेत इतकेच सांगितले. यात मोठेपण गांधींचे मानावे की मते मान्य नसणाऱ्या महात्म्यांचे नेतृत्व स्वीकारणाऱ्या पटेल-नेहरुंचे मानावे याविषयी ज्याने त्याने स्वतःच्या मनाचा कौल लावला पाहिजे. वस्तुस्थिती इतकीच आहे आणि ती राष्ट्रावर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीने महत्वाची आहे की, ही माणसे तीन



सरदार वल्लभभाई पटेल

दशके आपापले पृथक् व्यक्तित्व आग्रहाने जतन करीत आली आणि परस्परांशी सहकार्य करुन एकमेकांना सांभाळूनही घेत आली. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटलांचे प्रदेशाध्यक्ष झाल्याबरोबर काँग्रेस महाराष्ट्र मुक्त करण्याचे धोरण व विधान किती उथळ, वरपांगी, स्वार्थाने बरबटलेले आणि लोकशाही विरोधी आहे हे ठळकपणे डोळ्यात भरल्याशिवाय राहात नाही. लोकशाही जिवंत राहता कामा नये आणि तिच्यासाठी आग्रह धरणारा काँग्रेस पक्षही जिवंत राहता कामा नये किती ही शूद्र मनोवृत्ती ! किती संकुचित विचार ! महात्मा गांधी, सरदार पटेल, पंडीत नेहरु, सुभाषबाबू यांच्याइतके मोठे व विशाल मन एकाही हिंदुत्ववादी व भाजप नेत्याला दाखविता येऊ नये हे देशाचे केवढे मोठे दुदैव आहे.

गोरक्षणाच्या प्रश्नावरुन मागील पाच वर्षात अल्पसंख्यांक समाजामध्ये भाजप सरकारने जे भिती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण केले आहे त्यामुळे लोकांमध्ये मोठी अस्वस्थता आहे. हिंदू लोकांनाही भाकड गायी सांभाळण्याचे मोठे ओझे झाले आहे. पण सरकार त्यांना समजून घ्यायला तयार नाही. गोरक्षण हा महात्मा गांधींचाही कार्यक्रम होता. गांधीजींसारखे लोक पवित्र असतात, संत असतात, आध्यात्मिक असतात पण ते




गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर

खऱ्या अर्थाने धार्मिक कधीच नसतात. प्रथमदर्शनी पाहताना गांधीजींच्यासारखा माणूस सर्व धर्माचा पूजक असा दिसतो. पण बारकाईने पाहताना हा माणूस सर्वधर्माचा पूजक नसून तोच धर्माचा सगळ्यात मोठा शत्रू असतो, हे दिसू लागते. जो संत असतो, तो मूलतः धर्माचा शत्रू असतो. हा मुद्दा विक्षिप्त व एकदम विसंगत वाटेल. पण बारकाईने शांतपणे विचार केला तर हे एक फार महत्त्वाचे सत्य आहे असे आपल्या लक्षात येईल. जगातील सगळेच खरेखुरे संत शेवटी धर्माचे शत्रू असतात. हे



इंदिरा गांधी



राजीव गांधी



सोनिया गांधी

विवेचन खऱ्याखुऱ्या संतांविषयी आहे. जे वेगवेगळ्या रंगांची वस्त्रे घालून स्वतःला संत समजतात किंवा ज्यांना अनुयायांनी संत म्हणून मान्यता दिली, त्यांच्यातील कर्मठ शठांना हे विवेचन लागू पडणार नाही. आज दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, संतांनी शक्यतो व्यावहारिक जीवनात हस्तक्षेप टाळला. ज्या संतांनी व्यावहारिक जीवनात हस्तक्षेप केला, त्या संतांच्या अनुयायांनी पुन्हा एक नवा धर्म, संप्रदाय निर्माण करुन साधुसंतांवर असलेल्या जनतेच्या निष्ठाच संतांच्या उपदेशाचा गाभा पराभूत करण्यासाठी वापरुन संतांचे पराभव केले. गांधीजी हे असे संत होते की, त्यांनी आपल्या अनुयायांना धर्म निर्माण करण्याची सोयच उपलब्ध करुन दिली नाही.

सहिष्णुतेचा खरा अंगीकार आणि पुरस्कार गांधींनी केला. सहिष्णुतेचा अर्थ परिपूर्ण होण्यासाठी एका श्रद्धेची गरज असते. ती श्रद्धा म्हणजे माझ्या विचारातील काही भाग चुकीचा असू शकेल, तो दुरुस्त करण्यास मी तयार आहे. या भूमिकेला सहिष्णुता असे म्हणतात. सहिष्णुतेचा गाभा म्हणजे नको असणारे सहन करणे हा नसतो. सहिष्णुतेचा गाभा न पटणाऱ्या भूमिकेला सहानुभूतीने समजून घेण्याची तयारी हा असतो. या अर्थाची सहिष्णुता भारतीय परंपरेत कधीच नव्हती. सहिष्णुता आणि औदार्य याबद्दल हिंदू धर्माची फार स्तुती केली जाते. इतरांना आपल्या धर्मात घेण्याची हिंदूंची प्रथा नाही. त्यामुळे हिंदू धर्म सहिष्णु वाटतो. इतकेच त्यातील सत्य आहे. गोरक्षणाच्या बाबींचा गांधीजींच्या राष्ट्रपितेपणाशी काहीही संबंध नाही. ही बाब गांधीजींच्या जीवनात असली काय किंवा नसली काय, गांधींना भारतीयांनी राष्ट्रपिता मानलेच असते. यातील गोहत्याबंदी सोडल्यास गोळवलकर गुरुजींना गांधींचे इतर काहीही पटलेले दिसत नाही! हिंदू धर्मावरील गाढ विश्वास आणि गोहत्याबंदी एवढाच गोळवलकरांना गांधीजींचा खराखुरा मोठेपणा वाटत असावा असे दिसते. त्यातही पुन्हा दोन बाबी आहेत. गांधीजींची भूमिका गोवंशाच्या विकासातून गोहत्याबंदीकडे जाणारी होती. कायद्याने गोवधबंदी करण्याच्या ते विरोधी होते. सावरकरही याच विचारांचे होते. गोळवलकरांना गोरक्षणावर गांधी अप्रमाण आहेत आणि गोहत्याबंदीवर प्रमाण आहेत! हिंदू धर्म मूळातच अत्यंत उदार आणि व्यापक आहे. म्हणून गांधींजी उदार व व्यापक झाले असे गुरुजींचे म्हणणे आहे. गोळवलकरांच्या विवेचनात सत्याची थोडी उलटापालट झाली आहे! सत्य असे आहे की, गांधी उदारमतवादी होते म्हणून त्यांनी हिंदू धर्म उदार करण्याचा प्रयत्न केला. हिंदू धर्म नेहमीच अनुदार व उदासीन असल्यामुळे हिंदुत्ववादी जनतेच्या प्रश्नांच्या विषयी उदासीन राहिले. गांधीविषयी अनुदारपणे बोलले व या महात्म्याला जन्मभर विरोध केला!

तीच परंपरा आज भारतीय जनता पक्ष, मोदी आणि त्यांची पिलावळ चालवित आहे. फरक इतकाच झाला आहे की ते आता महात्मा गांधी सोडून गांधी कुटुंबिय आणि काँग्रेसच्या पाठीमागे लागले आहेत. त्यामुळे सातत्याने त्यांनी काँग्रेसमुक्त भारत व काँग्रेसमुक्त महाराष्ट्र असा धोशा लावला आहे. पण निव्वळ धोशाने आणि पैसे वाटल्याने व धमक्या दिल्याने कोणतीही विचारधारा संपत नाही, संपणारही नाही. काँग्रेस ही एक विचारधारा आहे. १५० वर्षे हा विचार भारताच्या भूमीत रुजला आहे. सत्तेत लोण्याचा गोळा हाणला म्हणून चंद्रकांतदादांसारख्या बोक्याला काँग्रेसचा विचार व हा पक्ष संपुष्टात आणता येणार नाही. काँग्रेसमुक्त महाराष्ट्र करण्याचे त्यांचे स्वप्न कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालू असताना 'चंद्र, सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला देणार नाही' असे मोरारजी देसाई म्हणाले होते. त्यावर आचार्य अत्रे गर्जले, "चंद्र, सूर्य काय मोरारजींच्या बापाचे आहेत?" तीच गोष्ट चंद्रकांतदादांनीही ध्यानात ठेवावी. महाराष्ट्र काँग्रेसमुक्त करायला निघालात, महाराष्ट्र काय तुमच्या बापाचा आहे...?



निवडणुका तुम्ही पाहिल्यात, मीही अनेक वर्षे पाहिल्यात. निवडणुकीसाठी एखादा राजकीय पक्ष तयारी करतो, यात काही गैर नाही. पण मी पहिल्यांदाच असं पाहतोय. या देशामध्ये एक मताने पक्षांतरबंदीबाबतचा कायदा झाला. या कायद्यानुसार एका विशिष्ठ संख्येने निर्वाचीत लोकांनी काही निर्णय घेतला, तर पक्षांतरला परवानगीसुद्धा आहे. पण, संख्या नसेल तर करता येत नाही, आणि केले तर त्यांचे सभासदत्व रद्द होते. अशा कायद्याला विधीमंडळ आणि संसदेने एक मताने मान्यता असताना आज तो कायदा धुळीला मिळविण्यासंबंधीचे काम होत आहे. आणि हे करण्याकरता महाराष्ट्रापुरता विचार केला, तर राज्याचे मुख्यमंत्री आणि त्यांच्या मंत्रीमंडळातील एक दोन मंत्री यांनी त्या कामासाठी वाहून घेतलेले दिसत आहे. अनेक लोकांना ते फोन करतात.

एका बाजूला हे काम आहे. आणि दुसऱ्या बाजूला आमच्याकडे अनेकांच्या तक्रारी आहेत की, त्यासाठी काही एजन्सीचा वापर केला जातो. उदा. केंद्र सरकारकडील इन्फोरमेशन डिपार्टमेंट, त्यानंतर सीबीआय, त्यानंतर राज्य सरकारकडील अंटी करप्शन. या ज्या विंग आहेत, विभाग आहेत, संस्थांचा वापर लोकप्रतिनिधींना धमकावण्यासाठी केला जात आहे, असं आहे. त्याशिवाय राज्य सरकारकडे असलेली किंवा फक्त राज्य सरकारकडे असलेली संस्था. उदा. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, अशा संस्थांचाही वापर, ज्या ठिकाणी लोकप्रतिनिधी एखाद्या सहकारी संस्थेत आहेत, आणि ती संस्था आर्थिक अडचणीत असेल, तर त्या संस्थेला आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी या संस्थेचा वापर करून पक्षांतराच्या अटीवर या संस्थांचा वापर पूर्णपणाने केला जातो.

याचे उदाहरण द्यायचे झाले तर, सोलापूर जिल्ह्यातील

राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नेते भाजप–शिवसेनेत प्रवेश करत आहेत. त्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका मांडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पुणे येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेचा वृत्तांत....

# पक्षांतरासाठी केंद्र व राज्य सरकारकडून सत्तेचा गैरवापर

## राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचा आरोप

एक साखर कारखाना, पंढरपूर तालुक्यातील, त्याचे प्रमुख होते, कल्याणराव काळे. ते पाच वर्षांपूर्वी विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार होते. त्यांचा कारखाना अडचणीत होता. ते माझ्याकडे आले होते. पण आम्हाला काही शक्य नव्हते. नियमात बसत नव्हते. पण, राज्य सरकारने त्यांना 30- 35 कोटी रुपये नियम सोडून दिले. आणि त्यांना अट घातली पक्षांतराची. आणि त्यांनी पक्षांतर केले, कारण त्यांना ती संस्था टिकवायची होती. याचा अर्थ संस्था अडचणीत असलेल्या संस्थाचालकावर या पद्धतीने दबाव आणून, सत्तेचा गैरवापर करून त्याला पक्षांतरासाठी धाक दाखवून पक्षांतरासाठी भाग पाडले जात आहे.

दौंड तालुक्यामध्ये भीमा पाटस साखर कारखाना आहे. त्या कारखान्याचे अध्यक्ष रासपचे आमदार आहेत. त्या कारखान्याकडे पुणे जिल्हा सहकारी बँकेचे 160 कोटी रुपये कर्ज थकलेले आहे. एनपीएला नवीन कर्ज देण्यासंबंधीच्या मर्यादा आहेत. पण, त्यांना दोन वर्षांपूर्वी 35 कोटी रुपये दिले. आणि आता परत त्यांना काही रक्कम देण्यासंबंधीचा निर्णय झाला आहे. हा दबाव त्यांच्यावर आहे. प्रत्यक्ष रकमेचे झालेले नाही. माझ्या माहितीप्रमाणे झाले नसावे. पण तिथं त्यांच्यावर तशा पद्धतीचा दबाव आणण्याची काळजी घेतली गेली. आणि त्यांना सांगितले गेले की, तुम्ही लोकसभेची निवडणूक लढवली पाहिजे. आणि मग त्यांना इच्छा असो किंवा नसो, त्यांना त्या ठिकाणी त्यांच्या कुटुंबियांना लोकसभेची निवडणूक लढायला लागली. म्हणजे त्यांना उमेदवार हवा असेल आणि मिळत नसेल, तर अशा आर्थिक अडचणीत सापडलेल्या एखाद्या सहकारी संस्थेचा लोकप्रतिनिधीला अशा पद्धतीने म्हणजे चौकटीत बसत नसेल तर त्यात बदल करून त्यांचा राजकीयदृष्ट्या वापर केला जातो.

आणखीही उदाहरणे दिसतात. त्यात दोन महत्त्वाची महाराष्ट्राच्या विधानसभेचे सदस्य आहेत. राज्य सरकारमध्ये ते महत्त्वाच्या खात्याचे मंत्री होते. पहिलं उदाहरण आहे, छगन भुजबळ यांचे. तुम्हाला सर्वांना माहिती आहे की, त्यांच्यावर खटला भरला आहे. त्यांना जेलमध्ये टाकले होते. त्यांच्यावर आरोप काय आहे, मी सगळे कागदपत्र बघितले, एका कन्स्ट्रक्शन कंपनीला टीडीआर, मुंबईच्या झोपडपट्टीमध्ये जागा आहे सरकारची, त्या जागेवरचा टीडीआर एका कंपनीला देऊ केला आणि त्याच्या बदल्यामध्ये दिल्लीत महाराष्ट्र सरकारचे महाराष्ट्र सदन बांधले. दिल्लीमध्ये सगळ्या राज्यांचे लोक माझ्याकडे येतात आणि अनेक पक्षांचेही लोक येतात. आणि सगळ्यांची चर्चा चालते की, सगळ्यात उत्तम सदन कोणाचे असेल तर ते महाराष्ट्राचे आहे. ते महाराष्ट्र सदन भुजबळांच्या मार्गदर्शनाखाली बांधण्यात आले. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षही त्यांच्या काही महत्त्वाच्या बैठका महाराष्ट्र सदनमध्ये घेतात. प्रधानमंत्रीही तिथे गेलेले आहेत. अशी उत्तम वास्तू बांधली की, जी महाराष्ट्राला भूषण आणि लोकांना उपयोगी पडणारी आहे. या वास्तूचे वैशिष्ट्य असे आहे की, त्याच्यासाठी महाराष्ट्राच्या तिजोरीतून एक नवा पैसा खर्च झालेला नाही. त्या टीडीआरमधून ते बांधून देण्याचे काम झालेले आहे. त्या कंपनीला त्या टीडीआरमधून महाराष्ट्र सरकारचा हा एक प्रकल्प, मुंबईत दुसरा आधुनिक प्रकल्प, आणि मुंबईत नवीन गेस्ट हाऊस बांधून देणे, या तीनही गोष्टी या टीडीआरमधून बांधून द्यायच्या आणि यासाठी महाराष्ट्राच्या अंदाजपत्रकातून एक नवा पैसाही खर्च झालेला नाही. आणि निर्णय भुजबळांनी घेतलेला नाही. हा मंत्रीमंडळाचा निर्णय आहे. आणि तो मंत्रीमंडळाचा निर्णय असून राबविल्यानंतर त्या विभागाचा जो मंत्री असेल आणि त्याच्यावर खटला भरून त्याला तुरुंगात टाकणे, हे काय आहे आणि कुठल्या कायद्यात बसते. ठिक आहे, तो कायदेशीर भाग आहे. त्यामुळे त्याच्यावर मी अधिक भाष्य करू शकत नाही.


नवी दिल्लीतील
महाराष्ट्र सदन

दुसरे एक मंत्री होते आमच्या मंत्रीमंडळात, हसन मुश्रीफ. त्यांना भाजपात यावं, असं एका मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले. त्यांनी त्याबाबत उत्तर दिल्यानंतर त्यांच्याकडे दोन दिवसांपूर्वी ईडीची रेड पडली. त्यांच्या साखर कारखान्यावर पडली. त्यांच्या घरावर पडली. त्यांचे नातेवाईक पुण्यात कुठे तरी राहतात, त्यांच्याकडे आले. आणि शेवटी त्याच्यातून काही मिळाले नाही. ते हात हलवत परत गेले, अशी बातमी माझ्या वाचनात आली. त्यांना विचारले, त्यांनी सांगितले की,



ते येऊन गेले. माझी तपासणी केली. आणि परत गेले. त्यांना काही मिळाले, असं वाटत नाही. पण निर्वाचित लोकप्रतिनिधी, जुने मंत्री यांना राजकीय भूमिका वेगळी मांडतात, त्यासाठी या एजन्सीचा वापर या पूर्वी कोणी कधी केला नव्हता.

आजच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली की, आमच्या पक्षात महिलांसाठी काम करणाऱ्या एक भगिनी होत्या. त्या पक्ष सोडून गेल्या. त्यांचे नाव चित्रा वाघ. त्या दोन दिवासंपूर्वी मला भेटायला आल्या. त्या थोड्या चिंतेत होत्या. मी त्यांना विचारले की, काही बरं नाही का. त्यांनी सांगितले की, माझ्या पतीवर एक क्रिमीनल केस केलेली आहे. आणि त्या काही सहकारी संस्था चालवतात. त्या संस्थावर केस करण्यासाठी दोन प्रकरणे एसीबीकडे पाठवली. नवऱ्याच्या केसमुळे मला इतका त्रास आहे आणि आता ह्या दोन केस एसीबीकडे पाठवून हा त्रास मला काही सहन होत नाही. म्हणून मला तुम्ही बाहेर जायला परवानगी द्या. म्हणून मला नाईलाजाने असा निर्णय घ्यावा लागतोय. मी सांगितले की, आम्ही दुर्दैवाने त्यात काही मदत करू शकत नाही. मॅटर कोर्टाकडे आहे आणि दुसरं एसीबीकडे पाठवलेले आहे.

ही सगळी उदाहरण काय सांगतात की, सत्तेत गैरवापर करून निवडून आल्यानंतर कुठल्याही टोकाला जाण्याची भूमिका राज्यकर्त्यांनी केलेली दिसत आहे. आणि हे महाराष्ट्रात निवडणुका दोन ते अडीच महिन्यांवर आल्यामुळे जास्त दिसत आहे. पण, हे महाराष्ट्रपुरते मर्यादित नाही. दोनच दिवसांपूर्वी कर्नाटकात नवीन सरकार आले. जे मुख्यमंत्री गेले, त्यांचा आणि माझा संपर्क होता. ते मला सांगत होते की, काय चाललंय. पक्षांतरबंदी कायद्यानुसार दोन तृतीयांश लोकांनी पक्षांतर केले तर ते करता येते. पण, इथं आठ- दहा लोक जेडीयु आणि काँग्रेसचे त्यांना बाहेर काढले आणि मुंबईत आणून ठेवले. ते अनेक दिवस मुंबईत होते, हे सगळ्यांना ठाऊक होते. त्यांना भेटायला कर्नाटकातील एक मंत्री आले. त्यांना नंतर अटक केली. हे काय कायद्याचे राज्य आहे का, हे नक्की सांगता येत नाही. त्या लोकप्रतिनिधींना अटक करण्याचे कारण काय. त्यांचे त्या हॉटेलमध्ये बुकिंग होते. हॉटेलमध्ये बुकिंग केल्यानंतर ती व्यक्ती जर हॉटेलमध्ये येत असेल आणि त्यांना जर तुम्ही म्हणत असाल की, तुम्ही यायचे नाही, या लोकांची तुमच्याबद्दल तक्रार आहे. तुमच्या येण्याने त्यांच्या जीवाला धोका आहे, असं सांगून त्यांना त्या ठिकाणी अडवण्यात आलं. त्यांनी भूमिका घेतली की, इथं माझं बुकिंग आहे, मी येणार. शेवटी त्यांना अटक केली. एक लोकप्रतिनिधी, सरकारचा प्रतिनिधी आपल्या सहकाऱ्यांना डांबून ठेवले आहे, असं कळल्यानंतर आला, तर त्यांना तशी वागणूक दिली. त्या लोकांना शेवटी जाऊ दिलं नाही. आणि मग बहुमत नाही म्हणून नवीन मुख्यमंत्री त्या ठिकाणी आले. आता पाहू ते किती काळ टिकतायेत. अशा पद्धतीचा सत्तेचा गैरवापर टोकाचा पूर्वी पाहिलेला नाही. आता हे कर्नाटकात झालं. ते आता मध्यप्रदेशात सुरू होईल. मध्य प्रदेशात तिथल्या भाजपच्या एका आमदाराने सभागृहात सांगितले की, 24 तासांच्या आत मी सरकार पाडून दाखवतो. अशा पद्धतीची धमकी सदनामध्ये दिली जाते. याचा अर्थ सत्तेचा गैरवापर करून आम्ही असे आणखी काही उद्योग करू शकतो. हे सरकार पाडू शकतो. राज्य सरकार अस्थिर करण्यासंबधीचे काम जे कर्नाटकात केले, तशा पद्धतीचा प्रकार येथेही चालू झालेला आहे. याच बरोबर राजस्थानमध्ये काँग्रेसचे



कर्नाटकातील काँग्रेसचे नेते शिवकुमार हे मुंबईत वास्तव्यास असलेल्या बंडखोर काँग्रेस आमदारांना भेटण्यासाठी मुंबईत आले असता महाराष्ट्र पोलिसांनी त्यांना हॉटेलात जाऊ न देता जबरदस्तीने पुन्हा विमानतळावर पाठविले.

सरकार अस्थिर करण्यासंबधीचा प्रयत्न चालू आहे.

आता हे सगळं दिसत आहे. एका बाजूला देशात स्थिर सरकार असलं पाहिजे. विविध राजकीय पक्षांच्या विचारांचा आम्ही सन्मान करतो. या प्रकारची भाष्य सत्ताधारी पक्षाकडून आम्ही दिल्लीत आणि संसदेत पाहतो. आणि अशा पद्धतीने जिथं त्यांच्या मनाविरूद्ध जनतेने निर्णय घेतला, अशी जी राज्ये आहेत, ही राज्ये अस्थिर कशी केली जातील, त्यासाठी पावले टाकली जात आहेत. हे लोकशाहीला, संसदीय लोकशाहीला एक प्रकारचा एक मोठा आघात करण्याची वृत्ती आज या राज्यकर्त्यांमध्ये दिसत आहे.

या सगळ्या गोष्टींना लोकशाही पद्धतीने उत्तर द्यावे लागेल. सुदैवाने निवडणुका जवळ आहेत. त्यात भूमिका आम्हाला घेता



मुंबईच्या हॉटेलात राहिलेले कर्नाटकातील काँग्रेसचे बंडखोर आमदार

येईल. त्याची काळजी आम्ही निश्चितपणाने घेऊ. मला श्रीगोंद्याचे आमदार राहुल जगताप यांचा फोन आला होता. त्यांनी सांगितले की, माझ्याबद्दलच्या बातम्या येत आहेत. पण, माझी भूमिका पक्षाविषयी कुठेही वेगळी नाही. संग्राम जगताप यांचाही मला येथे येण्यापूर्वी फोन आला होता. त्यांनी सांगितले की, तुमची प्रेस आहे तर त्यात सांगा की, मी पक्षासोबतच आहे. त्यामुळे हेही खरं आहे.

तसेच, श्री. पिचड यांनी वेगळी भूमिका घेतल्याचे आम्हाला कळवले आहे. त्यांचे निवेदन छापून आलेले आहे की, सत्ताधारी पक्षासोबत राहिल्यास मतदारसंघाला न्याय देता येतो. त्यासाठी हा निर्णय घेतला. माझ्याबद्दल सद्भावना व्यक्त केल्या, त्या बद्दल मी त्यांचा आभारी आहे. पण, हा निर्णय घेतला म्हणून सांगितले. ठिक आहे. मला एकच आठवण झाली की, पाच वर्षे ते विरोधी पक्षाचे नेते होते. त्या काळात हा विकासाचा प्रश्न त्यांना कधी आला नाही. या सरकारच्या काळात वेगळी भूमिका घेतल्यामुळे आला असेल, त्यामुळे कदाचीत त्यांनी हा निर्णय घेतला असेल. त्याच्याबाबत मला भाष्य करायचे नाही.

पण, हे चित्र कधी महाराष्ट्रात नव्हते. या पद्धतीचा सत्तेचा वापर कधी महाराष्ट्रात झालेला नाही. म्हणून या सगळ्या गोष्टींचा आम्ही निषेध तर करतोच, या सगळ्या गोष्टींना तोंड देण्यासाठी आम्ही समर्थ आहोत, आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये बेतलेल्या या गोष्टीचा तोंड देण्याची उर्मी आहे. अखंड माझा फोन चालू आहे. जिल्ह्याजिल्ह्यातून कार्यकर्ते मला कळवत आहेत. नव्या पिढीच्या कार्यकर्त्यांना या परिस्थितीला तोंड देण्याचा उत्साह आहे.

माझ्यापुरता हा विचार केला तर हे मला काही नवीन नाही. यापूर्वी दोन- तीन वेळा मी अशी परिस्थिती बघितलेली आहे. एकेकाळी 70 आमदार असताना मी सहावर आलो. 70 चा मी विरोधी पक्षाचा नेता होतो, तो मी 6 चा विरोधी पक्षनेता झालो. हेही मी बघितले आहे. पण, त्याच्यानंतर जे जे गेले, ते ते सगळे पराभूत झाले. त्यानंतर नवीन निवडून आणले. असं एकदा नाही, दोनदा झाले. त्यामुळे अशी परिस्थिती झाल्यानंतर पक्षाची वाढ नवीन पिढीला घेऊन करता येईल आणि उभारणी करता येईल. याची कामगिरी आम्ही सगळे मिळून करतो. याच्यासंबंधीची सुरवात आमच्या कार्यकर्त्यांनी केली आहे. आमचे नेते मुलाखती घेणे वगैरे कामाच्या प्रक्रियेत आहेत. मासेसमध्ये जाण्याचा कार्यक्रमही आमचे अध्यक्ष जयंतराव पाटील हे आज- उद्या जाहीर करतील.

# नव्या पिढीला संधी देणार


**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यात पत्रकारांशी साधलेला संवाद...**

**पत्रकार- दिलीप सोपले आणि बबनदादा शिंदे हेही पक्षांतर करत आहेत, अशी चर्चा आहे...**

**शरद पवार-** चर्चा आहे, पण दिलीप सोपल हे आता माझ्यासोबत कार्यक्रमाला होते, हे तुम्ही कोणी पाहिलेले दिसत नाही. बबनदादा मला भेटायला येत आहेत. त्यांचा मला फोन होता.

**पत्रकार- साहेब, आपल्याकडे आतापर्यंत सहकार वगैरे क्षेत्रातील उमेदवार होते, आता तुम्ही नवीन पिढीला संधी देणार का...**

**शरद पवार-** आमचे तरुण जबाबदारीला घाबरत नाहीत. एत्किंचितही घाबरत नाही. आम्ही महाराष्ट्रामध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढवत आहेत. जागेच्या वाटपासाठीची चर्चा चालू आहे. दोन्ही पक्षाचे प्रमुख लोक त्यासाठी बसत आहेत. त्यात मी नाही. आमचे राज्याचे अध्यक्ष, दिलीप वळसे पाटील आहेत. आणखी ज्येष्ठ सहकारी आहेत. 125- 125 जागा लढवायच्या यात एकवाक्यता आहे. 240 जागांबाबत एकमत आहे. बाकी राहिलेल्या 48 जागा आहेत, त्यासाठी हेच





**विधानसभा निवडणुकीसाठी पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या मुलाखती घेताना, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, विद्या चव्हाण, वंदना चव्हाण, नूतन महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर आणि चेतन तुपे**

दोन्ही पक्षाचे लोक, अन्य पक्षांशी बोलत आहेत. त्याच्यामध्ये स्वाभीमानी शेतकरी संघटना आहे, शेतकरी कामगार पक्ष आहे. त्याच्यामध्ये कवाडे यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्ष आहे. असे सगळे घटक आहेत. त्यांच्याशी बोलणी चालू आहे. आणि मला वाटतंय आठ– दहा दिवसांत उमेदवारांची नावेही मतदारसंघनिहाय जाहीर करून कामला सुरवात करू.

**पत्रकार– बाळासाहेब थोरात म्हणाले की, मनसेला सोबत घेण्याचा निर्णय झालेला नाही. नक्की मनसेबाबत काय भूमिका आहे.**

**शरद पवार–** निर्णय झालेला नाही. मला मनसेचे नेते मुंबई– दिल्लीत येऊन भेटले होते. त्यांची काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याशीही भेट झाली. त्यांच्या भेटीच्यासंबंधीचे वृत्त मला सांगितले. त्यांचा आग्रह एका गोष्टीचा आहे की, हे जे ईव्हीएमचे मशिन आहे, त्याबाबत त्यांच्या तीव्र भावना आहेत. त्याबाबत काही तरी वेगळी निर्णय घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे. त्यांचे म्हणणे आहे की, इलेक्शनवरतीच बहिष्कार टाका. अशी मागणी मान्य होत नाही. ईव्हीएमबाबत सर्वच पक्षांची नाराजगी आहे. कोर्टातसुद्धा आता मॅटर गेलेले आहेत. एकदम बहिष्काराबाबतच्या निर्णयावर कोणी आलेले नाही. नऊ ऑगस्टला क्रांती दिनी याबाबत महाराष्ट्रात आणि देशात जनजागृती करावी, असं चर्चेला आहे. त्याचे कार्यक्रम आखले आहेत. त्याचा आग्रह मनसेच्या नेत्यांचा आहे.



राज ठाकरे यांनी शरद पवार यांची भेट घेऊन ईव्हीएम मशिनला विरोध केला.

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



राज ठाकरे यांनी सोनिया गांधी यांची नवी दिल्लीत भेट घेऊन ईव्हीएम मशिनवर निवडणुका घ्यायला विरोध केला.

त्याच्यामुळे प्रत्यक्षपणाने जागेच्या बाबतीत त्यांची चर्चा केलेली नाही.

**पत्रकार– राष्ट्रवादी काँग्रेस नवीन पिढीला हाताशी घेऊन भाजपशी ताकदीने लढणार आहे. त्यावेळी तुम्हाला काँग्रेसची कशी साथ आहे.**

**शरद पवार–** काँग्रेसने आता बाळासाहेब थोरातांकडे जबाबदारी दिली. बाळासाहेबांमुळे दोन्ही पक्षात अधिक सामंजस्य राहील आणि चांगले काम होईल.

**प्रश्न– पण, तुमच्या पक्षाच्या नेत्यांकडून अशी वक्तव्ये येतात की, आमची ताकद वाढलेली आहे, काँग्रेसचा एकच खासदार आहे. त्यावेळी तुम्ही असं म्हणताय...**

**शरद पवार–** हे तुम्ही म्हणताय, हे काही माझ्या वाचनात आलेले नाही. ज्यावेळी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पहिल्या बैठकीत 100- 100 जागा लढायचे ठरले, त्यानंतर कोणाची ताकद वाढली, हे आकड्यावरून दिसत नाही. आणि कोणी बोललो असेल तर त्याचे देणेघेणे नाही. लहान पक्ष असेल तर त्याच्याशी, स्वाभिमानी लहान पक्ष आहे. तो भांडतोय. एका भागात त्यांचा विचार आहे. त्यांच्या विचारांना पाठिंबा देणारा एक वर्ग आहे. त्यामुळे त्यांची ताकद किती आहे, असं मोल आम्ही करत नाही.

**पत्रकार– बाळासाहेब थोरात म्हणाले की, वंचितमुळे आमच्या नऊ जागांवर परिणाम झाला. वंचितला सोबत घेणार, अशी काही चर्चा आहे का...**

**शरद पवार–** मी या प्रक्रियेत कुठे नसतो. माझ्या वाचनात एक आले की, सांगलीतून एक स्टेटमेंट होत आहे की, आम्ही सगळ्या जागा लढवत आहोत. यात किती तथ्य हे मला माहिती नाही. जर आघाडीचा विचार करत असेल तर, मी असं नाही म्हणणार की, मी सगळ्या जागा लढवणार. इतरांसाठीही जागा ठेवण्याच निकाल आम्हाला घ्याला लागेल.

**पत्रकार– महाराष्ट्राच्या बाहेरही लोक पक्षांतर करत आहेत. तेथेही एजन्सीचा वापर केला जातोय का...**

**शरद पवार–** एजन्सीचा वापर होतोय. शिवसेना-भाजपशिवाय इतरांवर दबाव होतोय, पण हे जिथं निवडणुका आहेत, तिथं जास्त होतय.

**पत्रकार– मोहिते, पिचड सोडून गेले, एक पिढी गेली. त्यामुळे नवीन पिढी घडवायला राष्ट्रवादीला उशीर झाला, असं वाटत नाही का...**

**शरद पवार–** पिढी घडवणे हे चालू असते. ती एक प्रक्रिया असते. काँग्रेस 1885 साली स्थापन झाली. तिथंपासून आजपर्यंतचा प्रवास आहे. त्या त्या परिस्थितीशी खेळत असते. आता मी निवडणूक लढवलेली नाही. याचा अर्थ काय. मी निवडून आलो असतो, हे तुम्ही मान्य करा. मी निवडणुकीला घाबरलो नाही. पण, आपण थांबलो पाहिजे, नव्या पिढीला संधी दिली पाहिजे.



**पत्रकार– साहेब, तुम्ही हे एजन्सीचे सांगितले. राज्यात कधी नव्हते, असं सूडाचे राजकारण सुरू झाले आहे का..**

**शरद पवार–** दबाब सुरू आहे. खटले भरणे सुरू आहे.

**पत्रकार– विधानसभेच्या निवडणुका मतपत्रिकांद्वारे अशी मागणी तुम्ही करणार का..**

**शरद पवार–** आम्ही हे केंद्रातच केले आहे. आम्ही एक पत्र तयार केले, त्याच्यावर काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांची सही आहे. त्याच्यावर माझी सही आहे. ममता बॅनर्जी यांची सही आहे. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांची सही आहे. काल कर्नाटकात मुख्यमंत्री गेले आहेत, त्यांची सही आहे. चंद्राबाबू नायडू यांची सही आहे. आमचे एक शिष्टमंडळ गेले. त्याला काही संमती मिळालेली नाही. त्यामुळे आम्ही आता कोर्टातही गेलेलो आहोत.

**पत्रकार– राज्यात काही ठिकाणी दुष्काळीस्थिती असताना मुख्यमंत्री यात्रा काढत आहेत आणि शिवसेनेनी पीक विम्याबाबत घेतलेली भूमिका आपल्याला काय वाटते..**

**शरद पवार–** याच्यामध्ये काय आहे की, मुख्यमंत्र्यांनी प्रचाराबाबत दौरा काढला तर मी काही दोष देणार नाही, कारण ते एका राजकीय पक्षाचे प्रमुख आहेत. मी पण फिरतोय, माझ्यावरही ती टीका होईल. पण दुष्काळाबाबत जी खबरदारी घ्यायला हवी, ती खबरदारी घेतलेली नाही. याच्याबद्दलची तीव्रता व नाराजी शिवसेनेच्याही लक्षात आली. त्यामुळे त्यांनी पीक विम्याची भूमिका घेतलेली नाह. आजच्या राज्यकर्त्यांना याचे गांभीर्य नाही, हे लोकांची जी तक्रार आहे, त्याला शिवसेनेच्या आंदोलनाने पुष्टी मिळते. पण आता पावसाचे चित्र बदलत आहे. अनुकूल दिसत आहे.

**पत्रकार– लोकसभेवेळी सांगितले होते की, छोट्या**





राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी सौ. रुपाली चाकणकर यांची नियुक्ती झाल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. त्यावेळी शेजारी विद्याताई चव्हाण व वंदनाताई चव्हाण

**छोट्या पक्षांना सोबत घेणार, आता विधानसभेलाही तशी भूमिका आहे का...**

**शरद पवार–** काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची तशीच भूमिका आहे. दोन्ही पक्षांतही संमती झालेली आहे. छोट्या पक्षांसोबत चर्चा करणार आहे. ती प्रक्रिया सुरू आहे. त्यांना दूर करणार नाही.

**पत्रकार– कर्नाटकानंतर राजस्थान व मध्य प्रदेशातही तशीच परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. काय, त्यासाठी केंद्र सरकारचा दबाव आणला जात आहे का..**

**शरद पवार–** गोष्ट अगदी सरळ आहे. सत्तेचा गैरवापर केल्याचा कर्नाटकात दिसले. हेच राजस्थान व मध्य प्रदेशात दिसत आहे.

**पत्रकार– हर्षवर्धन पाटील म्हणतात की, काँग्रेसने बारामतीत आघाडीचा धर्म पाळला, आता विधानसभेला राष्ट्रवादी आघाडी धर्म पाळेल, अशी माझी अपेक्षा आहे...**

**शरद पवार–** सहाजिकच आहे. आघाडीचा धर्म पाळायचा आहे.

**पत्रकार– इंदापूरची जागा काँग्रेसला सोडणार का...**

**शरद पवार–** हे मला माहिती नाही. आघाडीची चर्चा चालू आहे. कोणती जागा सुटणार आणि मिळणार, हे राज्यातील दोन्ही पक्षाचे नेते बसून ठरवतील. पण, एक साधी जी चर्चा झाली, त्यामध्ये असं म्हटले आहे की, इंदापूर माझ्या डोळ्यासमोर नाही, पण ज्यांच्या ज्या जागा निवडून आलेल्या आहेत, त्या त्यांच्याकडे राहाव्यात. असं एक सूत्र असतं

**पत्रकार– या वेळी फार्म्यूला तोच असणार का..**

**शरद पवार–** असंच सूत्र असंत, आणि एखाद दुसरा बदल होतो, तोही दोघांनाही मान्य असतील तर. पण, जी जागा ज्या पक्षाने जिंकली आहे, ती त्यांना ठेवायची, असं संकेत या वाटाघाटीत असतो.

**पत्रकार– विधानसभेच्या पाच वर्षापूर्वी झालेल्या निकालानंतर आपण दिलेला सरकारला पाठिंबा आणि आताची परिस्थिती, याकडे आपण कसं बघता...**

**शरद पवार–** निवडणुकीला सामोरे जाताना प्रश्न असतात. परिस्थिती कमीजास्त असते. पक्षाच्या भूमिकेतही काही बदल होत असतात. आलेल्या परिस्थितीला समर्थपणाने तोंड द्यायचे असते.

**पत्रकार– सचिन आहेर म्हणाले होते की मी जाण्यापूर्वी साहेबांना भेटले होते.**

**शरद पवार–** हो, भेटले होते की, ते म्हणाले की, त्यांचा जो मतदारसंघ आहे, जिथं ते मागच्या वेळी पराभूत झाले होते, तिथून परत निवडून येणे मला अशक्य आहे. त्या ठिकाणी ठाकरेंचे चिंरजीव उभे राहत आहेत, असं कळतय. त्या पक्षात मी जाऊ इच्छितोय.


**पत्रकार– भाजप एवढ्या मोठ्या प्रमाणात इतर पक्षातून लोक घेत आहेत, त्यातून असं वाटतंय का की, ते शिवसेनेला सोडून स्वतंत्र निवडणूक लढतील.**

**शरद पवार–** मला काही माहिती नाही. त्यांचे काय धोरण आहे ते.


**पत्रकार– माहिती अधिकार कायद्यात बदल केला जात आहे, त्याबाबत आपली भूमिका काय आहे.**

**शरद पवार –** माहिती अधिकार कायदा आम्ही तयार केला होता. त्यात बदल करून तो कमकुवत करण्याची तयारी चाललेली आहे. त्याच्या विरोधात आम्ही आहोत.











रोजगाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील चित्र असे निकृष्ट बनलेले असल्याने बिगर शेती उद्योगव्यवसायांतील रोजंदारीतील दरसाल वास्तव वाढीचा सरासरी दरही रोडावलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये, देशी बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले प्रमाण सणसणीतपणे वाढवण्याचे मनसुबे सरकार कशाच्या आधारे रचते आहे त्याचा पत्ताच लागत नाही. आर्थिक सर्वेक्षण अहवालानेही या मुद्याबाबत मिठाची गुळणीच धरलेली आहे.

# वास्तवाशी संबंध



# नसलेली धोरणदृष्टी

अभय टिळक






'बलदंड' असणे आणि 'निरोगी' असणे, या दोन अगदी वेगवेगळ्या बाबी आहेत. प्रचंड ताकद अंगामध्ये असलेला माणूस सर्वार्थाने निरोगी आणि निरामय असेलच, असे छातीठोकपणे सांगता येत नाही. कारण, ताकद अथवा बळ हा शरीरातील स्नायूंशी निगडित विषय आहे तर निरोगी असण्याचा अथवा नसण्याचा संबंध शरीरांतर्गत ज्या विविध व्यवस्था आहेत त्यांच्या निकोपतेशी जोडलेला आहे. शरीरातील चयापचयाची व्यवस्था, रक्ताभिसरण, मज्जासंस्था, पचनप्रणाली यांसारख्या व्यवस्था निकोप असणे हे बळकट आणि फुगलेले दंड असण्यापेक्षाही महत्त्वाचे ठरते. जो न्याय मानवी शरीराला लागू पडतो तोच न्याय देशाच्या अर्थव्यवस्थेलाही लागू होतो. आणि म्हणूनच, आपल्या देशाची अर्थव्यवस्था 2024-25 सालापर्यंत पाच लाख कोटी डॉलर इतक्या आकारमानाची बनवायची की खुरटलेली शेती, बेरोजगारी, कुंठित ग्रामीण अर्थकारण, अस्ताव्यस्त पसरलेले नागरीकरण, कंत्राटीकरण आणि हंगामीकरणाची लागण झालेला रोजगार, प्रचंड वाढत असलेली आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील प्रादेशिक विषमता...अशांसारख्या स्ट्रक्चरल दोषांनी व्यापलेली भारतीय अर्थव्यवस्था निरोगी बनवायची याचा निवाडा करणे आता कळीचे बनलेले आहे. केंद्रामध्ये सत्तेवर असलेल्या मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारला गुणवत्तेपेक्षाही आकारमानाचेच आकर्षण कमालीचे अधिक असल्याने भारतीय अर्थव्यवस्था येत्या पाच वर्षांदरम्यान पाच लाख कोटी डॉलरवर नेऊन पोहोचविण्यासाठी त्याने चंग बांधावा याचे म्हणूनच आश्चर्य वाटत नाही. 2018-19 या वित्तीय वर्षासाठीचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल असो अथवा 2019-20 या वित्तीय वर्षासाठीचे अंदाजपत्रक असो, देशाच्या अर्थकारणासंदर्भात सरकारच्या धोरणविषयक दृष्टीचे ऐलान करणाऱ्या या दोन्ही दस्तऐवजांमध्ये 'पाच लाख कोटींची अर्थव्यवस्था' या एकाच बाबीचा इतका उदोउदो केलेला आहे की त्याच्या धुराने भरलेली सरकारची धोरणदृष्टी अर्थव्यवस्थेतील अंगभूत वैगुण्यांकडे सरसहा दुर्लक्ष करण्यासाठी निबरपणे सरसावलेली आहे, या वास्तवाची चिंता वाटल्याखेरीज राहत नाही.

स्वप्न बघणे गरजेचे असतेच. परंतु, डोळ्यांपुढे तरळणारे स्वप्न आणि ज्या भूमीवर आपले पाय रोवलेले असतात त्या जमिनीवरील वास्तव यांच्यात ताळमेळ नसेल तर स्वप्नांचा पाठपुरावा करताना भरकटले जाण्याचा धोका अतिशय मोठा असतो. मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारला हे खडबडीत वास्तव तितक्याच रोखठोकपणे सांगणाऱ्या अर्थवेत्त्याची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कदाचित म्हणूनच, असा निर्भीड अर्थतज्ज्ञ आपल्या परिसरात कोठेही नसावा याची काटेकोर दक्षता

माननीय पंतप्रधान आणि त्यांचे कळसुत्री बाहुलेबाज मंत्रिमंडळ गेली पाच वर्षे सातत्याने घेत आलेले आहे. डॉ. रघुराम राजन, डॉ. अरविंद पानगढिया, डॉ. अरविंद सुब्राह्मण्यन, डॉ. ऊ र्जित पटेल, डॉ. विरल आचार्य...यांच्यासारखे अर्थकारणातील प्रगल्भ मोहरे या सरकारने आजवर खड्यासारखे वेचून बाहेर काढले. अभ्यास, संशोधन, व्यासंग, निरपेक्ष व तटस्थ सल्ला, अर्थकारणाची प्रकृती सुधारावी यांसाठी कडू चाटण देण्याची निर्मम तयारी या सगळ्याचीच मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारला प्रचंड 'अॅलर्जी'



आहे. एकचालकानुवर्तित्वाच्या तत्त्वज्ञानावर श्रद्धा असणाऱ्या मानसिकतेला स्वयंप्रज्ञांच्या नि:स्पृहतेची कायमच भीती वाटत असते. त्यांत भरीस भर म्हणून की काय, देशाच्या आद्य पंतप्रधान असणाऱ्या पंडित नेहरूंना ज्या ज्या गोष्टींबाबत आदर होता, ज्या ज्या प्रणाली त्यांनी स्वतंत्र भारतामध्ये रु जविण्याचा प्रयत्न केला ते ते सगळे पश्चिमेकडून आयात केलेले असल्याने त्यांची आपल्या समाजव्यवहारातून उचलबांगडी करण्याचा तर या सरकारने चंगच बांधलेला आहे. पहिल्या फटक्यात मोदी यांनी नियोजन आयोग बरखास्त केला. मंत्रिगटांच्या माध्यमातून निर्णय प्रक्रियेला चालना देण्याचा पायंडा मोडीत काढला. प्रचारमाध्यमांशी संवाद बंद करून टाकला. देशाच्या अर्थविषयक धोरणावर पश्चिमी अर्थविचारांचा पगडा असल्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेतील बहुतेक दुरिते आज फोफावलेली आहेत, असे काही तरी तिरपागडे समीकरण या सरकारने प्रस्थापित केलेले आहे. त्यांमुळे, जे जे अर्थविचार, ज्या ज्या अर्थप्रणाली, जे जे आर्थिक सिद्धांत, जी जी 'मॉडेल्स' पश्चिमेकडून प्रसारित झालेली आहेत त्यांचा वरचष्मा खालसा करण्याचे व्रतच जणू या सरकारने घेतलेले आहे. 2018-19 या वित्तीय वर्षादरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेची स्थितिगती कशी राहिली याचा आलेख रेखाटणाऱ्या आर्थिक सर्वेक्षण अहवालामध्ये तर सरकारच्या या दूषित दृष्टीचा प्रत्यय अनेक ठिकाणी येतो. अहवालाच्या अगदी पहिल्याच प्रकरणापासून या वास्तवाची प्रचीती येऊ लागते. येत्या पाच वर्षांच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे जहाज कोणत्या दिशेने जावे या संदर्भात या सरकारने जी धोरणदिशा या




दस्तऐवजामध्ये शब्दबद्ध केलेली आहे तिच्या पुढ्यात आदर्श आहे तो चीनसह एकंदरच पूर्व आशियाई देशांचा. त्यांमुळे, आज भारतीय अर्थव्यवस्था ज्या सगळ्या आव्हानांचा सामना करते आहे त्यांचा मुकाबला करण्यासाठी वैचारिक कुमक पूर्व आशियाई देशांच्या पूर्वानुभवाद्वारे गोळा करण्याचा मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा आटापिटा आर्थिक सर्वेक्षण अहवालाच्या अगदी पहिल्याच प्रकरणात पानोपानी दृष्टोत्पत्तीस येतो. कोणत्याही देशाच्या पूर्वकालीन वाटचालीचा, त्यासाठी त्या देशाने त्या त्या काळात अवलंबलेल्या धोरणदृष्टीचा असा आंधळा आदर्श उराशी जपणे कितपत उचित आहे, असा प्रश्न विचारणेही सध्याच्या काळात राष्ट्रविरोधी कृत्य गणले जाईल!

भारतीय अर्थव्यवस्थेचे आकारमान येत्या पाच-चार वर्षांत पाच लाख कोटी डॉलरच्या घरात नेऊन ठेवायचे तर येत्या काळात देशी वास्तव ठोकळ उत्पादनामध्ये दरसाल सरासरी आठ टक्के दराने वाढ घडवून आणावी लागेल, असे हा आर्थिक सर्वेक्षण अहवालच सांगतो. हा वेग गाठायचा कसा आणि एकदा तो गाठला की टिकवायचा कसा, हे त्या नंतरचे आव्हान ठरते. आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार, पूर्व आशियाई देशांचा या संदर्भातील पूर्वानुभव इथे संदर्भासाठी उपयुक्त आहे. देशाच्या ठोकळ उत्पादनामधील दरसाल सरासरी वाढीचा दर सणसणीत पातळीवर आणि स्वयंपूर्ण राखण्यात तीन घटकांमधील परस्परपूरक चक्र उपकारक ठरते. बचत-गुंतवणूक-निर्यात हे ते त्रिसूत्री चक्र. यांत सगळ्यांत महत्त्वाची भूमिका जाते ती गुंतवणुकीकडे. त्यांतल्या त्यांतही पुन्हा, अधिक संवेदनशील सहभाग ठरतो तो खासगी गुंतवणुकीचा. एकदा का अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक वाढली की, त्या वाढलेल्या गुंतवणुकीमधूनच वाढीला उपकारक असे एक चक्र निर्माण होते आणि ते स्वयंपूर्ण पद्धतीने सक्रिय बनून राहते. गुंतवणुकीद्वारे अधिक प्रगत तंत्रशास्त्राचा अवलंब केला जातो. प्रगत तंत्रज्ञानाचा अंगीकार केल्याने उत्पादन प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या उत्पादक घटकांची उत्पादकता उंचावते. उत्पादकता उंचावली की संबंधित उत्पादक घटकांना अदा केल्या जाणाऱ्या परताव्यामध्ये वाढ घडून येते. श्रमिकांच्या वेतन व रोजंदारीमध्ये या माध्यमातून वाढ झाली की श्रमिकांची क्रयशक्ती सशक्त बनते. क्रयशक्ती वाढल्याने उपभोगाकडे प्रवृत्ती वाढते. त्यांतून







हरतहेच्या बाजारपेठांमध्ये असणारी मागणी वाढते. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी उत्पादन वाढवणे भागच असते. त्यासाठी मग अर्थव्यवस्थेतील प्रस्थापित उत्पादनक्षमतेमध्ये भर घालावी लागते. उत्पादनक्षमता वाढली की रोजगारसंधींच्या वाढीला चालना मिळते. रोजगार वाढला की क्रयशक्ती निर्माण होते. त्यांतून मागणीच्या निर्मितीचे दुसरे चक्र चालू होते...आणि मग हाच कार्यकारणभाव स्वयंगतीने कार्यरत राहतो. त्यांमुळे, मुदलात अर्थव्यवस्थेमधील गुंतवणूक वाढण्यावर अथवा वाढवण्यावर आर्थिक सर्वेक्षण अहवालात नोंदविण्यात आलेला भर सार्थ आहे आणि उचितही. प्रश्न फक्त एवढाच आहे की हे घडावे कसे.




त्याला कारणही तसेच आहे. संघटित कॉर्पोरेट विश्वामध्ये अंगीकारले जाणारे अत्याधुनिक तंत्रशास्त्र रोजगारसंधींमध्ये वाढ घडवून आणण्यास हातभार लावते, असा अलीकडील काही वर्षांतील अनुभव नाही. घडते आहे ते उलटेच. कृत्रिम बुद्धिमत्तेवर अधिष्ठित अशा अत्याधुनिक तंत्रशास्त्राच्या उपयोजनामुळे 'रूटीन' स्वरूपाच्या नोकऱ्यांवर जगभरात सगळीकडेच गदा येताना दिसते. केवळ इतकेच नाही तर, ज्या उद्योगांना वैश्विक स्तरावरील स्पर्धेला तोंड देत जागतिक बाजारपेठांत आपले तांब्याभांडे शाबूत राखावयाचे आहे अशा उद्योगांनाही आताशा कृत्रिम बुद्धिमत्ताधिष्ठित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याखेरीज गत्यंतर उरलेले नाही. जागतिक बाजारपेठांमध्ये टिच्चून उभे ठाकायचे तर वस्तू व सेवांचा दर्जा अत्युत्कृष्ट राखण्याबरोबरच त्यांच्या किमतींही स्पर्धात्मक राखणे भारतीय उद्योगांना क्रमप्राप्त ठरते आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची आजची स्थिती अशी आहे की, जमीन-श्रम-भांडवल हे उत्पादनव्यवस्थेतील तीनही प्रमुख उत्पादक घटक (जागतिक पातळीच्या तुलनेत) महाग आहेत. जमीन आणि भांडवल यांच्या किमती निश्चित करण्यामध्ये खुल्या बाजारपेठेइतकीच शासनसंस्थेच्या धोरणाची भूमिकाही निर्णायक ठरते. या दोन उत्पादनघटकांच्या दरांवर उद्योगांचे काहीच नियंत्रण नसल्याने त्यांच्याबाबतीत खर्चकपातीला फारसा वावच उद्योगांना नाही व नसतो. मग राहता राहिली श्रमशक्ती. कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब उत्पादनप्रणालीमध्ये वाढत्या प्रमाणात करून श्रमशक्तीवर होणाऱ्या खर्चात बचत घडवून आणत मालाच्या किमती स्पर्धात्मक राखण्याच्या मागे आज जागतिक स्पर्धेचा मुकाबला करणारे भारतीय कॉर्पोरेट विश्व आहे. केवळ तेवढेच नाही तर, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोजनावर बेतलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अंगीकाराद्वारे निर्माण व निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांची गुणवत्ताही अव्वल दर्जाची राखणे संघटित कॉर्पोरेट विश्वाला शक्य बनते. त्यामुळे, गुंतवणूक वाढून प्रगत तंत्रशास्त्राचा अवलंब केल्याने भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगारवाढीची चक्रे फिरायला लागतील, असे

सोपे व सरळ तर्कशास्त्र मांडता येणे सध्या तरी अवघडच आहे. या प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न आर्थिक सर्वेक्षण अहवालाने केलेला आहे. अहवालाने सादर केलेल्या तर्कानुसार, गुंतवणूक वाढली की भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भांडवली वस्तूंच्या (उदाहरणार्थ, यंत्रे व यंत्रसामग्री) उत्पादनाला चालना मिळेल. समांतरपणे उद्योगव्यवसायांतील संशोधन व विकासाला गती येईल. भांडवली वस्तूंची निर्मिती करणाऱ्या मोठ्या उद्योगांना आवश्यक असणारे सुटे भाग, यंत्रसामग्री, उपकरणे यांचा पुरवठा करणाऱ्या पूरक उद्योगांना सुगीचे दिवस येतील आणि या सगळ्या घुसळणीद्वारे अर्थव्यवस्थेतील रोजगार निर्मितीला गती येईल. हे सगळे तर्कशास्त्र पुस्तकांच्या पानात तंदुरुस्त आहे व दिसतेही. कार्यकारणभावाची ही साखळी व्यवहारात समूर्त-साकार होण्याला अडथळ्यांची भलीथोरली शर्यत पार करावी लागते.

या संदर्भातही आर्थिक सर्वेक्षण अहवालाचे एक पातळीवर प्राप्त परिस्थितीमध्ये त्यांच्या सोडवणुकीसाठी काही एक प्राधान्यक्रम अमलात आणणे भाग पडते इतकेच. आणि हे कोणत्याही सरकारला करावेच लागते. मग ते सरकार कोणत्या पक्षाचे आहे हा प्रश्न तिथे गैरलागू ठरतो. कारण, इथे मुद्दा पक्षाच्या नावाचा नाही तर धोरणांच्या व्यवहार्यतेचा आणि निवडलेल्या धोरणाच्या परिणामकारक तामिलीचा असतो. आर्थिक सर्वेक्षण अहवालाचे एक शिल्पकार असणारे सरकारचे नवनियुक्त मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. कृष्णमूर्ती सुब्राह्मण्यन यांना इतकाही किमान व्यवहारवाद ठाऊक नसेल, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल.

कोणत्याही गोष्टीचे तारतम्यहीन अनुकरण केवळ आचरटपणाचेच नव्हे तर हानिकारकही शाबीत होऊ शकते. भारतीय अर्थव्यवस्थेला 2024-25 सालापर्यंत पाच लाख कोटी डॉलरच्या घरात नेऊन बसवायचेच, असा एकदा चंग




निरीक्षणवजा प्रतिपादन दिसते. ते असे की, रोजगारनिर्मिती, मागणीतील वाढ, निर्यातीला चालना आणि या सगळ्यांतून निष्पन्न होणारी आर्थिक प्रगती या चार गोष्टींचा विचार सुटा सुटा करता येत नाही अथवा करून चालत नाही, असे अहवाल म्हणतो. मुळात, प्रश्नवजा कुतूहल असे आहे की, या चार बाबींचा विचार धोरणात्मक पातळीवर वेगवेगळा केला जातो अथवा आपल्या देशात तसा तो आजवर पृथकपणे केला जात होता, हा निष्कर्ष या अहवालाने पर्यायाने या सरकारने कशाच्या आधारावर काढला? हे चारही घटक एकमेकांत घट्टपणे गुंतलेले आहेत व असतात याची जाण अर्थशास्त्राशी किमान परिचय असणाऱ्या कोणाही सुज्ञाला असतेच. मात्र, या प्रश्नांवर तोडगा शोधतेवेळी धोरणात्मक बांधल्यानंतर, हे ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने सर्वाधिक कळीचा या दृष्टीने सध्याचे सत्तारू ढ सरकार गुंतवणुकीला केंद्रस्थानी ठेवते, असे या अहवालाचे पहिलेच प्रकरण नजरेखालून घातल्यानंतर आपल्या ध्यानात येते. गुंतवणूक वाढवण्यामध्ये शासनसंस्था आणि खासगी क्षेत्र हे दोन मुख्य भागीदार. यात अपेक्षित हे की, शासनसंस्थेने अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा वाढवण्याकडे सरकारी गुंतवणुकीचा प्रवाह वाढवावा. हे सगळे मूलभूत आर्थिक तर्काला धरूनच आहे, यात वाद नाही. परंतु, मुळात, 'बचत-गुंतवणूक-निर्यात' ही दमदार आर्थिक वाढीला इंधनपुरवठा करणारी हमीची त्रिसूत्री आहे, हा निष्कर्ष सत्तारूढ सरकारने ज्या निरीक्षणाच्या आधारे काढलेला आहे ते

उदाहरणच सध्या प्रस्तुत (रेलेव्हन्ट) आहे अथवा नाही, हा मुख्य प्रश्न होय. पंडित नेहरू आणि त्यांच्यामुळे यच्चयावत पश्चिमी अर्थविचारविश्व यांच्याबाबत नेत्रहीन तिटकारा असणाऱ्या सत्ताधारी सरकारने आता धोरणात्मक







बाबींसंदर्भात चार धडे गिरवण्यासाठी तोंड फिरवलेले दिसते ते पूर्वेकडे. 'बचत-गुंतवणूक-निर्यात' या त्रयीचा अवलंब करून भरघोस व नेत्रदीपक आर्थिक विकास एकेकाळी साध्य केलेल्या चीन व अन्य पूर्व आशियाई देशांचा हवाला आर्थिक सर्वेक्षण अहवाल या संदर्भात आवर्जून देतो. ही खुळेपणाची खरोखरच हद्द होय.


हा खुळेपणा अनेक पातळ्यांवरचा आहे. त्यांचा विचार एकेक करूनच करायला हवा. पहिली बाब म्हणजे, ज्या चीन व अन्य पूर्व आशियाई देशांच्या अर्थेतिहासाचा कित्ता सत्तारूढ सरकार सद्यःस्थितीत गिरवू पाहते आहे त्यांतील एक चीन सोडला तर अन्य देश कोणत्याही बाबतीत भारताशी साधर्म्य राखणारे नाहीत, ही बाब प्रथमच अधोरेखित करावयास हवी. सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, एकेकाळी स्वतंत्र असणारा हाँगकाँग, तैवान... हे सगळेच देश लोकसंख्येचा विचार करता भारताच्या तुलनेत अगदीच नगण्य ठरतात. आपल्या देशाची रचना, भूभाग, लोकसंख्या, संस्थात्मक व्यवस्था, जात-धर्म-प्रांत-वर्ण-भाषा-पेहराव-सवयी-व्यवसाय-परंपरा-संस्कृती या सगळ्यांत असणारी प्रचंड विविधता आणि त्यांतून उद्भवणारी गुंतागुंत या चिमुकल्या देशांच्या वाट्याला आलेली नाही. अशा सगळ्या देशांनी एकेकाळी अवलंबलेले आर्थिक विकासाचे 'मॉडेल' आपल्यालाही तितकेच वा तसेच फलदायी ठरेल, असे गृहितक मांडणे अतिशय जोखमीचे ठरते.

दुसरे म्हणजे, हे सगळेच देश लोकसंख्येच्या दृष्टीने मूठभर असल्याने त्यांना परदेशी बाजारपेठांवर अवलंबून राहण्याखेरीज पर्यायच नव्हता. आपल्या देशाची गोष्ट तशी नाही. तिसरे म्हणजे, मुळात चिमूटभर लोकसंख्या असणाऱ्या त्या देशांना औद्योगिक-आर्थिक विकासासाठी परकीय भांडवल व परदेशी तंत्रज्ञान यांचा आधार अपरिहार्य होता. म्हणूनच, परकीय थेट भांडवलाला पायघड्या अंथरण्याची धोरणदृष्टी त्यांनी अवलंबली. परंतु, 1990च्या दशकाच्या उत्तरार्धात अमेरिकी अर्थव्यवस्थेमधील व्याजदरांची सरासरी पातळी उंचावू लागल्यानंतर अमेरिकी कंपन्या व गुंतवणुकदारांनी पूर्व आशियाई देशांमध्ये गुंतवलेले आपले भांडवल घेऊन पुन्हा एकवार अमेरिकी अर्थव्यवस्थेचा पंथ धरला आणि परिणामी डॉलरच्या तुलनेत पूर्व आशियाई देशांच्या चलनांची जबर घसरण होऊन



त्या देशांच्या अर्थव्यवस्था पार जेरीस आल्या. हा सगळा गेल्या जेमतेम 25-30 वर्षांतील इतिहास आपल्या डोळ्यासमोरच आहे. पश्चिमी बाजारपेठांवरच सारी मदार असल्याने 2008 साली उद्भवलेल्या वैश्विक मंदीनंतर अमेरिकी बाजारपेठेतील मरगळीच्या झळा पूर्व आशियाई देशांना तीव्रपणे सोसाव्या लागल्या. त्यांची झळ आजही थंडावलेली नाही. या सगळ्यांतून आपण काहीच धडा शिकलो नाही अथवा शिकणार नाही, हेच या सरकारला आर्थिक सर्वेक्षण अहवालातील धोरणदिशेद्वारे सूचीत करायचे असेल तर भाग वेगळा. चिमुकला जीव असणाऱ्या देशी बाजारपेठा आणि मागणीच उणावलेल्या परदेशी बाजारपेठा अशा कात्रीमध्ये पूर्व आशियाई देशांच्या अर्थव्यवस्था अलीकडील काही वर्षांत अडकलेल्या आहेत.

सुमारे तीन दशकांपूर्वी उद्भवलेल्या त्या पूर्व आशियाई देशांमधील वावटळीमधून त्या वेळी चीन बचावला तो त्याच्या अवाढव्य आकारमानापायी. 1970च्या दशकाच्या अखेरीस चीनमध्ये आर्थिक पुनर्रचना पर्वाला प्रारंभ झाल्यापासूनच चिनी आर्थिक विकासाची सारी धोरणदिशा निर्यातोन्मुख राहिलेली आहे. परकीय थेट भांडवली गुंतवणुकीला लाल पायघड्या घालणे, त्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्रांसारखे (स्पेशल इकॉनॉमिक झोन्स - सेझ) प्रारूप विकसित करणे, देशी जनतेला उपभोगप्रवण बनवण्याऐवजी बचतप्रवण बनवणे, मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारे देशी मनुष्यबळ व परकीय भांडवल आणि तंत्रज्ञान यांच्या मिलाफातून वस्तुनिर्माण उद्योगाचे वैश्विक केंद्र बनवण्यासाठी योजनाबद्ध पावले उचलणे, चिनी मातीमध्ये केलेली निर्मिती परकीय बाजारपेठांमध्ये हातोहात खपावी यासाठी अमेरिकी डॉलर आणि चिनी चलन यांचा विनिमय दर कृत्रिमरीत्या चिनी चलनास अनुकूल राहील अशा पद्धतीने विनिमय दर 'मॅनेज' करणे, वीज, भांडवल, मनुष्यबळ यांसारख्या महत्त्वाच्या उत्पादनघटकांचे बाजारभाव कृत्रिमरीत्या दाबून ठेवून चिनी उद्योगांचा उत्पादनखर्च आटोक्यात राखून त्यांची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धाक्षमता बुलंद राखणे, चिनी शासनसंस्थेची मालकी असणाऱ्या सरकारी बँकांमधून चिनी सरकारच्या उद्योगांना सतत कर्जपुरवठा होत राहील याची काळजी घेणे...हे सगळे भरगच्च समृद्धीचे माप भरभरून पदरात घालणाऱ्या निर्यातप्रधान आर्थिक विकासाच्या चिनी 'मॉडेल'चे घटकावयव होत. हे सगळे जवळपास तीन दशके अशाच प्रकारे अबाधित राखणे चीनला शक्य बनले ते तिथे लोकशाही राज्यव्यवस्था नांदत नसल्यामुळेच. भरधाव आर्थिक विकासाच्या चिनी 'मॉडेल'च्या यशाने डोळे दिपलेले चीनचे स्तुतिपाठक नेमकी हीच बाब एक तर विसरतात तरी अथवा तिच्याकडे सोयीस्कर डोळेझाक तरी करतात. 'बचत-गुंतवणूक-निर्यात' ही त्रिसूत्री सूत्रबद्धपणे राबविणाऱ्या चीनचे बव्हंश यश विकासाच्या त्या धोरणदृष्टीला लाभलेल्या राजकीय चौकटीपायी साध्य झालेले आहे. हे असे काहीही आपल्या देशातील बहुपक्षीय स्पर्धेने रसरसलेल्या जिवंत लोकशाही व्यवस्थेमध्ये साकारणे आपल्याला कितपत शक्य आहे, याचा सारासार विचार न करताच चीनचे उदाहरण जिथेतिथे उद्धृत करण्यात काय हशील आहे ?




एवंगुणविशिष्ट असे हे विकासाचे प्रारूप चीनने साधारणपणे 1978 ते 2014-15 सालापर्यंत राबविले. मात्र, 2008 सालातील वैश्विक अरिष्टाच्या पसरणाऱ्या सावल्यांपायी चिनी मॉडेलच्या अंगभूत मर्यादा आता जागतिक समुदायाच्या पुढ्यात उघड्या पडत चाललेल्या आहेत. एक तर, चौखूर उधळलेल्या घोड्याप्रमाणे दौड मारणारी चिनी अर्थविकासामागील धोरणदृष्टी

व विकासप्रक्रिया कमालीची ऊर्जासघन असल्याचा साक्षात्कार सगळ्या जगाला होऊ लागला. चीनने गुंतवणूक वाढवत राहात उत्पादन करावयाचे आणि अमेरिकेने उपभोगप्रवणता जपत चिनी मातीमध्ये तयार झालेला माल रिचवत राहायचा, हा 1970च्या दशकापासून अव्याहत चालत आलेला परिपाठ डोनल्ड ट्रम्प यांना नामंजूर होता. त्याला कारणही तसेच होते. 1970-80च्या दशकापासून जगभरात सर्वत्रच चालू झालेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या कुशीतून क्रमाने निपजत आलेल्या आर्थिक विषमतेचा विळखा विविध देशांतील अनेक समाजघटकांभोवती आवळत चालला होता. त्या चरकात पिळलेल्यांच्या आक्रोशाला 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट'नामक स्वयंस्फूर्त सामूहिक जनआंदोलनाने वाचा फोडली गेली. न्यूयॉर्क शहरातील झुकोटी पार्क परिसरात 17 सप्टेंबर 2011 रोजी दृश्यमान झालेले हे जनांदोलन म्हणजे आजघडीला सर्वत्र आकर्षण वाढत असलेल्या आर्थिक राष्ट्रवादी मानसिकतेची कूस ठरते. डोनल्ड ट्रम्प यांचे नेतृत्व त्याच आर्थिक राष्ट्रवादाच्या अधिष्ठानावर उभारलेले आहे. परिणामी, 'अमेरिका फर्स्ट'चा



नारा देत सत्तेवर आलेल्या ट्रम्प महाशयांनी चिनी व्यापारापायी अमेरिकी उद्योग आणि रोजगार यांना बसणाऱ्या फटक्याची गंभीर दखल घेत चीनबरोबरील खुल्या व्यापाराचा पैस रोखणारी धोरणात्मक पावले उचलायला सुरुवात केली आणि निर्यातोन्मुख विकासाच्या चिरेबंदी चिनी 'मॉडेल'चे चिरे ढासळायला सुरुवात झाली. अलीकडील काही वर्षांत केवळ अमेरिकाच नव्हे तर, फ्रान्स, ब्रिटनसह युरोपातील अनेक देशांमध्ये देशी उद्योग व रोजगारांना संरक्षण देणारी व्यापारी तटबंदी मजबूत करण्याची जी मानसिकता बळावते आहे त्यापायी एकीकडे ज्या प्रमाणे खुल्या जागतिक बाजाराच्या तत्त्वज्ञानाला मुरड पडते आहे त्याचप्रमाणे दुसरीकडून निर्यातप्रधान आर्थिक विकासाच्या प्रारूपाची प्रस्तुतताही प्रश्नांकित बनते आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन यांनी हे वास्तव सत्ताधारी नेतृत्वाच्या ध्यानात आणून देण्याचा प्रयत्न करताच 'मन की बात' ऐकवणाऱ्यांनी त्यांची लगोलग गच्छंतीच केली.

तो काळ होता माननीय नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'मेक इन् इंडिया'च्या नाऱ्याची मोहिनी असण्याचा. ती घोषणा जरी वरकरणी स्वदेशीचा पुकारा करणारी भासत असली तरी तिच्या पोटात प्रेरणा होती ती निर्यातोन्मुख आर्थिक विकासाच्या चिनी 'मॉडेल'चे अनुकरण करण्याची. खुल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराची तळी उचलून धरणारी धोरणप्रणाली जगातील विविध देशांना मान्य असणे ही निर्यातोन्मुख आर्थिक विकासाच्या यशाची पूर्वअट ठरते. मात्र, कडव्या आर्थिक राष्ट्रवादाचा पाठपुरावा करणारी मानसिकता सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात झिरपत असताना 'मेक इन् इंडिया' या योजनेला 'मेक इन् इंडिया फॉर इंडिया' असे स्वरूप द्यावे लागेल, असा कालोचित सल्ला देणाऱ्या डॉ. रघुराम राजन यांचे ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत तेव्हा कोणीच नव्हते. परिणामी, न मागितलेला सल्ला सरकारप्रमुखाला दिल्याची शिक्षा डॉ. रघुराम राजन यांनी भोगली. प्रचंड अशी देशी बाजारपेठ लाभलेल्या भारतासारख्या विशाल अर्थव्यवस्थेने विकासाचा पाठपुरावा करण्यासाठी परकीय बाजारपेठांवर अवलंबून राहण्यापेक्षा देशांतर्गत बाजारपेठांची मशागत करणे सद्य:स्थितीत अधिक उचित ठरेल, एवढाच रघुराम



राजन यांच्या सांगण्याचा गाभा होता. परंतु, तो दिल्लीश्वरांना रुचणारा नव्हता. आजही ती धोरणदृष्टी सत्ताधीशांना विचारार्ह वाटत नाही याचा पुरावा आर्थिक सर्वेक्षण अहवालाचे बाड आज आपल्याला देते आहे. खरीखुरी झोप लागलेल्याला जागे करणे सोपे असते. परंतु, झोपेचे सोंग घेतलेल्यांच्या कानाशी ढोल बडवले तरी त्यांना जाग येत नसतेच !

बरे, 'नसेल ऐकायचे तर नका ऐकू', असे म्हणत हा मुद्दा सोडूनही देता येण्याजोगा नाही. कारण, येत्या पाच वर्षांदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेला ज्या दिशेने नेण्याचे मनसुबे सरकारने आर्थिक सर्वेक्षण अहवालात मुखर केलेले आहेत त्यांचे यशापयश त्या धोरणदृष्टीच्या मुळाशी असलेल्या धारणांच्या अचुकतेवर निर्भर असणार आहे. 'बचत-गुंतवणूक-निर्यात' या त्रयीवर तोललेल्या आर्थिक विकासाचा आरंभबिंदू देशांतर्गत बचत हा असतो. बचतीची प्रवृत्ती अवलंबून राहते ती उत्पन्नाच्या मात्रेवर. बचत आणि व्यक्तीचे निव्वळ उत्पन्न यांच्यादरम्यानचे नाते थेट व सकारात्मक असते. त्यांमुळे, देशांतर्गत बचतीचे देशी उत्पादनाशी देशांतर्गत गुंतवणूक वाढवायची तर देशी बचत सशक्तपणे वाढायला हवी. त्यासाठी दरडोई उत्पन्नातील वाढीचा वार्षिक सरासरी वेग सज्जड असायला हवा. आज ती परिस्थिती आहे का ?

देशातील जवळपास निम्मे मनुष्यबळ ज्या शेतीसह एकंदरच ग्रामीण अर्थकारणावर अवलंबून आहे ते शेतीसह एकूणच प्राथमिक क्षेत्र अलीकडील कित्येक वर्षे अरिष्टाच्या फेऱ्यात गुरफटलेले आहे. परिणामी, ग्रामीण भारतातील क्रयशक्ती कमजोर राहिलेली आहे. त्यांमुळे ग्रामीण मागणीही अशक्तच आहे. ग्रामीण भागातील मजुरीच्या दरातील वाढीचा वार्षिक सरासरी वास्तव दर कमालीचा दुर्बल राहिलेला आहे. साहजिकच, शेतीमधील गुंतवणूक निस्तेजच केवळ नव्हे तर घटती राहते आहे. त्याचा फटका बसतो आहे तो भारतीय शेतीक्षेत्राच्या सरासरी उत्पादकतेला. मुळात उत्पादकताच सुकलेली असल्याने शेतकरी कुटुंबांच्या उत्पन्नातील वाढ खंगलेली आहे. शेती किफायतशीर राहिलेली नाही म्हणून नाईलाजाने मोठ्या शहरांतील श्रमांच्या





असलेले गुणोत्तर प्रमाण वाढायचे तर मुदलात दरडोई उत्पन्नाच्या वाढीतील वार्षिक सरासरी दर चांगल्यापैकी सशक्त हवा. 2008 सालानंतरचे आपल्या देशातील अर्थवास्तव या पूर्वअटीची पूर्तता करणारे अजिबातच नाही. बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असणारे सरासरी गुणोत्तर प्रमाण 2008 सालातील मार्च महिन्यात होते जवळपास 38 टक्क्यांच्या घरात. 10 वर्षांनंतर, म्हणजे, 2018 सालातील मार्च महिन्यात तेच प्रमाण 30.5 टक्क्यांपर्यंत घसरलेले दिसते. महागाईपायी आटलेली सर्वसामान्यांची बचत, नफाप्रदतेमध्ये घट झाल्याने रोडावलेली कॉर्पोरेट विश्वाची बचत आणि वित्तीय तुटीचे भगदाड वाढते राहिल्याने कसर लागलेली सरकारी बचत अशा तिन्हींचा हा एकत्रित परिणाम होय. देशी बचत हेच देशी गुंतवणुकीचे मुख्य साधन ठरत असते. आता, बाजारपेठांकडे पावले वळवणाऱ्या ग्रामीण होतकरूंना पुरेसा व चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरविण्याबाबत संघटित कॉर्पोरेट विश्व अनुत्सुक आहे. बदलत्या वैश्विक बाजारपेठीय वातावरणापायी तिथे अवलंब केला जातो आहे तो अधिकाधिक भांडवलसघन अशा उत्पादनतंत्राचा. त्यांमुळे, संघटित क्षेत्रातील औपचारिक, कायमचा, दर्जेदार रोजगार कमालीच्या मंद गतीने वाढताना दिसतो. मग, शहरांकडे वळणारे ग्रामीण कष्टकऱ्यांचे लोंढे सामावून घेतले जातात ते शहरोशहरी फुगणाऱ्या श्रमांच्या असंघटित बाजारपेठेत. दुसरीकडे, संघटित उद्योगांमधून होणाऱ्या कामगारभरतीमध्ये कंत्राटीकरणाबरोबरच हंगामीकरणाचे वारे धुमाकूळ घालत आहेत. रोजगाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील चित्र असे निकृष्ट बनलेले असल्याने बिगर शेती

उद्योगव्यवसायांतील रोजंदारीतील दरसाल वास्तव वाढीचा सरासरी दरही रोडावलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये, देशी बचतीचे देशी ठोकळ उत्पादनाशी असलेले प्रमाण सणसणीतपणे वाढवण्याचे मनसुबे सरकार कशाच्या आधारे रचते आहे त्याचा पत्ताच लागत नाही. आर्थिक सर्वेक्षण अहवालानेही या मुद्याबाबत मिठाची गुळणीच धरलेली आहे.


आपल्या देशातील लोकसंख्येची सध्याची जडणघडण बचतप्रवृत्तीचे संवर्धन करण्यास कमालीची अनुकूल असल्याचा निर्वाळा आर्थिक सर्वेक्षण अहवाल देतो. लोकसंख्याशास्त्रीय परिभाषेमध्ये या अवस्थेला अथवा लोकसंख्येच्या वयानुसारी या जडणघडणीला 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' असे म्हणतात. वयाने तरूण असलेल्या लोकसंख्येचे देशाच्या एकंदर लोकसंख्येमध्ये असणारे प्रमाण चांगल्यापैकी अधिक असणे, या संरचनेचे हे तांत्रिक परिभाषेतील वर्णन होय. वय वर्षे १५पेक्षा अधिक व वय वर्षे ६०पेक्षा कमी या वयोगटातील लोकसंख्येला अर्थशास्त्रीय परिभाषेमध्ये आर्थिकदृष्ट्या क्रियाशील (इकॉनॉमिकली ॲक्टिव्ह)






असे संबोधले जाते. या वयोगटातील लोकसंख्येमध्ये येत्या दशकभरात दरवर्षी सरासरीने ९७ लाखांची भर पडेल, असा अंदाज आर्थिक सर्वेक्षण अहवाल नमूद करतो. तर, २०३० ते २०४० या त्या नंतरच्या दशकभरादरम्यान हीच वार्षिक सरासरी वाढ ४२ लाखांची असेल, असे या अहवालाचे म्हणणे आहे. ज्या देशातील एकंदर लोकसंख्येमध्ये आर्थिकदृष्ट्या क्रियाशील वयोगटात गणल्या जाणा-या लोकसंख्येची भर इतक्या मोठ्या संख्येने वर्षानुवर्षे पडत राहते त्या देशातील बचतीचे त्या देशाच्या ठोकळ उत्पादनाशी असलेले प्रमाण दमदार गतीने वाढत राहते असा आजवरचा जगभरातील अनुभव आहे. त्याला कारणे दोन असतात. एक तर, वयाने तरूण असणाऱ्या मनुष्यबळाची सरासरी उत्पादकता अधिक असते. त्यांमुळे, तरूण मनुष्यबळाला मिळणारा मेहनताना सरासरीने सरस असतो. बचत व उत्पन्न यांच्यादरम्यानचा सहसंबंध थेट व सकारात्मक असल्याने सरासरी दरडोई उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर तरूण मनुष्यबळाची बचतप्रवृत्तीही अधिक राहून देशांतर्गत बचतीचे संचयन भक्कमपणे होत राहते. दुसरे म्हणजे, हाच तरूण वर्ग ज्या वेळी मध्यमवयामध्ये सरकतो त्या वेळी, म्हणजे, साधारणपणे वयाच्या चाळीशीनंतर त्याला निवृत्तीचे वेध लागतात आणि उतारवयातील उपजीविकेची तरतूद करण्यासाठी प्रौढावस्थेतील कुटुंबवत्सल पुन्हा एकवार बचत करण्याकडे प्रवृत्त होतात. आर्थिकदृष्ट्या क्रियाशील वयोगटातील मनुष्यबळाच्या संख्येमध्ये येत्या दोन दशकांदरम्यान भारतात भरीव गतीने दरसाल वाढ होण्याची परिस्थिती असल्याने येत्या काळात देशांतर्गत बचत चांगल्यापैकी संचयित होऊन बचत-गुंतवणूक-निर्यात या त्रिसूत्रीचा अवलंब सुखेनैव करता येईल, असे गुलाबी चित्र २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठीचा सर्वेक्षण अहवाल रंगवतो.

परंतु, याच चित्राची दुसरी आणि तितकीच खडबडीत बाजू मात्र हेच चोपडे समाजमनासमोर ठेवत नाही. ही लबाडी कशासाठी? अशा लबाड्या सरकार करणार असेल तर, सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या घोषणेला 'पोकळ बाता' यांखेरीज अन्य काहीच मोल उरत नाही. वयाने तरूण व संख्यात्मक बहुलता असणारे मनुष्यबळ हे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने निश्चितच लाभांशाच्या रूपाने फायदेशीर ठरते, हे सैद्धांतिक पातळीवर बोलणे योग्यच आहे. परंतु, पुस्तकी सिद्धांत आणि व्यवहारातील वास्तव यांच्यादरम्यान मेळ असतोच असे नाही. या बाबतीतही हेच होते आहे. तरूण मनुष्यबळाची बचतप्रवणता तुलनेने अधिक असते हे मान्य; परंतु, हातात पगार अथवा मेहेनताना आला तरच असा तरूण मनुष्य बचत करेल ना ! त्यासाठी हवा रोजगार ... आणि नेमक्या त्याच आघाडीवर थेट



२००० सालापासून भारतीय अर्थव्यवस्था गोते खाते आहे. 'जॉबलेस ग्रोथ'ची चर्चा गेली २० वर्षे आपण करतो आहोत, हे वास्तव ढळढळीतपणे पुढ्यात असताना सरकार इतकी बेमालूम साखरपेरणी कशी काय करू शकते ? मुळात, चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये पुरेशा प्रमाणात निर्माण होत नाही, ही जटिल समस्या आपल्याला नवीन नाही. एकीकडे सरकारी नोकरभरती ठप्प आहे आणि दुसरीकडे संघटित, मोठ्या उद्योगघटकांचे कॉर्पोरेट विश्व भांडवलसघन तंत्रज्ञानाच्या मागे लागलेले आहे. मग, रोजगार आणायचा कोठून ? रोजगारच नसेल तर संख्येने प्रचंड असणा-या तरूण मनुष्यबळाचा काय फायदा ? हातात पगार अथवा वेतन वा रोजंदारीच नसणा-या लोकसंख्याघटकाकडून बचतीची अपेक्षा कशी धरायची ?

या कळीच्या प्रश्नावर आमचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल काहीच बोलत नाही. मुळात, देशांतर्गत बचत मोठ्या प्रमाणावर संचयित होणे, या अधिष्ठानावर बचत-गुंतवणूक-निर्यात' या त्रयीवर बेतलेल्या भरधाव आर्थिक विकासाच्या प्रारूपाचे यश निर्भर आहे. मुदलात उत्पन्नाची निर्मिती आणि उत्पन्नातील वाढ या दोन पायाभूत बाबींचीच शाश्वती नसेल तर सरकारचे हे गोंडस 'मॉडेल' व्यवहारात कसे साकारणार आहे ते अर्थमंत्री माननीय निर्मला सीतारामन याच एकट्या जाणोत. देशांतर्गत बचतीचा ओघ खुरटलेला राहिला तर मग परकीय थेट गुंतवणुकीकडे टुकत बघत बसण्यावाचून अन्य पर्यायच नाही. आपल्या देशातील निकृष्ट पायाभूत सेवासुविधा, कालबाह्य झालेल्या कायदेकानूंचे जंजाळ, राज्याराज्यांमधील औद्योगिक तसेच परकीय गुंतवणूकविषयक नियमांमधील विसंवाद व अस्पष्टता यांचा विचार करता केवळ परकीय गुंतवणुकीवर मर्यादा शिथिल केल्याने परदेशी गुंतवणुकदार त्यांची पुंजी घेऊन भारताकडे भरधाव धावत सुटतील, अशी आशा वा अपेक्षा बाळगणे केवळ बाळबोध ठरेल.

हे केवळ एवढ्यावरच संपत नाही. एकवेळ बचतीचे पाहू निदान व्याजदर सुसह्य बनवून गुंतवणूक वाढण्यासाठी अनुकूल पर्यावरण तरी निर्माण करू, असा विचार करत अधिकाधिक उदार असे पतधोरण रिझर्व्ह बँकेने अवलंबावे यासाठी सरकार रिझर्व्ह बँकेला सतत टोकत राहते. रिझर्व्ह बँक मग बँकांना पराण्या लावते. व्याजांचे दर उतरवा, कर्जे सुलभ व स्वस्त करा असा धोशा लावत रिझर्व्ह बँक आणि पर्यायाने केंद्रातील अर्थमंत्रालय बँकांच्या शेपट्या पिरगळू लागले की बँकाही रंजीस येतात.



एकीकडे परदेशी तसेच खासगी बँकांच्या स्पर्धेला तोंड द्यायचे आणि दुसरीकडे कर्जे स्वस्त बनवत आपल्या नफाप्रदतेवर कुऱ्हाड चालवायची, अशा दुहेरी पेचात सापडलेल्या बँका, मग, स्वस्त कर्जाचा माहौल निर्माण करण्यासाठी बचतींवरील व्याजदरांवर कपातीची करवत चालवतात. हे ओघानेच आले. कारण, बँकिंग हा देखील पुन्हा एक व्यवसायच आहे. ठेवीदारांनी ठेवलेल्या ठेवींवर बँका जो व्याजदर देतात तो व्याजदर आणि

त्याच ठेवींच्या जीवावर वितरीत केलेल्या कर्जावर बँका जो व्याजदर आकारतात तो व्याजदर यांच्यातील फरक म्हणजे बँकांची नफाप्रदता. आता, कर्जे स्वस्त करा म्हणून सरकार जर काठी घेऊन पाठीशी लागणार असेल तर स्वतःची नफाप्रदता टिकवून धरण्यासाठी ठेवींवरील व्याजदर घटवण्याखेरीज बँकांना अन्य पर्याय आहेच कुठे? असे झाले की ठेवीदार ओरडायला लागतात. त्यांचेही बरोबरच आहे. बँकांमध्ये ठेवींच्या रूपाने बचत केलेल्या पुंजीवर मिळणाऱ्या व्याजावर ज्यांची उपजीविका अवलंबून असते असे समाजघटक मग या चक्रामध्ये भरडले जातात. त्यांहूनही गंभीर बाब म्हणजे, ठेवींवरील व्याजदर सरासरीने उतरती भाजणी दाखवू लागले की सुज्ञ बचतदार बँकांकडे पाठ फिरवून बचतीचे अन्य । पर्याय शोधायला लागतात. एक तर ते पावले वळवतात शेअर बाजाराकडे अथवा सोने किंवा 'रिअल इस्टेट' कडे. ही प्रवृत्ती घाऊक प्रमाणावर पसरू लागली तर ते बँकांच्या लेखी कमालीचे घातक शाबीत होते. कारण, मुळात बचतदारांच्या ठेवींच्या माध्यमातून बँकांकडे पैसा आलाच नाही तर बँका कर्जे तरी कोठून व कशी निर्माण करणार ? तिसरीकडे, सध्या केवळ आपल्याच देशातील नव्हे तर, एकंदर जगातीलच शेअर बाजारांत सघन अस्थिरता आहे. अशा परिस्थितीमध्ये, शेअर बाजारातील गुंतवणुकीची जोखीम पत्करण्यास फारसा राजी नसलेला सावध गुंतवणूकदार शेअर बाजाराच्या वाटेकडे फिरकतच नाही. मग तो वळतो सोन्याकडे अथवा घरखरेदीकडे. सोन्याच्या बाजारभावांमध्ये अलीकडील काळात सतत होत असलेली भरीव वाढ, हे याच मानसिकतेचे द्योतक होय.



या सगळ्याची गोळाबेरीज म्हणजे, अशा प्रकारे, बँकांकडून अथवा शेअर बाजारांकडून अन्य पर्यायांकडे वळणा-या बचतीचा अर्थकारणातील गुंतवणुकीचे चक्र गतिमान करण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. ही सगळी गुंतागुंत अशी असताना, आपल्या देशातील विद्यमान धोरणकर्ते बचत-गुंतवणूक-निर्यात' या त्रिसूत्रीद्वारे साकारणा-या भरधाव आर्थिक विकासाची स्वप्ने वा अपेक्षा कशाच्या भरवशावर उराशी बाळगते आहे ? देशांतर्गत बचत दणदणीत बनण्याच्या वाटा कोंदटलेल्या आहेत, अनिश्चिततेच्या वावटळीमध्ये होलपटणारे कॉर्पोरेट विश्व नव्याने गुंतवणूक करण्याबाबत धास्तावलेले आहे आणि कडव्या आर्थिक राष्ट्रवादाचे वारे जगभरात सर्वत्रच फिरत असल्याने निर्यात सुलभ राहिलेली नाही, अशी सगळी परिस्थिती असताना, केवळ पश्चिमेकडे बघायचे नाही आणि पूर्वेच्या पूर्वानुभवाचाच जप करत बसायचा हे धोरण कितपत शहाणपणाचे ठरेल?

...असे काही तर्कशुद्ध प्रश्न विचारणाऱ्यांच्या राष्ट्रभक्तीबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचे एक अचाट हत्यार अलीकडील काळात उपसले जाते. हे सगळेच अतर्क्य आहे. भक्तीला तर्काचे वावडे आहे अथवा असते, असे कोणी सांगितले? केवळ भारताचाच नव्हे तर उभ्या जगाचा नीतीग्रंथ म्हणून ज्या भगवद्गीतेचा अभिमान सगळेजण बाळगतात ती गीताच मुळात एका गहन प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून निर्माण झालेली आहे. केवळ इतकेच नाही तर, अत्यंत नम्रपणे, शिक्षक अथवा गुरूंना वंदन करून प्रतिप्रश्न विचारून अभ्यासकाने वा साधकाने ज्ञानतपस्या करावी, असे गीताच सांगते. परंतु, त्यासाठी मुदलात शिकण्याची तयारी हवी. ज्ञानी, अभ्यासू व प्रगल्भ बुद्धिवंतांची कदर राखली जात असेल तरच कोणत्याही व्यावहारिक समस्येवर तर्कनिष्ठ तोडगा दृष्टिपथात येऊ शकतो. मात्र, स्वतंत्रप्रज्ञ संशोधकांचे प्रशासकीय व्यवहारातून उच्चाटण करण्यातच धन्यता मानणा-या सध्याच्या राजकीय व्यवस्थेकडून अशा कशाची अपेक्षा धरणेच भाबडेपणाचे ठरेल!



# 'संकल्प' दिवाळखोरीचा...!

नरेंद्र मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळामधील अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी मांडलेला 28 हजार अब्ज रुपये खर्चाचा अर्थसंकल्प हा देशाला आर्थिक उत्थानाच्या दिशेने नेणारा अर्थसंकल्प न ठरता आर्थिक दिवाळखोरीचाच संकल्प ठरण्याची साधार भिती तज्ज्ञ आणि सामान्य जनता दोघांच्याही मनात घर करुन राहिली आहे. सीतारामन यांनी अर्थसंकल्प हा वेगळ्या शैलीत आणि वेगळ्या पद्धतीने मांडला हे खरे.. पण कदाचित तेवढेच त्यांचे वेगळेपण म्हणता येईल आणि त्यामध्ये कल्पकताशून्यताच अधिक दिसून येते. 'नारी तू नारायणी' अशी हाक देऊन लाल रंगाच्या वेष्टनातून अर्थसंकल्पाची प्रत सादर करताना त्यांनी प्रत्यक्षात देशाच्या 50 टक्के लोकसंख्या असलेल्या महिलावर्गाच्या तोंडाला फक्त पाने पुसली.




## महिलांसाठी तरतूद कमी

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या झुंझार नेत्या आणि माजी खासदार वृंदा करात यांनी दाखवून दिल्याप्रमाणे अर्थसंकल्पाच्या 5.1 टक्के इतकी याआधी असणारी महिलांसाठीच्या निधीची रक्कम यंदा मुळीच न वाढविता उलट कमीच करण्यात आली आहे. महिलांना वाढीव रोजगार मिळण्यासाठी प्रयत्न नाही की महिला बचत गटांना उत्तेजन व वाढीव पतपुरवठ्यासाठीही अर्थसंकल्पात कोणतीही ठोस तरतूद नाही.

**कोणत्याही देशाचा अर्थसंकल्प हे त्या अर्थव्यवस्थेची विकासाच्या मार्गावर घोडदौड कशा प्रकारे, कोणत्या रितीने घडवून आणण्याचा आपला मानस आहे, याबाबत त्या देशाच्या सरकारने सर्वांसमोर मांडलेला आलेख असतो. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये (जी.एन.पी.) कशी भर पडेल याचा सादर केलेला आराखडाच जणू! मात्र यंदाचा अर्थसंकल्प हा विकासाचा न वाटता दिवाळखोरीचाच भासतो !**






## दिशाभूल करणारा अर्थसंकल्प


महाराष्ट्राच्या तरुण खासदार सुप्रिया सुळे यांनी तर या अर्थसंकल्पाचे वर्णन 'दिशाभूल करणारा अर्थसंकल्प' असेच केले आहे. "कृषी आणि महिला या दोन्ही क्षेत्रांबाबत चिंता व्यक्त करतानाच श्रीमती सीतारामन यांनी प्रत्यक्षात या प्रत्येक बाबतीत हात आखडताच घेतला आहे" हेही त्यांनी दाखवून दिले.

"राष्ट्रीयकृत बँकांना 70 हजार कोटी तर बिगर बँकिंग वित्तीय संस्थांना तब्बल 1 लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पात केलेली तरतूद हा थकबाकीदारांना अप्रत्यक्षपणे संरक्षण देण्याचाच प्रयत्न आहे. गैरबँकिंग वित्तीय क्षेत्रातील घोटाळ्यांमध्ये कुणालाच शिक्षा झालेली नाही. म्हणजे गुन्हेगारांना शासन करण्याऐवजी उलट स्वतःच्या बेफिकिरीनेच नुकसान ओढवून घेतलेल्या या क्षेत्राला मदत करण्याचा प्रयत्न सरकार करताना दिसते आहे."

आपल्या दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या अर्थसंकल्प सभागृहापुढे मांडतानाच्या भाषणामध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी "वित्तीय तुट आटोक्यात राखत यंदाच्या वर्षी अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग 8 टक्क्यांवर नेण्याचा आणि अंतिमतः भारतीय अर्थव्यवस्था पाच वर्षांमध्ये 5 ट्रिलियन अमेरिकन डॉलरवर (आज भारतीय अर्थव्यवस्था 3 लाख 50 हजार कोटींची आहे.) नेण्याचा संकल्प वारंवार बोलवून दाखवत पण हे सर्व त्या कसे साध्य करणार याबाबत त्यांनी ना काही ठोस घोषणा केल्या, ना काही पावले उचलली.

## आर्थिक वास्तवाचे भान नाही

जागतिक व्यापारयुद्ध, राष्ट्राराष्ट्रातील ताणतणाव, आर्थिक बंधने आणि परस्परांवरील करलादणी यामुळे एकंदरीतच जागतिक अर्थव्यवस्था मंदीकडे वेगाने वाटचाल करीत आहे. अमेरिका-इराणच्या युद्ध गर्जना चालू आहेत तर उत्तर कोरिया-चीनची दादागिरी.. त्यातही आखाती प्रदेशात सागरी चाचेगिरीला उत आला असून आंतरराष्ट्रीय व्यापाररेषांवर मनस्वी ताण आला आहे. या सर्वांच्या परिणामस्वरुपी तेलाचे भाव वाढत आहेत. खुला व्यापार संकोचत आहे तर साऱ्या जगावर मंदीचे भीषण सावट येऊ घातले आहे. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पात ही




बाब गांभीर्याने घेतल्याचे मुळीच दिसून येत नाही.

पंतप्रधानांच्या महत्त्वाकांक्षी संकल्पानुसार पाच ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचा टप्पा पाच वर्षात गाठावयाचा असेल तर अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग दर वर्षाला किमान 12 टक्के एवढा तरी राखायला हवा. पण प्रत्यक्षात तशी कोणती पावले उचलली गेली आहेत? दिसत तर काही नाही.

अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये मंदावून जेमतेम 6.8 टक्क्यांवर आली होती. यंदाच्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये तर आणखीनच एक टक्क्याने घसरून ती 5.8 टक्क्यांवर घरंगळली. ताज्या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्र्यांने जरी 8 टक्के वाढीची घोषणा केली असली तरी जगातील सर्व देशांच्या अर्थव्यवस्थांवर बारीक लक्ष ठेवणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजेच आय.एम.एफ. ने मात्र 2019 साठी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर 7 टक्के एवढाच राहील असे भाकीत नुकतेच जाहीर केले आहे.



याचा अर्थ स्पष्ट आहे. जेवढा विकासाचा दर कमी तेवढी अर्थव्यवस्थेच्या वाढीची गती कमी आणि तेवढ्याच प्रमाणात तिची ताकदही कमी. याचा परिणाम धनको देश, संघटना तसेच वित्त संस्था यांच्याकडून कर्ज मिळण्यात अथवा आंतरराष्ट्रीय खुल्या बाजारातून भांडवल उभे करण्यात अडचणी निर्माण होण्यात तसेच वाढीव अटींचा, व्याजदराचा सामना करावा लागण्यात होणार. आंतरराष्ट्रीय खुल्या वित्त बाजारातून परकीय चलनामध्ये रोख्यांद्वारे (सॉव्हरीन बाँडस्) भांडवल उभारणी करण्याचा मनोदय माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये व्यक्त केला होता. या मनसुब्यांनाही खीळ बसण्याचा धोका साहजिकपणे उद्भवतोच!

## उद्योग, व्यवहारांनाही फटका

आधीच मंदीमधून जात असलेल्या अनेक उद्योगांना नव्या अर्थसंकल्पीनय धोरणांचा फरक जाणवतो आहे. कृषी क्षेत्राबरोबरच रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात करणाऱ्या या व त्यावर अवलंबून असणाऱ्या अनेक उपउद्योगांना जबरदस्त मंदी तसेच कपातीला सामोरे जावे लागत आहे.

यातला पहिला मोठा बळी आहे तो वाहन उद्योगाचा. देशातील लहान-मोठी प्रत्येक वाहन कंपनी आज मंदीच्या तडाख्यातून जाते आहे. गाड्यांना उठाव नाही म्हणून उत्पादनकपात चालू आहे. त्यामुळे कामगार कपात, महिन्याचे कित्येक दिवस ले-ऑफ अशा अनेक समस्या भेडसावत आहेत. मारुती, टाटा मोटर्स, पियाजो, फोक्सवॅगन सारख्या अग्रगण्य कंपन्यांनी उत्पादन कमी केले आहे. अनेकांनी आपल्या विस्तार योजनांना खीळ घातली आहे. त्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेले सुटे भाग पुरविणारे उद्योगही डबघाईला आलेले आहेत. सरकार म्हणते, वीजेवर चालणाऱ्या गाड्यांना प्रदूषण नियंत्रणासाठी उत्तेजन देण्याचे धोरण आखणार आहे. ते ठीक आहे. परंतु त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सोयीसुविधांचे काय? चार्जिंग, सर्व्हिसिंग केंद्रे, स्वस्तात इलेक्ट्रिक गाड्यांचे उत्पादन तसेच इतर सोयी निर्माण करण्याआधीच सध्या चांगल्या चाललेल्या, रोजगार पुरवणाऱ्या कंपन्यांच्या गळ्याला नख लावून काय साधणार? या गाड्यांवर तसेच त्यांचे भाग व पेट्रोल, डिझेलवर करवाढीने ग्राहकच नाडला जाणार. तीच बाब उतर उद्योगांची. ग्राहकोपयोगी वस्तू व जिनसा तयार करणाऱ्या (एफ.एम.सी.जी.) कंपन्यांना हे वर्ष मंदीने सुरु झाले. पहिल्या तिमाहीचे विक्रीचे आकडे चांगलेच घटले असून "आता येणाऱ्या सणासुदीच्या मोसमात जर विक्रीने जोर धरला नाही, तर आमच्यापुढे अंधारच उभा राहिल." अशीच भावना सर्वत्र दिसते.


## शेअरबाजारात घसरण

मोदींच्या फेरनिवडीने अत्यंत आशावादी होऊन 40 हजाराच्या वर गेलेला (सेन्सेक्स) शेअरबाजार अर्थसंकल्पानंतर जवळजवळ रोज घसरत असून ही घसरण तीन हजारांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. सर्वच महत्त्वाच्या शेअरर्सच्या भावांमध्ये मोठी घट झाली असून शेअरांच्या भांडवलीकरणामध्ये (कॅपिटलायझेशन) म्हणजेच





भागधारकांच्या संपत्तीचे कित्येक लाख कोटींचे नुकसान झाले आहे. अर्थसंकल्पातील कंपन्यांवरील कराच्या धोरणामुळे तसेच शेअर बाजारातील पडझडीमुळे विदेशी गुंतवणूक संस्थाही काढता पाय घेत आहेत. गेल्या काहीच दिवसात परदेशी गुंतवणुकदार व वित्त संस्थांनी आपले लाखो कोटी रुपये काढून घेतले असून अर्थातच ते परकी चलनाच्या स्वरुपात भारताबाहेर परत नेले आहेत. अर्थसंकल्पाच्या दुष्परिणामांची ही नुकतीच कुठे सुरुवात आहे. वेळीच रोखला नाही, तर हा अर्थसंकल्प दिवाळखोरीचाच आहे!






# एक हुकलेली संधी !

**500 अब्ज डॉलर्सचा अर्थसंकल्प हाताशी असताना आलेल्या संधीचा यथायोग्य उपयोग करुन येत्या पाच वर्षांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था 5 लाख कोटी डॉलर्सवर नेण्याचे मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेला आकार देण्याची संधी निर्मला सीतारामन यांच्या हातून हुकली.**

500 अब्ज डॉलर्सचा अर्थसंकल्प हाताशी असताना आलेल्या संधीचा यथायोग्य उपयोग करुन येत्या पाच वर्षांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था 5 लाख कोटी डॉलर्सवर नेण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने अर्थव्यवस्थेला आकार आणि गती देण्याची संधी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हातून हुकली, असेच म्हणावे लागते.

पंतप्रधानांच्या स्वप्नाला पाच वर्षांची ठोस मुदत देण्याऐवजी "येत्या काही वर्षात" असे मोघमपणे उच्चारुन त्यांनी एक प्रकारे त्यातली हवा आणि जोरच काढून घेतला, तर अर्थसंकल्पातून दीर्घकालीन द्रष्टे धोरण दाखविण्याऐवजी मध्यमकालीन ध्येयाला तात्कालीन कामगिरीची जोड देऊन अर्थसंकल्पातून ठोस प्रगती साधण्याची संधीही हुकवली!

अर्थसंकल्पाआधीच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक सर्वेक्षणामधून अंतर्गत उत्पादनवाढीचा वेग (8 टक्के वास्तव + 4 टक्के चलन फुगवटा) एकूण 12 टक्के असा निर्देशित होत होता. परंतु त्यानेही खरे चित्र समोर येत नव्हते. प्रगती होत नसलेली वास्तव अर्थव्यवस्था, वित्तीय तुट परिणामकारक नसलेले नाणकीय धोरण, पुरेसा भागभांडवल नसलेले बँकिंग क्षेत्र तसेच समस्याग्रस्त वित्त व्यवस्था आणि या सर्वांच्या सभोवताली असलेली कळाहीन जागतिक अर्थव्यवस्था हे सर्व घटक काही आर्थिक विकासाला पूरक नक्कीच नाहीत. त्यामुळेच पाच वर्षात 5 ट्रिलियन (पाच लाख कोटी) डॉलर्सची अर्थव्यवस्था निर्माण करण्यास बरेच काही करावे आणि ते प्रयत्नपूर्वक टिकवावे लागेल. त्यासाठी एकूण सार्वजनिक व्यय किमान 30 टक्क्यांनी वाढवावा लागेल. म्हणजेच त्या त्या पातळीवर वित्तीय तुट सकल अंतर्गत उत्पादनाच्या 4 टक्के एवढीच राखण्यासाठी महसूलामध्ये 60 टक्क्यांची वाढ लागेल. याचे प्रतिबिंब यंदाच्या अर्थसंकल्पात उतरलेले दिसत नाही.



## लोकांच्या हाती पैसा देऊ – सीतारामन

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भूमिका मात्र काही वेगळीच आहे. "आम्हाला लोकांच्या हातामध्ये पैसा खेळायला हवा आहे." त्या म्हणतात, "आता आम्ही उचलत असलेल्या प्रत्येक पावलामागे आमची भूमिका आहे ती मागणी आणि वापर वाढविण्याची. त्याद्वारे लोकांच्या, त्याही ग्रामीण भागातील ग्राहकांच्या हातामध्ये पैसा खेळविण्याची."



"पायाभूत सोयीसुविधा, रस्ते, घरबांधणी, जलमार्ग, वाहतूक सेवा या आणि अशा इतर उभारणीच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा गुंतवून आम्हाला मागणी व उपयोग वाढवायचा आहे. ही कामे जसजशी वाढत जातील तसतसे अधिकाधिक रोजगार निर्माण होतील. लोकांच्या हातात पैसा खेळू लागेल. त्याचबरोबर पोलाद, सिमेंट, औद्योगिक सामान या आणि अशा उत्पादनांसाठीही मागणी मोठ्या प्रमाणात वाढेल. याच्या लहरी एकाच ठिकाणी साठवून न राहता सर्वत्र पसरतील. वापर वाढला की मागणी वाढते. ती वाढली की गुंतवणूकही वाढते. पैशाचे हे चक्र सुरु होऊन सगळीकडे सर्वांहाती पैसा खेळू लागतो. मग आपण निश्चित केलेली ध्येये गाठता येतात. कारण ती असंभाव्य नसतातच !"

एक गोष्ट नक्की. अर्थव्यवस्थेचा अपेक्षित आवाका (पाच लाख कोटी डॉलर्स) गाठणे हे अवघड असले तरी अशक्य मुळीच नाही. त्यासाठी कायद्यात काही सुधारणा कराव्या लागतील. गुंतवणुकीचा वेग वाढवावा लागेल. भांडवल निर्मिती

करावी लागले. ही गुंतवणुक /भांडवल सरकारी पातळीवर कर व महसुलातून येते तर खासगी पातळीवर ते कंपन्या व वैयक्तिक बचतीमधून येते.

## बचतीला उत्तेजन हवे. –

वैयक्तिक वा कौटुंबिक बचतीच्या बाबतीमध्ये आपला देश खरंच नशीबवान आहे. भारतीयांना बचतीची मोठीच परंपरा आहे. किंबहुना भारताच्या एकूण राष्ट्रीय बचतीमध्ये खासगी आणि कौटुंबिक बचतीचा वाटा निम्म्याहूनही अधिक म्हणजे तब्बल 54 टक्के झाला आहे.

मात्र एवढ्यावर अवलंबून, थांबून राहणे पुरेसे नाही. लोकांना बचतीसाठी सरकारने उत्तेजन देणे गरजेचे आहे. त्यासाठी गुंतवणूकीचे किफायतशीर मार्ग उपलब्ध करुन द्यायला हवेत. बँकिंगची सवय व सोयी उपलब्ध करुन देण्याबरोबरच शेअर बाजार, रोखे बाजार व इतर तत्सम गुंतवणुकीच्या प्रकारांकडेही गुंतवणुकदारांना वळविले पाहिजे.

“सरकारचे अर्थव्यवस्थेच्या विकासाचे प्रयत्न आणि विविध लक्ष्ये यांच्यासंबंधी ध्येयधोरणात रिझर्व्ह बँकही त्यांच्याबरोबर आहे.” ही भूमिका रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर शक्तीकांत दास हे स्पष्ट करतात. “मात्र सध्या साऱ्या जगावरच मंदीची छाया आहे.” हे सांगून ते म्हणतात, “जगातील सगळ्याच महत्त्वाच्या देशांच्या आर्थिक हालचाली मंदावल्या आहेत, मर्यादित झाल्या आहेत आणि भारताच्या प्रयत्नांचीसुद्धा तपासणी त्या संदर्भातच करणे आवश्यक आहे.”

## परकी गुंतवणूक कर्जरोखे

देशांतर्गत गुंतवणूक वाढवून भांडवल मिळविण्याचा एक महत्वपूर्ण मार्ग म्हणजे परदेशातून भारतामध्ये केली जाणारी गुंतवणूक. ती थेट भारतीय उद्योगांमध्ये होऊ शकते. भारतीय शेअर बाजार व रोख्यात होऊ शकते. किंवा भांडवल हस्तांतरणाच्या स्वरुपात परदेशी सर्व प्रकारच्या गुंतवणुकदारांकडून होणाऱ्या गुंतवणूकीचे स्वागत करण्याचे भारत सरकारने धोरण अंगिकारले आहे. त्या दृष्टीने भारतीय वित्त बाजारातील गुंतवणुक परकी गुंतवणुकदारांसाठी आकर्षक करण्याकरताही सरकारने विविध पावले उचलली आहेत. गुंतवणुकदारांना सवलती दिल्या आहेत. तसेच भारतातील गुंतवणूक सुलभ, सोपी व लालफित आणि विलंबापासून मुक्त अशी व्हावी, याचसाठी पावले उचलली जात आहेत.

परकी गुंतवणुकीसाठी परकी चलनातील कर्जरोखे (सॉव्हरीन बाँडस्) हाही एक नेहमी वापरला जाणारा मार्ग असून






भारतही परकी चलनातील कर्जरोख्यांची विक्री करण्याच्या विचारात आहे अशी माहिती श्रीमती सीतारामन यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये दिली होती.

## कर्जरोख्यांची घाई नको

मात्र असे परकी चलनामधील कर्जरोखे विक्रीस काढण्याआधी सरकारने सद्यस्थितीमध्ये प्रगत देशांमधून कर्ज उभारणी करुन परिस्थिती व प्रतिसाद यांचा अंदाज घ्यावा. कर्जरोखे उभारुन त्यांची विक्री करण्याची घाई करु नये, असेही काही तज्ज्ञांचे मत आहे.

एच.डी.एफ.सी. बँकेचे चीफ इकॉनॉमिस्ट अभिषेक बारुआ यांच्या सल्ल्याप्रमाणे भारताने सध्या सॉव्हरीन बॉन्ड म्हणजेच परकी चलनातील कर्जरोख्यांच्या भानगडीत तातडीने न पडता परदेशी वित्त बाजारांमधून कर्जे उभी करण्यावर भर द्यावा.



स्टॅन्डर्ड ॲन्ड पुअर' ने भारताला 'बी बी बी (ट्रिपल बी)' हा दर्जा दिला आहे, तर 'मूडी'ने त्यापेक्षा किंचित वरचा. म्हणजे भारत हा रशिया तसेच इंडोनेशिया वगैरे देशांच्याच वर्गवारीत सध्या मोजला जातोय. अशा वेळी भारताला रोख्यांवर किती टक्के व्याज द्यावे लागेल याची माहिती संबंधितांनी करुन घ्यावी. डॉलर्सच्या तुलनेमध्ये भारतीय रुपयाच्या सततच्या घटणाऱ्या मुल्यामुळेही व्याजदर निश्चिती करण्यास अडथळा येत असतो.

दरम्यान भारत करणार असलेल्या परकीय चलनातील कर्जरोख्यांच्या विक्रीचे नक्की तपशील हे सप्टेंबर महिन्यापर्यंत निश्चित केले जातील हे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गर्व्हनर सुभाषचंद्र गर्ग यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, परकी वित्त बाजारांमध्ये कर्जाऊ देण्यासाठी मुबलक पैसा उपलब्ध असून भारतीय रोख्यांची पतही बाजारात चांगली आहे त्यामुळे पुढारलेल्या देशांच्या बरोबरीनेच भारतालाही (कमी) व्याजदर द्यावा लागेल."

## कर्जरोखे विक्रीत धोके – अजित रानडे

तरीही ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांच्या मते भारताने परकी चलनामध्ये कर्जरोख्यांची (सॉव्हरीन बॉंडस्) विक्री करण्यामध्ये धोके संभवतात. एक तर त्यामुळे सरकारी कर्जावर परकी चलनाच्या दरामधील चढउतारांचा विपरित परिणाम होऊ शकतो. त्याचप्रमाणे त्यांचा भारतातील अंतर्गत वित्त बाजारांमधील व्याजदरावरही परिणाम होतो. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे परकी चलनाच्या बाजारामधील व्याजदर हे सतत व मोठ्या प्रमाणात बदलत असल्याने अर्थअस्थिरता निर्माण होते.



"यंदाच्या आर्थिक वर्षात विकासाचा 8 टक्के दर राखून येत्या पाच वर्षात भारतीय अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलर्सवर नेण्याचा अर्थसंकल्प निश्चितपणे स्तुत्य असला तरी सद्य स्थितीत तो साध्य आहे का हेही पाहायला हवे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञांची मते व सुचना या बाबतीत काय आहेत आणि "एकंदरीतच वाढत्या असहिष्णुतेचा अडथळा आर्थिक प्रगतीमध्ये होतो", असे ज्येष्ठ उद्योगपती आदी गोदरेज का म्हणतात ?

# उदंड स्वप्नात वास्तव कुठे ?




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



चालू आर्थिक वर्षातच देशाची अर्थव्यवस्था तीन लाख कोटी डॉलर्स म्हणजे सुमारे 270 लाख कोटी रुपयांवर नेण्याचा निर्धार, शेतकऱ्यांचे उत्पन्न तीन वर्षात दुप्पट करण्याची घोषणा, पायाभूत सुविधा व वाहतुक व्यवस्थेच्या जाळ्याची योजना, दुकानदारांना निवृत्तीवेतन, परदेशातून कर्जरोख्यांद्वारे गुंतवणुक आणण्याची व्यवस्था, प्रदुषणमुक्ततेसाठी वीजेवरील वाहनांना मदत, अशी अनेक आकर्षक आश्वासने केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी लोकसभेला आपला पहिला अर्थसंकल्प सादर करताना दिली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचे मोठे आशादायक आणि गुलाबी चित्रच त्यांनी आपल्या भाषणाद्वारेच रेखाटले. एक सुंदर नक्षीकाम असलेले स्वप्न उभे केले. पण शब्दांच्या त्या जाळ्यातून बाहेर पडून, भानावर येऊन विचार करताना हे लक्षात येते की, अखेर ही एक महिरप आहे. एक आकर्षक चौकट. वास्तवाचे आणि शक्यतेचे निकष लावून तिची तपासणी केल्यावर कोणते सत्य समोर येते ?

पहिली गोष्ट म्हणजे यंदाच्या आर्थिक वर्षामध्ये विकासाचा 8 टक्के दर हा आश्वासित दर खरेच गाठता येणे शक्य आहे का ? याचे उत्तर म्हणजे, सद्य स्थितीत कदापिही नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकतेच जाहीर केल्याप्रमाणे कदाचित 7 टक्के इतका दर




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

भारत गाठू शकेल. याचाच अर्थ असा की अपेक्षित असा वृद्धीचा दर अर्थव्यवस्था गाठू शकत नसल्याने अनेक महत्त्वाच्या घटकांना आवश्यक तेवठा वित्त पुरवठा होऊ शकणार नाही.

## भांडवलाची टंचाई –

कुठल्याही क्षेत्रात आवश्यक तेवढे भांडवल उभे करण्याची क्षमता ही गुंतवणूक क्षमतेवर अवलंबून असते. ही गुंतवणुकीची निर्मिती खासगी व सरकारी अशा दोन्ही क्षेत्रांमधून होत असते. अर्थव्यवस्थेत होणारी ही गुंतवणूक 'सकल स्थिर भांडवल निर्मिती' (जी.एफ.सी.एफ.) या परिमाणाने मोजली जाते. हे परिमाण जेवढे अधिक तेवढी अर्थव्यवस्थेतील गुंतवणूक अधिक व पर्यायाने विकासक्षमताही अधिक.

सरकारी अर्थ वा सार्वजनिक गुंतवणुक ही कर व अन्य मार्गाने सरकार मिळवत असणाऱ्या महसुलावर अवलंबून असते. नेमका हा महसूल मिळविण्याची सरकारची क्षमताच सध्या संशयास्पद आहे. कशी ते पहा : 2007-08 साली म्हणजे डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असताना सकल स्थिर भांडवल निर्मितीचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे जवळजवळ 33 टक्के होते, ते मोदी सत्तेवर आल्यावर म्हणजे 2014-15 या आर्थिक वर्षात 28.7 टक्क्यांपर्यंत आणि नंतर 28.2 टक्क्यांवर घसरले. नंतरच्या वर्षात





त्यामध्ये किंचित वाढ झाली पण फार नाही. 2018-19 च्या अंदाजानुसार ते आता 29.3 टक्के असावे.

अर्थमंत्र्यांनी 2018-19 चा महसूल (सुधारित अंदाज) हा 1,67,455 कोटी असा निव्वळ करांवर आधारित दाखवला आहे तर 2019-20 च्या अर्थसंकल्पात महसुलवाढीचा जो दर मांडला आहे त्याचे वर्णन 'तर्कदुष्ट व अतिमहत्वाकांक्षी), असेच केवळ होऊ शकेल.

चालू आर्थिक वर्षात (2019-20) प्राप्तीकराचा महसूल 23.25 टक्क्यांनी वाढेल तर वस्तु व सेवा कराचा (जीएसटी) महसूल तब्बल 44.98 टक्क्यांनी उसळी घेईल हा अर्थमंत्र्यांना विश्वास त्यामुळे असंभाव्य, नव्हे अशक्य आणि अनाठायी वाटतो.. आणि त्यामुळेच या आधारावर रंगवलेले चित्रही !

## सारेकाही अवास्तव –

आता या पार्श्वभूमीवर आपण काही थेट आकडेवारीच समोर ठेवून प्रत्यक्ष तुलनाच केल्यास काय चित्र समोर दिसते ते

**केंद्राच्या महसूल वाढीचा दर (टक्के)**

| घटक | २०१८-१९ | (अपेक्षित) २०१९-२० |
|---|---|---|
| प्राप्तीकर | ७.१६ | २३.२५ |
| सीमाशुल्क | – ८.६० | ३२.२० |
| अबकारी कर | ०.०६ | १५.५५ |
| वस्तू व सेवा कर | ३.३८ | ४४.९८ |

या पार्श्वभूमीवर यंदाच्या आर्थिक वर्षामध्ये एकदम, अचानकपणे सरकार महसूल इतक्या आश्चर्यकारकरित्या मोठ्या प्रमाणावर कसा वाढेल आणि जमा होईल असे म्हणते या बाबींची कोणतीही तर्कदृष्ट्या संगती लागत नाही हेच खरे. त्यातही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक आणि खुद्द भारताची रिझर्व्ह बँक यांनी यंदाच्या वर्षी भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग (जास्तीत जास्त) 7 टक्के इतकाच राहील (तर जागतिक अर्थव्यवस्था जेमतेम 3.2 टक्के होईल), असे स्पष्ट भाकीत दिले असताना मा. अर्थमंत्र्यांना मात्र ही दोन आकडी महसूलवाढ एकदम कशी गवसली हे गूढच आहे!

## अर्थतज्ज्ञांच्या सूचनांना बगल

गेल्या पाच वर्षांचा आढावा घेतला तर त्या पाच वर्षात अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर 7.4 टक्के, 8.0 टक्के, 8.2 टक्के, 7.2 टक्के आणि 6.8 टक्के असा म्हणजे सरासरी 7.52 टक्के असा राहिला. मात्र गेली तीन वर्षे सातत्याने तो घसरतच आहे. मात्र या कालावधीत एकदाही दोन अंकी विकासदराचे आश्वासन मोदी सरकारला पाळता आले नाही.. (आणि ते यापुढेही किमान चालू आर्थिक वर्षात तरी पूर्ण होईल असे वाटत नाही).

भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थिती लक्षात घेऊन आणि समाजातील सर्व घटकांना प्रगतीच्या मार्गावर घेऊन जाण्याच्या दृष्टीने सरकारपुढे काही सूचना नामवंत भारतीय व परदेशस्थ भारतीय अर्थतज्ज्ञांनी 2018 सालच्या ऑक्टोबर महिन्यामध्ये संशोधन निबंधाच्या स्वरुपात मांडल्या होत्या. या 14 निबंधांचे संकलनही पुस्तकरुपात प्रसिद्ध झाले होते. त्यात पुढील महत्वाच्या बाबींवर भर देण्यात आला होता.

वित्तीय तुटीवर नियंत्रण : - महागाई व चलनवाढ आटोक्यात राखण्यासाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे वित्तीय तुट काबूत राखणे. मोदी सरकारला ही कामगिरी पार पाडता आली नसून अद्यापही ती साडेतीन टक्क्यांच्या आसपास आहे. अर्थसंकल्पामध्ये या आर्थिक वर्षातील 3.3 टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे आश्वासन अर्थमंत्र्यांनी दिले असले तरी ते कितपत शक्य होईल याबाबत रास्त शंका आहे.

## शेती, बँकिंग क्षेत्रात सुधारणा

शेतीमालाला उठाव आणि भाव दोन्ही नसल्याने गेल्या काही वर्षात कर्जबाजारी होऊन हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांची कुटुंबे अक्षरशः उघड्यावर आली आहेत. आजही देशात सर्वाधिक रोजगार देणाऱ्या परंतु सर्वथा असंघटित अशा या क्षेत्राला तगण्यासाठी ठोस कार्यक्रम आखण्याची गरज आहे. परंतु केवळ आश्वासने (शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करुन) देण्यापलिकडे या अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांना काहीही दिलेले नाही. तीच गोष्ट बँकिंग क्षेत्रातली. अनुत्पादक कर्जांच्या ओझ्याखाली पिचणाऱ्या बँकिंग क्षेत्राला आधुनिकतेबरोबरच आर्थिक क्षमतेनेही भागभांडवल पुरवठा करण्याची तातडीची गरज आहे. सार्वजनिक बँकांनाही 70 हजार कोटी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन अर्थसंकल्पात आहे, पण ही रक्कम गरजेच्या मानाने फारच अपुरी आहे.

## औद्योगिक वातावरणात सुधारणा :

मंदी व मागणीच्या अभावामुळे औद्योगिक उत्पादनावर विपरित परिणाम जाणवतो आहे. त्यामुळे कामगार कपात तर होतेच परंतु साहाय्यक व संलग्न उद्योगांमधूनही उत्पादन कमी होऊन त्यातले रोजगारही संपुष्टात येतात. उद्योगांना उठाव देणाऱ्या करसवलती व उत्तेजन योजना आखण्याबरोबरच देशात उद्योगस्नेही वातावरणनिर्मितीची आवश्यकता होती. ती संधीही या अर्थसंकल्पाने गमावली आहे.

## सामाजिक स्थैर्य हवे : आदी गोदरेज

आर्थिक प्रगती साधण्यासाठी योग्य आर्थिक धोरणांबरोबरच राजकीय आणि सामाजिक स्थैर्य व सहिष्णुता यांची आवश्यकता असते. या दोन्ही बाबतीमध्ये भारत अधिकाधिक दोलायमान होत चालला आहे की काय असे वाटावे अशी परिस्थिती सभोवताली निर्माण होते आहे. देशातील वाढती झुंडशाही, गुन्हेगारी आणि अस्थैर्य यांच्या संदर्भात ज्येष्ठ उद्योगपती आदी गोदरेज यांनी काही परखड सत्ये समोर मांडली आहेत. ते म्हणतात, "देशाची अर्थव्यवस्था 5 लाख कोटी डॉलर्सपर्यंत नेण्याचे सरकारचे स्वप्न निश्चितच अभिनंदनीय. परंतु नेतृत्वाला वाटते त्याप्रमाणे व गतीने वास्तवात सुधारणा होताना दिसत नाहीत. जातीय-धार्मिक हिंसाचार, महिला व दलितांवरील अत्याचार, स्वयंघोषित नीतीरक्षक व गोरक्षकांचा हैदोस व एकंदरीत वाढती असहिष्णुता हे आर्थिक प्रगतीच्या मार्गातील अडथळे आहेत", गोदरेज यांची स्पष्टोक्ती बरेच काही सांगून जाते.





Nanded City, Pune

The Maximum City

Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक-टू-स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण-द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by MAGARPATTA CITY ©

The pride of Pune

Call: 020-67275300 / 1 / 2

CREDAI PUNE METRO

www.nandedcitypune.com

info@nandedcitypune.com

An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com



## दिशाहीन अर्थसंकल्प ... कुणाच्याच फायद्याचा नाही

# अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर


**डॉ. सुधीर भोंगळे**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जो अर्थसंकल्प सादर केला त्यावरुन भारतीय शेतकऱ्यांपुढे जे प्रश्न उपस्थित झाले ते येथे थोडक्यात नमूद करीत आहोत.

### झिरो बजेट शेती

झिरो बजेटची व्याख्याच नाही. आधी ती करा. 1960-65 च्या आधीची बहुतांश सगळी शेती झिरो बजेट व सेंद्रीयच होती. खते-औषधे यांचा वापर फारसा होतच नव्हता.

झिरो बजेटमध्ये शेतकऱ्याने स्वतःचेच बियाणे, शेणखत, कंपोस्ट वापरावे असे अभिप्रेत आहे. खर्च अजिबात करायचा नाही असे गृहीत आहे. तसे केले तर उत्पादन एकदम ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूर्वी अनेकदा लोकांनी ऑर्गेनिक शेती, झिरो बजेटची शेती करुन पाहिली आहे व ती सोडून ते पुन्हा मिश्र शेतीकडे वळले. या झिरो बजेट शेतीमुळे सरकारचा खर्च वाचेल. कोणतेच अनुदान उदा. खताची सबसिडी, कर्ज, मायक्रो इरिगेशन सबसिडी देण्याची गरज पडणार नाही. कर्ज



**केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी २०१९–२० या वर्षासाठी सादर केलेला अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांच्या इच्छा व स्वप्नांना हरताळ फासणारा आहे. प्रचंड विरोधाभास असलेल्या या अर्थसंकल्पात एकीकडे झिरो बजेट शेतीची आग्रहपूर्वक मांडणी केली जाते तर दुसरीकडे रासायनिक खतावरील सबसिडीसाठी ९९०० कोटी रुपयांची तरतूद केली जाते. इतकेच नव्हे तर ३१ जुलैला पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत रासायनिक खतावरील सबसिडी आणखीन वाढविण्याचे संकेत दिले जातात. शेतकऱ्याचे उत्पन्न २०२२ पर्यंत दुप्पट करण्याची भाषा बोलली जाते पण शेतीमालाला आधारभूत किंमती मात्र त्या प्रमाणात वाढवून दिल्या जात नाहीत. नव्हे नव्हे... जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे स्वामीनाथन समितीच्या शिफारशींचीही अंमलबजावणी सरकार करीत नाही. मग प्रश्न पडतो, मोदी सरकारला शेतकऱ्यांचे खरोखरचं कल्याण करायचे आहे का? त्याची बीजे अर्थसंकल्पात दिसायला नकोत का? तशी ती दिसत नाहीत हे मात्र खरे!**

दिले नाही की कर्जमाफीचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. सरकारचा हा फायदा आहे. म्हणजे अप्रत्यक्षरीत्या सरकारचे उत्पन्न वाढणार आहे. शेतकऱ्यांसाठी हे झिरो बजेटच आहे असे देवेंद्र यादव म्हणाले. 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होणार? सरकार शेतकऱ्यांना जुन्या परंपरागत शेतीकडे ढकलू पाहाते आहे. परंपरागत शेतीसाठी अर्थसंकल्पात 325 कोटींची तरतूद केली आहे आणि त्याच वेळी रासायनिक खताच्या सबसिडीसाठी 9900 कोटींची तरतूद केली आहे. केवढा हा विरोधाभास आहे.

वाढत्या लोकसंख्येला जगविण्यासाठी व देशाची अन्नधान्याची स्वयंपूर्णता कायम टिकविण्यासाठी झिरो बजेटपेक्षा नवीन तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक शेतीची व मोठ्या भांडवली गुतंवणुकीची गरज आहे.

## शेतकरी उत्पादक कंपन्या

10 हजार शेतकरी उत्पादक, कंपन्या, संस्था (गट) उभ्या करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. आधी निर्माण झालेल्या

संस्थांची स्थिती आज काय आहे हे डोळे उघडे ठेवून तपासा. 1 कोटी अनुदान घेतल्यानंतर संस्था बंद पडण्याची शक्यता जास्त. किंबहुना अनुदान लाटण्यासाठीच संस्था निर्माण होतात. सध्या देशात कागदावरच पाच हजार कंपन्या अस्तित्त्वात आहेत. प्रत्यक्षात 50 कंपन्या जेमतेम, कशाबशा चालू आहेत. या कंपन्या व्यवसाय कसा चालवितील त्याचे धोरणच नाही. या कंपन्यांना भांडवल उभारणीला मर्यादा आहेत. एक तर शेतकऱ्यांनी स्वतः भांडवल घातले पाहिजे. पण त्याच्याकडे पैसेच नाहीत. दुसरी गोष्ट सरकार जे अनुदान देते ते व्यवसायासाठी पुरेसे नाही. तिसरी गोष्ट बँकांनी कंपन्यांना कर्जपुरवठा करणे अभिप्रेत आहे. पण बँका कंपनीचे स्वतःचे भागभांडवल असल्याशिवाय कर्जपुरवठा करीत नाहीत. ही कोंडी कशी फोडणार ? शेतकऱ्यांशिवाय बाहेरुन कुणीही कंपनीत गुंतवणूक करु शकत नाही. बँका कर्जपुरवठा करायला नाखूष असतात. त्यामुळे धंद्याचा विस्तारच होत नाही. सुरुवातीची गुंतवणूक, इन्फ्रास्ट्रक्चरची उभारणी, मार्केटिंग, पोस्ट हार्वेस्ट, प्रोसेसिंग, ब्रँन्डिंग, कोल्ड स्टोअरेजेस् व इतर



अनेक गोष्टींकरीता आर्थिक, तांत्रिक पाठबळ पुरवावे लागते. प्रत्येक कमॉडीटीला असा सपोर्ट द्यावा लागतो. त्या दृष्टीने धोरण आखणे गरजेचे आहे. कंपन्या स्थापण्याचे धोरण आहे पण चालविण्याचे नाही. मिनिस्ट्री ऑफ फूड प्रोसेसिंगचे बजेट फक्त अडीच हजार कोटींचे आहे. त्यात काय होणार? खरंच सरकारला शेतकऱ्यांसाठी काम करायचे असेल तर बजेटची तरतूद वाढवावीच लागेल. पण त्याला अनुसरुन धोरणेही तयार करावी लागतील.

## घटता कृषी विकास दर

देशातला शेतीविकासाचा दर दिवसेंदिवस घटत चालला आहे. 2017 मध्ये हा दर 6.3 टक्के होता. 2018 मध्ये तो 5 टक्क्यांवर आला आणि आता 2019 मध्ये ते 2.9 टक्क्यांवर गेला आहे. ही तिनही वर्षे पावसाच्या दृष्टीने नॉर्मल होती. तरी ही परिस्थिती उद्‌भवली. आता या वर्षी तर देशाच्या अनेक भागात अजूनही पुरेसा पाऊस झालेला नाही. खरीपाच्या खूप कमी क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. त्यामुळे 2020 मध्ये हा कृषी विकास दर आणखीन खाली जातोय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. सरकारची शेतीतली भांडवली गुंतवणूक दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. 2012 मध्ये शेतीतली सरकारची गुंतवणूक 2 लाख, 84 हजार, 424 कोटी होती. ती 2018 मध्ये 2 लाख, 73 हजार, 755 कोटींवर आली.

एकीकडे सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न 2022 पर्यंत दुप्पट करण्याची भाषा करते. पण शेतीवरची गुंतवणूक मात्र दिवसेंदिवस कमी करत चालले आहे. सरकारने मुलभूत आणि पायाभूत सुविधा व इन्फ्रास्ट्रक्चरची निर्मिती करण्यासाठी शेतीतली गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. शेती आणि पाणी हे दोन्ही विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत असले तरीही त्यांच्या उत्पन्नाला मर्यादा असल्यामुळे भांडवली गुंतवणुकीसाठी केंद्राने राज्यांना मदत करणे गरजेचे आहे. यासाठी यापूर्वी श्री. शरद पवार यांनी आर.के.वाय. (राष्ट्रीय कृषी विकास योजना) व ए.आय.बी.पी. (ॲक्सिलरेटेड इरिगेशन प्रोग्रॅम) या योजना सुरु केल्या होत्या. त्या केंद्र सरकारने सध्या बंद केल्या आहेत. त्या पुन्हा सुरु कराव्यात. त्यातून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी मदत मिळेल. सिंचनाचे रेंगाळलेले प्रकल्प वेगाने पूर्ण होऊन शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळेल.

## शेतीमालाच्या आधारभूत किंमती

3 जुलै 2019 रोजी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतीमालाच्या किमान आधारभूत किंमतीमध्ये वाढ करण्याचा जो निर्णय





घेण्यात आला आहे तो शेतकऱ्यांची मोठी चेष्टा करणारा व त्यांच्या तोंडाला पाने पुसणारा आहे. पहिल्या कारकिर्दीत सरकारने सांगितले होते की स्वामिनाथन समितीने केलेल्या शिफारशींची पूर्णपणे अंमलबजावणी करु. मूळ उत्पादन खर्च व त्यावर अधिक 50 टक्के नफा असे गृहित धरुन म्हणजे 150 टक्के किंमत शेतकऱ्याला देण्यात येईल. प्रत्यक्षात भाताची (धान) किंमत क्विंटलमागे 65 रुपयांनी म्हणजे किलोमागे 65 पैशांनी वाढविली. बाजरीची आधारभूत किंमत किलोमागे 50 पैशांनी, उडीदाची शंभर पैशांनी, तुरीची 125 पैशांनी, भुईमुगाची दोन रुपयांनी, सोयाबीनची तीन रुपयांनी तर कपाशीची एक रुपयांनी वाढविली आहे.

उत्पादन खर्च मात्र यापेक्षा कितीतरी अधिक पटीने वाढलेला आहे. डिझेल आणि पेट्रोलवर जो कर सरकारने नव्याने बसविला त्यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत अडीच ते तीन रुपयांनी वाढ झाली आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे सगळ्या वस्तुंचे दर वाढून महागाई आणखीन गगनाला भिडली आहे. अगोदरच आधारभूत किंमती कमी होत्या. त्यात महागाईची भर. स्वामिनाथन समितीच्या शिफारशी कुठे गेल्या? काय झाले त्या घोषणेचे? अशा किंमतींनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल का घटेल? मग 2022 पर्यंत उत्पन्न दुप्पट कसे होणार? त्यासाठी आधारभूत किंमती दुप्पट वाढ केली पाहिजे.

## वित्तीय तपशीलाबाबत पारदर्शकता का नाही?

यात तीन मुद्दे आहेत -

अ) अर्थमंत्र्यांनी भाषणात कुठलीच आकडेवारी दिली नाही. तुट किंवा महसूल जो काही असेल तो राष्ट्रीय उत्पादनाच्या टक्केवारीच्या स्वरुपात सादर केला पाहिजे. वित्तीय तुट 3 टक्के आहे म्हणजे नेमकी किती आहे? तिचे आकारमान काय आहे? महसुली तुट किती आहे? ही वित्तीय तूट भरुन काढण्यासाठी किती निधीची उभारणी करावी लागणार आहे? ती कशी करणार आहे? याबाबत भाषणात अवाक्षर उल्लेख नाही. ही सगळी आकडेवारी परिशिष्टात दिली असे म्हणतात. किती लोक परिशिष्ट व बजेट वापरतात. किती लोकांना ते उपलब्ध होते. म्हणजे एका अर्थाने आकडेवारी उपलब्ध करुन दिली असे म्हणायचे पण त्याचवेळी ती दडवायची असे सरकारचे धोरण आहे.

ब) 2003 साली फिसकल रिस्पॉन्सिबिलीटी ॲन्ड बजेट मॅनेजमेंट ॲक्ट मंजूर झाला आहे. त्याला एफआरबीएम ॲक्ट म्हणतात. या कायद्याप्रमाणे सरकारचे मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण काय असेल हे सुद्धा बजेट बरोबरच संसदेत सादर करावे लागते. त्यात सरकारवर कर्जाचा बोजा किती? करांची थकबाकी किती? ती किती वर्षांपासूनची आहे आणि ती वसूल करण्यासाठी सरकार कोणती पावले टाकीत आहे हे सगळे सादर करावे लागते. बजेटच्या भाषणानंतर लगेच ते ठेवावे लागते. अर्थमंत्र्यांच्या भाषणात याचा काहीही उल्लेख नाही.

क) अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी जो आर्थिक सर्व्हे अहवाल प्रसिद्ध झाला आहे त्यात सरकारच्या 2014 ते 2019 या पाच वर्षांच्या काळातील केवळ गुणवर्णन व आरती आहे. देशापुढचे आर्थिक प्रश्न काय आहेत? ते कसे दुरुस्त करणार? त्यासाठी पुढच्या 5 वर्षांत कोणती पावले उचलणार याचा उल्लेख नाही. अर्थव्यवस्था 5 लाख कोटींची करायची आहे एवढाच धोशा लावला आहे. पण ती कशी करणार याचा कार्यक्रम दिलेला नाही. निवडणुक प्रचारात जसा राष्ट्रीय सुरक्षिततेचा मुद्दा समोर ठेवून बाकी सगळे मुद्दे जाणीवपूर्वक बाजूला ठेवले तसे आर्थिक सर्व्हेत केले आहे. समस्यांबाबत अवाक्षरही काढलेले नाही.



# मोदी सरकारची अति घाई अपघाताला निमंत्रण देई?



**आकाश**, नवी दिल्ली





दहशतवादासंबंधीच्या विधेयकावर लोकसभेत झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांमधील अनेक सदस्यांनी काही वाजवी व ग्राह्य अशा शंका व्यक्त केल्या. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सदस्या सुप्रिया सुळे यांनी अतिशय अचूकपणे या कायद्याचा(गैर)वापर सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संघटना, स्वतंत्र लेखक व कार्यकर्ते यांच्या विरुध्द होऊ शकतो याकडे सरकारचे लक्ष वेधले. मुंबईवरील हल्ल्यांनंतर तत्कालीन युपीए सरकारने दहशतवादी कारवायांचा मागोवा घेऊन त्याविरुध्द कारवाई करण्यासंबंधी अशाच स्वरुपाचे कायदे करण्याचा प्रस्ताव केला असता त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री व सध्याच्या पंतप्रधानांनी कसा विरोध केला होता आणि केंद्र सरकारच्या या कायद्यांमुळे संघराज्य व्यवस्था दुर्बळ व कमजोर होईल व राज्यांच्या स्वायत्ततेवर कसे आक्रमण होईल याबद्दल आरडाओरडा केला होता याची आठवणही दिली.

हल्ली रस्ते चांगले झाल्याने वाहनांचा वेग व गति वाढलेली आढळते. एक्सप्रेस, सुपर एक्सप्रेस हायवे तयार करण्यात आल्याने तर या गतीला सीमाच राहिलेली नाही. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेलेही आढळते. या रस्त्यांवर एक पाटी लिहिलेली नेहमी आढळते. एवढेच नव्हे तर आपल्या एसटीच्या बस आणि इतरही प्रवासी वाहतुकीच्या वाहनात 'अति घाई मृत्युला निमंत्रण देई' असे वाक्य लिहिलेले हमखास आढळत असते. ड्रायव्हरला वेगाचे भान रहावे आणि रस्ता चांगला आहे म्हणून भरधाव वेगाने गाडी चालवून स्वतःसह सहप्रवाश्यांचेही प्राण त्याने संकटात आणू नये हा या पाठीमागील उद्देश! याचे पालन सर्वच करतात असे नव्हे! त्यामुळेच अनेकवेळेस तुफान वेगाने गाड्या चालवून मृत्युला निमंत्रण देणारे महाभागही आढळतात. राजकारणातही सध्या असेच काहीसे होताना आढळत आहे. भाजपला लोकसभा निवडणुकीत निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतर त्यांचा वारू असा काही वेगात दौडू लागला आहे की बस्स ! वारू म्हणजे घोडा! पण आपण 21व्या शतकात असल्याने भाजपची गाडी सुसाट वेगाने निघाली आहे असे म्हणू या ! या गाडीचा वेग प्रचंड आहे ! त्यामुळेच या गाडीचा वेग पाहता वरील पाटीची आठवण झाल्याखेरीज रहात नाही. लोकसभा निवडणुकीनंतरच्या पहिल्याच संसद अधिवेशनात सरकारने विधेयके मंजूर करण्याचा असा काही सपाटा लावला आहे की सरकारला काय पुन्हा लवकर निवडणुकीला सामोरे जायचे आहे की काय असे वाटू लागले आहे. हा वेग भीतीदायक आहे कारण कोणत्याही विधेयकाची पुरेशी छाननी न करता केवळ आपल्याकडे बहुमत आहे त्या जोरावर सरकारने अत्यंत महत्वाची विधेयके देखील मंजूर करण्याचा चंग बांधलेला आढळतो. या अनावश्यक घाईमुळे सरकारच्या हेतुबद्दल शंका येऊ लागली आहे. सतरावी लोकसभा अस्तित्वात आल्यानंतर सदस्यांना त्यांचे आसनक्रमांक न देता, विविध मंत्रालयांशी निगडित संसदीय स्थायी समित्या स्थापन न करता त्याआधीच सरकारला पाहिजे असलेली विधेयके मंजूर करण्याची घाई केली जात आहे. ही एवढी घाई कशासाठी?

या पार्श्वभूमीवरच गेल्या काही दिवसात संसदेकडून मंजूर होणाऱ्या काही विधेयकांची चर्चा सर्वत्र जोरदारपणे चालू आहे. यात तीन प्रमुख विधेयकांवर विशेष चर्चा होत आहे. याचे कारण त्या विधेयकांचा थेट संबंध नागरिकांच्या विविध स्वातंत्र्यांशी संबंधित आहे. ही तिन्ही विधेयके संबंधित मूळ कायद्यात दुरुस्ती करणारी आहेत. माहिती अधिकार कायदा, एनआयए किंवा राष्ट्रीय तपास संस्था कायदा आणि बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा हे ते मूळ कायदे असून केंद्र सरकारने त्यात काही दुरुस्त्या केलेल्या आहेत. या













दुरुस्त्यांबाबत केंद्र सरकारने भरपूर मखलाशी करण्याचा प्रयत्न चालविला आहे. या दुरुस्त्यांचा उद्देश नागरी स्वातंत्र्याचा संकोच करण्याचा नाही वगैरे नेहमीचे युक्तिवाद सरकारतर्फे केले जात आहेत. सरकारकडे लोकसभेत असलेले निर्विवाद बहुमत आणि राज्यसभेतील काही प्रादेशिक पक्ष यांच्या मदतीने केंद्र सरकार या विधेयकांचे कायद्यात रुपांतर करण्यात

यशस्वी होणार यातही कुणाला शंका बाळगण्याचे कारण नाही. परंतु ज्या घाईघाईने सरकारने वेगवेगळी विधेयके मंजूर करण्याचा सपाटा लावला आहे त्यामुळे त्यामागील हेतुबद्दल शंका निर्माण झाल्याखेरीज रहात नाही. ज्या पध्दतीने कायद्यांची मोडतोड सुरु आहे ती लोकशाही व्यवस्थेला, या व्यवस्थेखालील विविध नागरी स्वातंत्र्यांना विघातक आहे.

लोकसभेने नुकतेच 'अनलॉफुल ॲक्टिव्हिटिज




(प्रिव्हेन्शन) ॲमेंडमेंट बिल(2019)' संमत केले. प्रामुख्याने दहशतवादी व विघातक कारवायांना प्रतिबंध करण्याच्या किंवा त्यांना आळा घालण्याच्या हेतुने हे विधेयक तयार करण्यात आले आहे. या विधेयकाबद्दल सर्वाधिक चिंता व्यक्त केली जात आहे. त्याला साधार कारणे आहेत. मूळच्या कायद्यानुसार सरकारला एखाद्या देशविरोधी किंवा दहशतवादी किंवा देशविघातक संघटनेला बेकायदेशीर किंवा दहशतवादी म्हणून अधिकृतपणे घोषित करण्याचा अधिकार मिळालेला होता. या नव्या दुरुस्तीनुसार एखाद्या व्यक्तीला देखील दहशतवादी व देशविरोधी किंवा विघातक म्हणून जाहीर करण्याचे अधिकार सरकारला मिळणार आहेत.

लोकसभेत हे विधेयक संमत झाल्यानंतर ते राज्यसभेत संमत होण्यात अडचण येण्याची शक्यता नाही. विशेषतः सरकारने सध्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यांविरुध्द 'धाक' व जोर-जबरदस्तीचे धोरण अमलात आणले असल्याने या विधेयकास पाठिंबा मिळविण्यात सरकारला अडचण येण्याची शक्यता नाही. म्हणजेच या विधेयकाचे प्रत्यक्ष कायद्यात रुपांतर करण्यापूर्वीच सरकारने अप्रत्यक्षपणे त्याचा अंमल सुरु केल्याचे चित्र आढळते. पूर्वी प्रतिस्पर्ध्यांना आपल्या बाजुला वळविण्यासाठी 'साम-दाम दंड-भेद' या चार मार्गांचा अवलंब केला जात असल्याची मान्यता होती. आता 'साम'ची जागा 'धाक'ने घेतली आहे. आता या सरकारतर्फे 'धाक-दाम-दंड-भेद' या गोष्टींचा अवलंब करुन प्रतिस्पर्ध्यांना सरकारच्या बाजुने वळविले जात आहे. या विधेयकाबद्दल समंजस वर्गातून चिंता व्यक्त होत आहे. देशातील प्रमुख वृत्तपत्रांनी त्यांच्या संपादकीयातून या विधेयकाच्या अंमलबजावणीबाबत शंका व्यक्त केल्या आहेत. त्या शंका निराधार नाहीत आणि या संभाव्य कायद्याच्या अंमलबजावणीत

निरपराध लोकांचा छळ होऊ नये याबाबत विशेष खबरदारी घेण्याचा आणि त्याबाबत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला या बहुतेक संपादकीयातून देण्यात आला आहे. यापूर्वीही दहशतवादी किंवा विघातक व देशविरोधी कारवाया करणाऱ्या घटकांना आला घालण्याच्या संदर्भात अनेक कायदे झालेले होते आणि त्या कायद्यांचे दुरुपयोग सर्वसामान्य व निरपराध लोकांच्या विरोधातच झाल्याचे असंख्य दाखले व उदाहरणे आहेत. 'टाडा', 'पोटा', 'मकोका', 'रासुका' अशा अनेक कायद्यांचा उल्लेख या संदर्भात करता येईल. त्यामुळेच हा कायदा खरोखर दहशतवाद्यांच्या विरोधात वापरला जाईल आणि पूर्वीच्या कायद्यांप्रमाणे तो भीतीदायक किंवा भयावह ठरु नये अशी अपेक्षा जवळपास बहुतेक वक्त्यांनी यावर बोलताना व्यक्त केली.

या विधेयकावर लोकसभेत झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांमधील अनेक सदस्यांनी काही वाजवी व ग्राह्य अशा शंका व्यक्त केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्या सुप्रिया सुळे यांनी अतिशय अचूकपणे या कायद्याचा(गैर)वापर सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संघटना, स्वतंत्र लेखक व कार्यकर्ते यांच्या विरुध्द होऊ शकतो याकडे सरकारचे लक्ष वेधले. यासंदर्भात भिमा-कोरेगाव प्रकरणी ज्या लेखक व सामाजिक कार्यकर्त्यांना डांबण्यात आले आहे त्या प्रकरणाचा संदर्भही त्यांनी दिला. मुंबईवरील हल्ल्यांनंतर तत्कालीन युपीए सरकारने दहशतवादी कारवायांचा मागोवा घेऊन त्याविरुध्द कारवाई करण्यासंबंधी अशाच स्वरुपाचे कायदे करण्याचा प्रस्ताव केला असता त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री व सध्याच्या पंतप्रधानांनी कसा विरोध केला होता आणि केंद्र सरकारच्या या कायद्यांमुळे संघराज्य व्यवस्था दुर्बळ व कमजोर होईल व राज्यांच्या स्वायत्ततेवर कसे आक्रमण होईल याबद्दल आरडाओरडा केला होता याची आठवणही दिली. गृहमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात या मुद्यांची दखल घेऊन या कायद्याच्या दुरुपयोगाची शक्यता फेटाळून लावली. मात्र 'शहरी माओवाद्यांना' सोडणार नाही असेही त्वेषाने सांगितले. पूर्वी अशा कायद्यांना विरोध करण्यात आला होता त्यात कदाचित चूक झाली असेल पण आता ती सुधारत असल्याचा दावाही त्यांनी केला.

या दुरुस्ती विधेयकावरील चर्चेतून त्याच्या दुरुपयोगाचा मुद्दा प्रामुख्याने मांडण्यात आला. ही शंका किंवा भीती साधार आहे. कारण यापूर्वी देखील 'टाडा', 'पोटा', 'मकोका', 'रासुका' किंवा काश्मीरमधील 'पीएसए' (पब्लिक सिक्युरिटि ॲक्ट) यांच्या मोकाट व यथेच्छ दुरुपयोगाच्या कथा-कहाण्या लोकांच्या स्मरणात आहेत. जे विरोधी पक्ष आज त्याला विरोध करीत आहेत त्यांची पूर्वीची सरकारेही याला जबाबदार होती हेही नमूद करावे लागेल. यामधील काही तरतुदींबद्दलही शंका व्यक्त करण्यात आल्या. काही सदस्यांनी या नव्या तरतुदींनुसार या कायद्याखाली पकडण्यात आलेल्या व्यक्तीवर स्वतःचे निरपराधित्व सिध्द करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे असा मुद्दा मांडला. परंतु गृहमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरात ती जबाबदारी तपाससंस्थेवरच असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे किमान एका महत्वाच्या मुद्यावर खुलासा झाला आहे.


कोरेगाव-भीमा दंगल

या नव्या दुरुस्त्यांमध्ये काही तरतुदी निश्चितपणे शंकास्पद आहेत. त्यानुसार एखाद्या व्यक्तीला दहशतवादी कारवायांशी संबंधित असल्याच्या संशयावरुन पकडल्यानंतर त्यास त्याविरुध्द दाद मागायची असली तरी त्यास न्यायालयाचा पर्याय ठेवण्यात आलेला नाही. कारण यासंदर्भात गृहमंत्रालयाकडून दिल्या जाणाऱ्या स्पष्टीकरणांनुसार एखाद्या व्यक्तीला संशयावरुन पकडताना गुप्तचर विभागाच्या माहितीवर प्रमुख भिस्त ठेवण्यात आलेली आहे. ती माहिती तपाससंस्थांनी तपासल्यानंतर गृहमंत्रालयाने त्या व्यक्तीस पकडायचे की नाही याचा निर्णय करायचा आहे. गृहमंत्रालयाने यास होकार दिल्यानंतर पकडलेल्या व्यक्तीस गृह मंत्रालयाकडे दाद मागण्याची मुभा देण्यात आलेली आहे. मंत्रालयाने 45 दिवसात त्यावर निर्णय करण्याचे बंधन

यामध्ये असून त्यानंतरही त्या निर्णयाविरुध्द पकडलेल्या व्यक्तीस एका विशेष आढावा समितीकडे दाद मागण्याची संधी देण्यात आली आहे. ही आढावा समिती स्वतंत्र व्यक्तींची म्हणजेच निवृत्त न्यायाधीशांची असेल. या सर्व तरतुदी लक्षात घेता यामध्ये गृह मंत्रालयास सर्वाधिकार देण्यात आलेले आहेत. यामध्ये न्यायालयांना कोणताच वाव ठेवलेला आढळत नाही. गृह मंत्रालयाचे प्रमुख हे राजकीय असतात. त्यामुळेच या प्रकरणी सर्वाधिकार असलेल्या गृह मंत्रालयाची कारवाई राजकीय हेतूने प्रेरित नसेल याची हमी कोण देणार? हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

या कायद्याचा दुरुपयोग दहशतवाद्यांप्रमाणेच राजकीय प्रतिस्पर्ध्यांच्या विरोधात अधिक होण्याच्या शक्यतेचे खंडन गृहमंत्र्यांनी केलेले आहे. तसेच या शंकांचे खंडन करताना गृह मंत्रालयांच्या अधिकाऱ्यांनी प्रामुख्याने या कायद्याचा वापर दहशतवाद्यांच्या विरोधात केला जाणार आहे असे सांगताना हा कायदा एकदा संसदेने



संमत केला आणि त्याबाबतचे नियम व कामकाजपध्दतीचे निकष तयार केले जाऊन ते अधिसूचित झाल्यानंतर सर्वप्रथम या कायद्याखाली पाकिस्तानस्थित दहशतवादी मौलाना मसूद अजहर आणि हफीज सईद या दोघांना दहशतवादी म्हणून घोषित करण्यात येईल असे सूचित केले आहे. ज्याप्रमाणे एनआयए या तपाससंस्थेला परदेशातही दहशतवाद्यांविरुध्द कारवाई करण्यासाठी अधिकार देण्याचे विधेयक नुकतेच



संमत करण्यात आले आहे त्याच मालिकेत या नव्या कायद्याखाली पाकिस्तानातील दहशतवाद्यांना दहशतवादी म्हणून घोषित करण्याचा हा प्रकार असेल. मुळात हे अधिकार भारताने अमलात आणले तरी प्रत्यक्षात कारवाईच्या पातळीवर त्यांची परिणामकारकता काय राहणार आहे याचे उत्तर सरकारने दिलेले नाही. गृहमंत्र्यांनी यासंदर्भात आंतरराष्ट्रीय ठरावांचे दाखले देऊन हफीज किंवा मसूद अजहर यांच्याविरुध्दच्या कारवायांबाबत ही अडचण होती व ती या नव्या दुरुस्तीने दूर होईल असे सांगितले. परंतु केवळ दहशतवादी म्हणून घोषित करण्याच्या मानसिक समाधानापलीकडे त्याचे महत्व नसेल. गृहमंत्र्यांनी या दुरुस्तीवरील चर्चेला उत्तर देताना दहशतवाद व दहशतवादी किंवा मसूद अजहर व हफीज सईद यांचा उल्लेख केवळ एकदाच केला. त्यांच्या उत्तराचा रोख मुख्यतः शहरी माओवादी, मानवाधिकार कार्यकर्ते, समाजातील शोषित व वंचित वर्गांना न्याय देण्यासाठी काम करणाऱ्या संघटना व त्यांचे कार्यकर्ते यांच्या विरोधात अधिक आढळून आला.



त्यामुळेच त्यांनी जेव्हा 'शहरी माओवाद्यांची गय करणार नाही' हा उल्लेख करताना त्यांच्या चेहऱ्यावरील त्वेष जाणवणारा होता.

या पहिल्याच अधिवेशनात काही महत्वाची विधेयके सरकारने अतिशय घाईघाईने संमत करवून घेतली. यामध्ये माहिती अधिकार कायदा(नेमणुका, वेतन व सेवाशर्ती), राष्ट्रीय तपास संस्था कायदा दुरुस्ती(एनआयए) आणि त्याच मालिकेत हे दहशतवादी कारवाया प्रतिबंधात्मक

# हिंमत असेल तर 'नथूराम गोडसे' ला दहशतवादी संबोधा...

## कपिल सिब्बल यांचे गृहमंत्री अमित शहा यांना आव्हान

"गृहमंत्रीजी, तुम्ही (सरकार) तुमच्या मनाला वाटेल त्याला दहशतवादी ठरवू शकत नाही. या देशाच्या राष्ट्रपित्याचा खून करणारा नथुराम गोडसे हाही दहशतवादीच होता; तुमच्यात हिंमत असेल, तर गोडसेला दहशतवादी संबोधा," अशा शब्दांत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व कायदेतज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी मोदी सरकारला उघड आव्हान दिले. 'बेकायदा कारवाया प्रतिबंधक विधेयक-२०१९' वरील राज्यसभेतील चर्चेत सिब्बल यांनी शहांना जोरदार लक्ष्य केले.



कपिल सिब्बल

सिब्बल यांनी चर्चेला प्रारंभ करताना विचारले, "सरकार नेमक्या कोणत्या वळणावर व कोणत्या पद्धतीने हे निश्चित करेल की एखादी व्यक्ती दहशतवादी आहे किंवा नाही? जसा हाफीज सईद दहशतवादी आहे तसाच गोडसेही दहशतवादीच आहे. पण, ते मान्य करण्याची हिंमत तुमच्यात नाही. १९४७ पासून आजतागायत तुम्हाला ही हिंमत दाखवता आली नाही.



नथुराम गोडसे

गृहमंत्री आता याक्षणी तरी तुम्ही उठून संसदेच्या पटलावर हे मान्य करा."

"तुमच्या सरकारने आज ज्यांना गजाआड टाकले, त्यात शिक्षणतज्ज्ञ आहेत. संयुक्त राष्ट्रांनी त्यांचे काम मान्य करून त्यांना निधी मंजूर केलेला आहे. उद्या तुम्ही एका अधिसूचनेच्या फटकाऱ्याने कोणालाही दहशतवादी ठरवाल. शहरी नक्षलवादाचा आरोप असलेला या कायद्यामुळे उद्या थेट दहशतवादांच्या यादीत जाऊन बसू शकतो. त्याला पुढे न्यायालयाने निर्दोष मुक्त केले तर काय? अशा वेळी तरुणांचे आयुष्य बरबाद होणार, हे निश्चित. गृहमंत्रालयाने एखाद्यावर दहशतवादाचे आरोप ठेवले व तसे घोषित केले, तर त्याच्याकडे न्यायालयात जाण्याचे हक्क असू शकतात. पण, सरकारने कोणत्या वळणावर त्याला दहशतवादी ठरवले, कसे ठरवले, याचा उलगडा या विधेयकाद्वारे होत नाही," असेही सिब्बल म्हणाले.

विधेयक संमत करण्यात आले आहे. या विधेयकांना काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्षांनी विरोध केला असला तरी या पक्षांची ते सत्तेत असलेली कामगिरी फारशी वाखाणण्यासारखी नाही. काँग्रेसने त्यांच्या दीर्घ राजवटीत आणि इतरही प्रादेशिक पक्षांनी त्यांची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये नागरी स्वातंत्र्याची तसेच वृत्तपत्र व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचे मनसोक्त प्रकार केलेले आहेत. त्यामुळेच वर्तमान युगपुरुषी राजवटीतील या विधेयकांना त्यांनी केलेल्या विरोधाला नैतिक धार येऊ शकली नाही. त्यामुळेच नागरी व व्यक्तिगत स्वातंत्र्याचा संकोच भविष्यात झाल्यास त्या संकटाचा सामना पुन्हा एकदा सामान्य माणसाला स्वतःच्या जिवावर करावा लागेल !

सरकारच्या घाईच्या मुद्याचा वर उल्लेख आला आहे. विधेयकांच्या पुरेशा छाननीअभावी ती मंजूर करण्याच्या संदर्भात तो आहे व त्याला एक पार्श्वभूमी आहे. विविध मंत्रालयांसाठी अर्थसंकल्पात केल्या जाणाऱ्या अनुदानविषयक मागण्यांवर संसदेत पूर्णत्वाने चर्चा होऊ शकत नसल्याने आणि जवळपास व सरासरी 75 टक्के वित्तीय मागण्या चर्चेविना संमत करण्याच्या(गिलोटिन) प्रकारास पूर्णविराम देण्याच्या हेतूने विविध मंत्रालयांशी निगडित संसदीय स्थायी समित्यांची 26 वर्षांपूर्वी स्थापना करण्यात आली. ते उद्दिष्ट बहुतांशाने पूर्ण झाले. कालांतराने सरकारतर्फे संसदेला सादर केल्या जाणाऱ्या विधेयकांच्या छाननीची जबाबदारीही या समित्यांकडे देण्याचे

काम सुरु झाले. या संसदीय समित्यांमध्ये लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांमधील सदस्यांचा समावेश असल्याने या समित्या म्हणजे ‘लघु-संसद’ मानल्या गेल्या.


समित्यांचे कामकाज गोपनीय असल्याने तेथील चर्चा निःपक्षपणे होण्यास मदत झाली. परिणामी अनेक किचकट विषय, विधेयके ही या समित्यांमुळे सर्वसंमतीने मंजूर होण्यास मदत होऊ लागली. 2014 नंतर या समित्यांकडे पध्दतशीरपणे दुर्लक्ष करण्यात येत आहे. सरकारला पाहिजे ती विधेयके जोरजबरदस्ती व प्रसंगी बळजबरीने सादर करुन व विरोधी पक्षांना न जुमानता संमत करण्याचा सपाटा लावलेला आढळतो. ही घाई अनाकलनीय आहे.

17 जुलै रोजी सुरु झालेल्या अधिवेशनात 22 विधेयके सादर करण्यात आली व त्यातील 11 मंजूरही झाली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर नवनिर्वाचित सदस्यांच्या नियुक्तिसाठी स्थायी समित्यांची फेररचना करण्यात येत असते. परंतु ती अद्याप करण्यात आलेली नाही. राज्यसभेच्या सभापतींच्या म्हणण्यानुसार राजकीय पक्षांतर्फे सदस्यांची नावे देण्यात दिरंगाई होत आहे. प्रश्न एवढाच आहे की एकीकडे ही








दिरंगाई व दुसरीकडे अतिमहत्वाची विधेयके फारशी छाननी न करता संमत करण्याची सरकारची घाई हे गणित काहीसे व्यस्त दिसून येत आहे. विधेयकांची सुयोग्य व निःपक्षपणे छाननी न करता केवळ सरकारला हव्या त्या तरतुदींसह विधेयके संमत केली जात आहेत. गलितगात्र विरोधी पक्षांमुळे ही बाब आणखी चिंताजनक होत चालली आहे. विशेष म्हणजे अर्थसंकल्पी अधिवेशनात वित्तविधेयक संमत होईपर्यंत म्हणजेच संसदेचे वित्तीय कामकाज पूर्ण होईपर्यंत अन्य कोणतीही बिगर-वित्तीय विधेयके चर्चेला न घेण्याचा प्रघात आहे. परंतु वर्तमान व्यवस्थेत या सर्व संसदीय प्रथापरंपरा उधळून लावून मनमानीपणे सरकारला हवी असलेली विधेयके चर्चेला पूर्ण वावही न देता संमत केली जात आहेत. यासंदर्भात दोन ताज्या विधेयकांचा उल्लेख आवश्यक आहे. एनआयए(नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी) दुरुस्ती विधेयक(2019) आणि माहिती अधिकार(दुरुस्ती) विधेयक(2019). यापैकी एनआयए दुरुस्ती विधेयक दोन्ही सभागृहांनी संमत केले आहे. माहिती अधिकार विषयक विधेयक संसदेपुढे मांडण्यात आलेले आहे आणि वर्तमान सरकारी खाक्यानुसार ते स्थायी समितीकडे न पाठविल्यास तेही या आठवड्यात मंजूर होऊ शकते.

‘एनआयए’ म्हणजेच राष्ट्रीय तपास संस्थेला वाढीव अधिकार देणारे हे विधेयक होते. त्यानुसार ही संस्था परदेशात सक्रिय असलेल्या देशविरोधी



परंतु गृहमंत्र्यांनी ही दुरुस्ती देशविरोधी शक्तींना वठणीवर आणण्यासाठी केली जात आहे आणि तिचा दुरुपयोग केला जाणार नाही अशी ग्वाही दिली. परंतु या विधेयकावर मतविभागणी मागण्यात आली असता शहा यांनी, 'मतविभागणी जरूर मागा म्हणजे या देशात दहशतवादाच्या विरोधात कोण आणि बाजूने कोण हे जनतेला कळेल' असे




कारवायांचा मागोवा व तपास घेऊ शकणार आहे. सायबर गुन्हे, मानवी म्हणजेच बालके किंवा महिलांची तस्करी, बनावट नोटा, स्फोटक सामग्री प्रतिबंधक उपाय इ.चा या संस्थेच्या कक्षेत समावेश करण्यात आला आहे. संपूर्ण देशभरात या संस्थेला कारवाईचे अधिकार देण्यात आले आहेत. म्हणजेच राज्य सरकारांना देखील त्यांना मज्जाव करता येणार नाही असा त्याचा अर्थ होतो. या संस्थेच्या कक्षेत समाविष्ट अपराध व गुन्ह्यांशी संबंधित खटल्यांसाठी विशेष न्यायालये स्थापनेची तरतूद असून सत्र न्यायालयाचे रुपांतरही विशेष न्यायालयात करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. तपास संस्थेला या प्रकारचे अनियंत्रित अधिकार देताना त्यावर जी सखोल चर्चा होणे अपेक्षित होते ती मात्र होऊ शकली नाही. मुख्य म्हणजे यातील धोक्यांबाबत काँग्रेसचे मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे सौगत रॉय, पी.नटराजन व ए.एम.अरिफ(मार्क्सवादी), असदुद्दिन ओवैसी(एमआयएम), अभिषेक सिंघवी यांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

मनीष तिवारी




सौगत रॉय



पी.नटराजन



ए.एम.अरिफ(मार्क्सवादी)



राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

तावातावाने वक्तव्य केले. हे त्यांचे विधान केवळ सूचक नव्हते तर या विधेयकाचा रोख कुणाकडे आहे हे दर्शविणारे होते. मार्क्सवादी सदस्य आरिफ यांच्या म्हणण्यानुसार आतापर्यंत दहशतवाद प्रतिबंधक तरतुदींनुसार केवळ विविध दहशतवाद संबंधित संघटनांच्या विरोधात






कारवाईचे अधिकार होते.
या दुरुस्तीमुळे एखाद्या व्यक्तीला देखील संशयावरुन व विनाचौकशी पकडून डांबण्याचे अधिकार या संस्थेला मिळाले आहेत. तिवारी यांनी या संस्थेच्या अधिकारक्षेत्रात जम्मू-काश्मीरच्या समावेशाबाबत अद्याप अनिश्चित व प्रश्नचिन्हांकित स्थिती आहे. याबाबतचा वाद न्यायालयात प्रलंबित असताना असे अनियंत्रित अधिकार दिले जाणे अनुचित असल्याचा मुद्दा मांडला होता. परंतु गलितगात्र विरोधी पक्षांचा विरोधही क्षीण राहिला. यापूर्वी टाडा, पोटा, रासुका असे अनेक कायदे देशात झाले आणि त्यांचा यथेच्छ दुरुपयोग सर्व पक्षांच्या वेळोवेळच्या सरकारांनी केला होता. 'टाडा'ची कुप्रसिध्दी सार्वत्रिक आहे. या कायद्याखाली जवळपास हजारो लोकांना विनाचौकशी डांबले गेले होते आणि उपलब्ध आकडेवारीनुसार केवळ चार टक्के लोकांना शिक्षा होऊ शकली होती. या प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये एवढीच प्रार्थना !

दुसरे विधेयक माहिती अधिकार कायद्यात दुरुस्ती करणारे आहे. यानुसार सरकारने मुख्य व अन्य माहिती आयुक्त यांच्या नियुक्त्या, त्यांचे वेतन व सेवाशर्ती निश्चित करण्याचे अधिकार स्वतःकडे घेतले आहेत. विरोधी पक्षच नव्हे परंतु माहिती अधिकाराच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संघटना व व्यक्ती-कार्यकर्त्यांनी यास तीव्र हरकत घेतली आहे. यामुळे माहिती आयोग, माहिती आयुक्तांना असलेली स्वायत्तताच संपुष्टात येणार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ही संस्था सरकारच्या हातचे बाहुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

असदुद्दिन ओवैसी




अभिषेक सिंघवी



# नियतीचा संकेत!


मुकुंदानंद
















**सत्तेच्या लालसेपोटी व पुन्हा निवडून न येण्याच्या भितीमुळे आणि केलेले गैरव्यवहार पचविण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे काही आमदार व नेते भाजप-शिवसेनेत घुसले आहेत. ज्या पक्षाने आपल्याला मोठे केले व सत्तेची चव चाखविली त्याच पक्षाविरुद्ध गद्दारी करून स्वार्थासाठी पक्षांतर केलेल्या नेत्यांचा पर्दाफाश करणारा व सत्य जनतेला सांगणारा हा सडेतोड लेख.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून काही नेते नुकतेच भाजप व शिवसेनेत गेले. लोकसभा निवडणुकीपासून ही जाण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. विधानसभा निवडणुका अगदी दोन-अडीच महिन्यांवर येऊन ठेपलेल्या असल्यामुळेही काही नेते पक्ष सोडून जात आहेत. या जाणाऱ्यांबद्दल तसूभरही दुःख पक्षाला नाही आणि कार्यकर्त्यांनाही नाही. नेत्यांबरोबर कार्यकर्ते कुणीही जात नाहीत. ही मोठी विशेष व उल्लेखनीय गोष्ट आहे. याचे कारण कार्यकर्त्याने आपला नेता पुरेपूर ओळखलेला आहे. मंत्री आणि आमदार राहिलेले व पक्षाची महत्त्वाची पदे भूषविलेले जे नेते पक्ष सोडून सेना-भाजपत गेले ते किती गुणसंपन्न होते आणि त्यांनी काय काय धंदे (गैर) केले याचा समग्र पाढा वाचला तर निदान भाजप हा पक्ष तरी आता सगळी घाण आपल्यात सामावून घेऊन घाणीचेच साम्राज्य उभे करतोय की काय अशी शंका जनतेला येऊ लागली आहे. शिवसेनेकडून जनतेला कधीही चांगलेपणाची अपेक्षा नव्हती. आजही नाही आणि उद्याही असणार नाही. कारण कोणतीही विचारधारा नसलेल्या टुकार लोकांचा तो पक्ष आहे. पण भाजपची स्थिती पूर्वी तशी नव्हती. काही एक शिस्त, विचारधारा, बांधिलकी मानणाऱ्या स्वच्छ, त्यागी लोकांचा पक्ष म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. आता तशी स्थिती राहिलेली नाही.

भाजपवाल्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवकही बिघडवून टाकले आहेत. मी जाणीवपूर्वक येथे कुणाचेही नाव घेत नाही. पण अनेक संघ स्वयंसेवक व पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्ते भाजपच्या केंद्र व राज्यातील मंत्र्यांसाठी एजंट म्हणून पैसे गोळा करण्याचे व वाटण्याचे काम करीत आहेत. विरोधी पक्षातल्या माणसांना निरनिराळी आमिषे दाखविण्याचे कामही संघ स्वयंसेवक करीत आहेत. मंत्री अधिकाऱ्यांना व निरनिराळ्या सरकारी यंत्रणांना (उदा. पोलिस, ईडी, प्राप्तिकर व विमा सहकार खाते, साखर आयुक्तालय, महसूल यंत्रणा, उत्पादन शुल्क व जीएसटी विभाग वगैरे) हाताशी धरुन विरोधी पक्षातल्या नेते व कार्यकर्त्यांवर पक्षांतरासाठी दबाव टाकत आहेत. त्यांना भिती दाखवून धमक्या देताहेत. कोल्हापुरातील हसन मुश्रीफ यांच्यावर नुकतीच आयकर विभागाने टाकलेली धाड हे त्याचे प्रातिनिधीक ताजे उदाहरण आहे.

भाजपत गेलेले सगळेच नेते धमक्या, दबावाने गेले असे नाही. बऱ्याच नेत्यांनी आपापल्या संस्थांमध्ये प्रचंड गैरव्यवहार केले आहेत. मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहे. संस्था लुटून खाल्ल्या आहेत. जनतेला देशोधडीला लावून त्यांचा पैसा हाणला आहे. त्या सगळ्या भ्रष्ट मंडळींनी स्वतःच्या गैरव्यवहारांची चौकशी होऊ नये, झालीच तर त्यात आपल्याला अटक होऊन जेलची हवा खाण्याची पाळी येऊ

# सभागृहांचे अधिकार कमी करा!

## बॅरिस्टर नानी पालखीवाला यांची सूचना



**पुण्यातील एमआयटी संस्थेत काही वर्षांपूर्वी सभागृहात कामकाज करणाऱ्या लोकप्रतिनिधींचे अधिकार या विषयावर चर्चासत्र झाले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन ख्यातनाम कायदेतज्ज्ञ व भारतीय राज्यघटनेचे गाढे अभ्यासक बॅरिस्टर नानी पालखीवाला यांच्या शुभहस्ते झाले होते. त्यावेळी त्यांनी "पूर्वी म्हणजे स्वातंत्र्य मिळाले तेव्हा सभागृहात निवडून येणारे लोकप्रतिनिधी हे खूप अभ्यासक, तत्त्वचिंतक, व्यासंगी, निःस्वार्थी, त्यागी व ध्येयवादी लोक होते. समाजसेवा हाच त्यांचा निदिध्यास होता. राजकारण हे त्यांचे उत्पन्न मिळवून श्रीमंत होण्याचे साधन नव्हते. परंतु आता धंदेवाईक, स्वार्थी, गुंड प्रवृत्तीचे व गुन्हेगार लोक सभागृहात निवडून जाताहेत. त्यांचा अभ्यासाशी काहीही संबंध नाही. तोडपाणी व दलाली कामे हा बऱ्याच लोकप्रतिनिधींचा धंदा आहे. अभ्यासू व विचारी नेते कमी झाल्यामुळे सभागृहात त्या उंचीचे लोक पूर्वीसारखे निवडून येत नाहीत. त्यामुळे सभागृहांचे अधिकार कमी करण्याची गरज आहे." या शब्दांत आपले मत व्यक्त केले होते. किती समर्पक, सार्थक व दूरदृष्टीचे उद्गार नानी पालखीवाला यांनी काढले होते याची आज या आयाराम-गयारामांमुळे सत्यता पटते.**

# भाजप प्रवेशाबद्दल पिचड पिता-पुत्राचा निषेध करणारा मोर्चा






नये म्हणून 'कमळाबाईचा' आसरा घेतला आहे. भाजप ही आता धर्मशाळा झाली आहे. कुणीही गुंड, गुन्हेगार, लुटारु, चोर, भामटे, ढोंगी, नैतिकता नसलेले आणि कृतघ्न असे लोक या धर्मशाळेत जाऊन आपला बिस्तारा टाकताहेत आणि देवेंद्र महाराज कमळाच्या फुलांची गोधडी त्यांच्यावर पांघरताहेत. राज्य विकासात पुढे नेण्याच्या दृष्टीने हे फार महत्त्वाचे पाऊल मुख्यमंत्री उचलताहेत आणि त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे (कशाने?) अभिनंदन थोडे आहे! सगळ्या लुच्चा लबाडांना एकदा का आपण कमळ फुलातून सरबत पाजून शुद्ध व पवित्र केले की त्यांची पूर्वीची सगळी पापं धुवून जातात. नवीन करायचा परवाना मिळतो तो ही फडणवीसांकडून ! आता तर राजरोस परवाना मिळाल्यामुळे इच्छा असणाऱ्या उर्वरीत सगळ्या चोर, लबाडांनी आपल्याला राज्य लुटायचे आहे हा संकल्प करुन पटापट घड्याळातून उड्या मारुन बाहेर पडावे आणि कमळात शिरावे. कमळ चिखलातच असते. म्हणजे पहिल्या घाणीत आणखीन नवीन घाण जाऊन मिसळते. घाणीत घाण मिसळली तर त्याचा फार दुर्गंध येत नाही. चांगल्यात घाण मिसळली की चांगले सुगंधी काहीच राहात नाही. सगळेच घाण होऊन जाते. तीच अवस्था आता कमळाबाईची झाली आहे.

राष्ट्रवादीतून भाजपत गेलेले नेते किती संतसज्जन आहेत आणि त्यांचा महिमा काय वर्णावा? आधी नुसती नावे घेतो. ती घेतल्याबरोबर यांचे जनतेला टोप्या घालण्याचे कर्तृत्व किती महान आहे ते तुमच्या लक्षात येईल. नाही आले तर त्यांच्या कर्तृत्वाचे पोवाडे मी गाऊन सादर करणार आहेच. त्याबद्दल तुम्ही निश्चिंत राहा! नमुना म्हणून आधी काही नावे तुमच्यापुढे ठेवतो.

सचिन अहिर, मधुकरराव पिचड, शिवेंद्रराजे भोसले, संदीप गणेश नाईक, वैभव पिचड, चित्राताई वाघ, सुरेश धस, प्रशांत परिचारक, संजयकाका पाटील, पृथ्वीराजबाबा देशमुख, रमेश शेंडगे, लक्ष्मण जगताप, श्रीमती सूर्यकांता पाटील, बबनराव पाचपुते, डॉ. माधवराव किन्हाळकर, मंदा म्हात्रे, भारती लव्हेकर, विनायक मेटे, विजयसिंह मोहिते पाटील अशी आणखीन सटरफटर बरीच नावे घेता येतील. यातल्या एका तरी माणसाचे महाराष्ट्र आणि देशाच्या विकासात फार मोठे योगदान आहे आणि म्हणून त्यांचे नाव अजरामर राहून जनतेच्या हृदयात कायमचे कोरले जाणार आहे अशी काही परिस्थिती आहे का? ते तुम्ही अभ्यासाने तपासून पाहा. या सगळ्या लोकांचे कर्तृत्व इतके महान आहे की ते एका लेखात सांगता येणार नाही आणि सांगण्यासारखेही नाही





किंबहुना त्यापासून जनतेने काही चांगली प्रेरणा घ्यावी असे हे नेतेही नाहीत. त्यामुळे खुद्द पवार साहेबांना देखील कुणालाही थांबवावेसे वाटले नाही. ही वस्तुस्थिती आहे.

या सर्वांच्या पलायनावरुन गझलकार सुरेश भट यांच्या ओळी आठवतात –

**आजन्म ज्याने सोसले**
**तो मूक गिळून राहिला**
**ज्याला घबाड घावले**
**तो ओरडाया लागला ।**

किती मार्मिक आणि समर्पक अशा या ओळी आहेत!

# पिचडांच्या जमिनींची फाईल मुख्यमंत्र्यांकडे

**आदिवासींचे नेते आणि माजी मंत्री मधुकरराव पिचड यांनी आपल्या दुसऱ्या पत्नीच्या नावे नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी व त्र्यंबकेश्वर, शहापूर आणि परिसरात खूप मोठ्या प्रमाणावर आदिवासी लोकांच्या जमिनी खरेदी केल्या आहेत. आदिवासींची जमीन आदिवासी माणसालाच विकत घेता येते, इतरांना नाही असा नियम आहे. मधुकरराव पिचड आदिवासी असले तरी जमीन ज्या दुसऱ्या बायकोच्या नावावर त्यांनी खरेदी केली ती देशमुख म्हणजे मराठा असल्याचे सांगितले जाते. या जमिनीची आजची किंमत बाजारभावाने 130 कोटी रुपये आहे असे जाणकार सांगतात. जमीन खरेदीचा हा पिचड यांचा व्यवहार बेकायदेशीर व नियमबाह्य असून त्यासंबंधीची फाईल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे चौकशीसाठी आली आहे. त्यांनी निर्णय आपल्या बाजूने द्यावा म्हणून पिचड पिता–पुत्र भाजपत गेले आहेत असे त्यांच्या आसपासचे लोक सांगतात. खरे–खोटे त्यांनाच माहिती! पिचडांचा पक्ष बदलण्याचा निर्णय मात्र आदिवासी समाजातील संख्येने मोठ्या असलेल्या महादेव कोळी समाजाच्या लोकांना आवडला नाही. त्यांनी याविरुद्ध मोर्चा काढला आणि पिचडांचा निषेध केला.**





# शिवेंद्रराजे भाजपात जाण्याचा परिणाम राष्ट्रवादीवर होणार नाही

## सातारा येथील पत्रकार परिषदेत शरद पवार यांची स्पष्टोक्ती

साताऱ्यातून आणखी किती लोक पक्ष सोडून जाणार आहेत याची मला कल्पना नाही. मात्र, यशवंतराव चव्हाणांचा विचार ज्यांनी स्वीकारलाय ते असं काही करणार नाहीत. त्यांना विरोधात असल्याचा त्रास होईल. मात्र, त्यांची नाळ मतदारांशी असल्यानं चिंता करण्याची गरज नाही अशी स्पष्ट भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडली.

सातारा येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शिवेंद्रराजे भोसले भाजपमध्ये गेल्याचा कोणताही परिणाम साताऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेसवर होणार नाही. साताऱ्याच्या उमेदवारीसाठी माझ्याकडे तीन अर्ज आले आहेत. मला उमेदवारांची चिंता नाही. ही जागा राष्ट्रवादी निश्चित राखेल असेही शरद पवार यांनी सांगितले. भाजपमध्ये जाणार नाही असं शिवेंद्रराजेंनीच मला सांगितलं होतं. साताऱ्याच्या खासदारांसोबत बैठक व्हावी, अशी त्यांची इच्छा होती. संसदेच्या अधिवेशनानंतर चर्चा करू असं आमचं ठरलं होतं. मात्र, त्याआधीच त्यांनी वेगळा निर्णय घेतला अशी स्पष्ट माहिती शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. पक्षातील कुणी मंडळी जर काही वेगळा निर्णय घेत असतील, तर आमच्या त्यांना शुभेच्छा! असा टोलाही शरद पवार यांनी लगावला. राजकारणात कधी कधी असा प्रसंग येतो, त्याचा सामना करायचा मला अनुभव आहे. एक गोष्ट चांगली आहे, सरकार येणार नाही म्हणून ते चालले आहेत हे त्यांनी जाहीर केले असेही शरद पवार म्हणाले. राष्ट्रवादीच्या आमदारांनी पक्ष सोडताना कामं होत नसल्याची कारणं दिली आहेत. ते एक बरंच झालं. सत्ताधारी सूडबुद्धीनं वागताहेत आणि विरोधक त्यांना तोंड देऊ शकत नाहीत असा निष्कर्ष यातून निघतो असेही शरद पवार म्हणाले.


भाजपत जाणारे हे नेते आता विकासाच्या मुद्याची ढाल पुढे करीत आहेत. “सत्तेत राहिलो तरच विकास होतो. निधी मिळतो. कामे होतात म्हणून कार्यकर्त्यांचा आग्रह व दबाव होता सत्ताधारी पक्षात चला” अशा प्रकारची वक्तव्ये मधुकर पिचड, वैभव पिचड, शिवेंद्रराजे भोसले यांनी केल्याचे आपण ऐकले व पाहिले आहे. आता यात खरी वास्तवता किती हे एकदा बारकाईने तपासून पाहिले पाहिजे. विकासाची कामे आणि निधी म्हणजे आमदारांना हमखास टक्केवारी मिळण्याचे व उत्पन्नाचे साधन. सगळेच आमदार ही टक्केवारी गोळा करतात असे माझे म्हणणे नाही. जे गोळा करतात त्यांचे मन त्यांना खाईल. कामाचा ठेका देताना कॉन्ट्रॅक्टरकडून मंत्री, आमदार अधिकारी टक्केवारीचे पैसे गोळा करतातच. जिथे हे टक्केवारीचे पैसे अधिक मिळण्याची शक्यता आहे तिथे नेमणूक मिळावी यासाठी अधिकारी कर्मचारी जीव टाकतात. त्याकरिता ज्यांच्या हातात नेमणूक देण्याचे काम आहे व ज्या आमदारांच्या शिफारस पत्राला किंमत आहे त्यांच्याशी आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार होतात. याची हजारो, लाखो उदाहरणे आहेत. ती प्रत्येकाला माहिती आहेत. नावानिशी येथे ती मांडण्याची काही जरुरी नाही. विकास म्हणजे टक्केवारी हे ज्यांच्या डोक्यात पक्के बसले आहे ते पैसे मिळाले नाही की पाण्यातून बाहेर काढलेल्या माशासारखे तडफडतात. अशी अवस्था भाजप-सेनेत जाणाऱ्या आमदारांची झालेली आहे. कारण विरोधी पक्षात राहून जास्त निधी मिळणार नाही. शिफारस पत्राला सरकारमधून कोणी किंमत देणार नाही आणि पैसा नसेल तर पुन्हा निवडणुक जिंकणेही कठिण जाईल. थोडक्यात पैसा, सत्ता अधिक मिळविण्याची भूक असलेले भुताळे नेते भाजपच्या दारात लाचार बनून प्रवेशासाठी लोचटासारखे उभे राहताहेत. मागे चार-पाच वर्षांपासून ज्यांनी भाजपत प्रवेश केला (उदा. सूर्यकांता पाटील. बबन पाचपुते, माधव किन्हाळकर, वगैरे) यांची अवस्था आज काय आहे? हे जरा एकदा डोळे उघडे ठेवून पाहा. म्हणजे निष्ठा विकल्या किंवा गहाण ठेवल्या, प्रसंगी सोडल्या तर त्याचा काय परिणाम होतो ते तत्काळ लक्षात येईल.

विरोधी पक्षात राहिल्यामुळे मतदारसंघाचा विकास रखडला आहे असा युक्तिवाद जे नेते करताना त्यांना जनतेने विचारले पाहिजे “का हो 15 वर्षे तुम्ही सत्तेत होता. मंत्री होता, आमदार होता. राज्य सरकारच्या तिजोरीच्या चाव्या तुमच्या हातात होत्या. तेव्हा का विकास आठवला नाही? तेव्हा

## गयारामांचा भाजपच्या निवडणूक निधीवर डोळा

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत नसल्यामुळे पक्षाकडून विधानसभा निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळण्याची शक्यता फारच कमी आहे हे सर्व आमदारांना व निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांना माहिती आहे. याऊलट भाजपकडून प्रत्येक उमेदवाराला साधारणपणे 10 ते 15 कोटी रुपये दिले जाणार असल्याचे कानोकानी सांगितले जाते. एवढी मोठी रक्कम जर पक्ष देणार असेल तर आपल्या खिशातून काही घालायला नको. उलट त्यांच्याकडून मिळणाऱ्या रकमेतील दोन-पाच कोटी बाजूला ठेवता येतील असा विचार करुनही काहींनी भाजपची वाट धरली आहे. एकंदरीत भाजपच्या निवडणूक निधीवर या गयारामांचा डोळा आहे. आता प्रत्यक्ष उमेदवाराच्या हातात पक्ष सर्व निधी देणार का संघ स्वयंसेवकांमार्फत घरोघरी जाऊन स्लीपबरोबर पैशाचे पाकिट देणार याची उत्सुकता भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांना आत्तापासूनच लागलेली आहे.**






# मेगाभरतीमुळे भाजपातले निष्ठावंत नाराज

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपमध्ये मोठ्या प्रमाणावर नेत्यांना आयात केले जात आहे. काही नेते स्वत: होऊन येताहेत तर काही जणांना पक्षाकडून लाल कारपेट घालून, पैसा, पद तिकीट, सत्ता याची लालूच दाखवून बोलविले जात आहे. काहींना धाकदपटशा, धमक्या व भिती दाखवून प्रवेश करायला भाग पाडले जात आहे. या मेगाभरतीमुळे पक्षात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले व कडव्या हिंदुत्वविचाराचे निष्ठावंत कार्यकर्ते आता आपले कसे होणार? आपल्याला पदे मिळायची वेळ व संधी आली तर बाहेरुन हे डोमकावळे येऊन बसले. तेच आता तिकीटे आणि पदे हडप करणार. म्हणजे आपण आयुष्यभर संतरंज्याच घालायच्या का? असा प्रश्न त्यांना सतावतो आहे. त्यामुळे ते काहीसे संतप्त व नाराजही झाले आहेत. या निष्ठावंत कार्यकर्त्यांची समजूत कशी काढायची? असा प्रश्न भाजपच्या नेत्यांना पडला आहे. “भाजप ही काही धर्मशाळा नाही. पक्षात येणाऱ्यांचे स्थान व महत्व बघूनच त्यांना प्रवेश दिला जातो आहे.” असे मुख्यमंत्री वारंवार सांगत असले तरीही मूळच्या निष्ठावंतांना ते पटेनासे झाले आहे. हे सगळे आयाराम गद्दार, स्वार्थी, लबाड व चोर आहेत असेच त्यांचे म्हणणे आहे आणि त्यांनी ते बोलूनही दाखविले आहे. त्यामुळे मनोमिलन कसे होणार हा प्रश्नच आहे?




राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!

काय हजामती करत होता का? आता विरोधात बसल्यावर विकास आठवतो ! किती हा ढोंगी आणि दांभिकपणा ! मंत्री होता. रोज पैसे गोळा करीत होता. कशाकशात पैसे खाल्ले या सगळ्याची यादी जाहीर करता येईल. ती काही जनतेला माहिती नाही अशातला भाग नाही. तुमचा भ्रष्टाचार काही लपून राहिलेला नाही. तुम्हाला तुमची कातडी वाचवायची आहेत, स्वार्थ साधायचा आहे म्हणून पक्ष सोडून चालला आहात हे न कळण्याइतकी जनताही मूर्ख व बावळट राहिलेली नाही.

शिवेंद्रराजे यांनी तर काँग्रेस-राष्ट्रवादीमध्ये लढण्याची ताकद राहिलेली नाही आणि आघाडी पुन्हा सत्तेवर येण्याची

उदयनराजेंनी तुमच्या पॅनेलची जी अवस्था केली आणि तुमच्या पत्नीचा एका सामान्य महिलेने पराभव केला याचे शल्य मनात बाळगून लोकसभा निवडणुकीत उदयनराजेंच्या विरोधात शिवेंद्रराजेंनी जी भूमिका घेतली तिचा वचपा आता विधानसभा निवडणुकीत श्रीमंत छत्रपती घेतल्याशिवाय राहणार नाहीत. सरळ उघड दोन भावात लढाई होईल. त्यात आपला टिकाव लागणार नाही. या भितीने ग्रासल्यामुळे पळपुटी भूमिका शिवेंद्रराजे तुम्ही स्वीकारली आहे. तुमच्या खाली प्रचंड अंधार आहे. तेव्हा कृपा करुन दुसऱ्याच्या खालचा अंधार बघायला जाऊ नका. झाकली मूठ सव्वा लाखाची तशीच ठेवा!




शक्यता नाही म्हणून पक्षाला सोडचिठ्ठी देतो आहे असे विधान मुलाखतीत केल्याचे आम्ही समक्ष कानांनी ऐकले आहे व डोळ्यांनी पाहिले आहे. आता या राजांना जनतेने जाहीरपणे विचारले पाहिजे की, तुम्ही किती वेळा आमच्यासाठी संघर्ष केला. सभागृहात हजर राहून किती वेळा प्रश्न, लक्षवेधी विचारल्या? अजिंक्य सहकारी बँक, अजिंक्य महिला बँक, अजिंक्य कुक्कुटपालन संस्था, अजिंक्य बझार या संस्था कुणाच्या कर्तृत्त्वामुळे मोडीत निघाल्या आणि कुणी या संस्था खाल्ल्या. अजिंक्यतारा साखर कारखान्यांमध्ये व सुतगिरणीत कुणी प्रचंड भ्रष्टाचार केला? त्याबद्दल खासदार श्रीमंत उदयनराजे भोसले यांनी जी केस लावली होती ती कशी मिटविली? सातारा नगरपालिकेच्या 2018 च्या निवडणुकीत

राष्ट्रवादीच्या महिला आघाडीच्या अध्यक्ष असलेल्या श्रीमती चित्राताई वाघ यांच्याबद्दल काय बोलावे! कार्यकर्त्यांबरोबर सेल्फी काढण्याचं त्यांना भयंकर वेड होतं. त्या कशासाठी भाजपत गेल्या हे मा. शरद पवार यांनी जाहीरपणे पत्रकार परिषदेतच सांगून टाकले. त्यांच्या नवऱ्याला तीन-चार वर्षांपूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पाच लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले होते. तेव्हापासून ते नोकरीतून निलंबीत आहेत. त्यांना पुन्हा कामावर घ्यावे, गुन्हा मागे घ्यावा या कारणासाठी त्या भाजपात गेल्याचे पवार साहेबांनी सांगितले. खरंखोटं त्या दोघांनाच माहिती. चित्राताईंनी सरकारमध्ये काही सप्लाय करण्याचे कॉन्ट्रॅक्ट घेतले होते. त्यातही मोठा भ्रष्टाचार झाला असून त्याची फाईल व चौकशी

# बीजेपी... म्हणजे बाहेरुन जमविलेली पार्टी




**हिंदुत्ववादी विचारसरणीचा सातत्याने पुरस्कार करत आलेली बीजेपी आता पक्ष विस्तारासाठी व तो मोठा करण्यासाठी आपल्या मूळ तत्त्व व विचारांना तिलांजली देऊन स्वार्थी वृत्तीने व प्रसंगी चुकीच्या दिशेनेही पाऊले टाकीत आहे. भ्रष्टाचारी, गुंड, अनैतिक धंदे करणारे, बलात्कारी, चोर, ब्लॅकमेलर अशा सर्व प्रकारच्या अविचारी लोकांना आता बीजेपीमध्ये अगदी आवर्जून निमंत्रण देऊन बोलावून घेतले जात आहे. त्यामुळे बीजेपी म्हणजे बाहेरुन जमविलेल्या लोकांचा पक्ष असा मेसेज सध्या व्हॉटसअपवरुन सर्वत्र फिरतो आहे. राजकीय स्वार्थ व सत्ता प्राप्तीसाठी अनेक तडजोडी भाजप नेत्यांना सध्या कराव्या लागत आहेत. त्यामुळे आपल्याला जन्मभर ज्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांनी विरोध केला त्यांचे शाल, हारतुरे घालून स्वागत करण्याची पाळी मुख्यमंत्र्यांनावर आली आहे. त्यामुळे भाजपचे निष्ठावंत मात्र संतप्त व बधीर झाले आहेत.**

अहवाल मुख्यमंत्र्यांच्या हाती आहे असेही सांगितले जाते. या व्यवहारात व गुन्ह्यातून त्यांना क्लीन चीट हवी आहे म्हणून त्या भाजपात गेल्याचे बोलले जाते. एक मात्र खरे की, राष्ट्रवादीतील सर्व महिला नेत्या चित्राताईंच्या पक्ष सोडल्यामुळे खूप खुष व आनंदी आहेत. पक्षातून घाण गेली असेच त्या बोलतात. त्या असे का म्हणतात, याची कारणे चित्राताईंनीच शोधावीत. मात्र एक वर्षापूर्वी राष्ट्रवादीतील महिला नेत्यांचे शिष्टमंडळ पवार साहेबांना जाऊन भेटले होते आणि "चित्राताईंचे वर्तन पक्षाची बदनामी करणारे आहे, तेव्हा त्यांना अध्यक्ष पदावरुन हटवा." अशी मागणी त्यांनी केली होती. परंतु नेहमीच्या सवयीप्रमाणे फळ पिकल्यावर तोडावे हे पवारांच्या लक्षातच आले नाही. त्यांनी ते नासू दिले आणि मग आपोआपच गळून पडले हे चित्र आपण चित्राच्या बाबतीत पाहिले आहे. तीच अवस्था मधुकर पिचडांच्या बाबतीतही आहे. पक्षाचे सगळे नेते व कार्यकर्ते 'पिचड राष्ट्रवादीचे अध्यक्ष झाल्यापासून पक्षातली पदे विकताहेत. पैसे घेऊन येणाऱ्यालाच कार्यालयात बसू देतात, भेट देतात आणि पदेही देतात." असे सांगत होते. एक ज्येष्ठ मंत्री तर समजूत काढताना असे म्हणायचे, "जाऊ द्या हो. आदिवासी माणूस आहे. उपाशी आहे. थोडे दुर्लक्ष करा." म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावला हे पिचडांच्या भाजप प्रवेशावरुन आता तरी सर्वांच्या लक्षांत आले असेल.

पवार साहेबांनी ज्या सर्वांना मोठ्या विश्वासाने मोठे केले, मदत केली, महत्व दिले, पद आणि सत्ता दिली तेच गद्दार निघाले. दुसऱ्या फळीतल्या या नेत्यांनी तिसरी फळी पक्षात उभी केली नाही म्हणून स्वतः पवार साहेब खूप नाराज होते आणि आहेतही. पण नियतीने चांगेल संकेत दिले आहेत. करपलेल्या भाकऱ्या भाजप-सेनेत जाताहेत. तुम्ही त्या वेळीच बदलल्या असत्या तर नवीन युवकांचा लोंढा सतत पक्षात येत राहिला असता. तुम्ही भाकरी बदलली नाही, उलटविली नाही. नियतीने त्यांना दुसऱ्या पक्षात ढकलून नवीन तरुणांसाठी, युवकांसाठी जागा निर्माण करुन दिल्या. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आता नवीन युवकांचा लोंढा व आवक सुरु झाली आहे. हे नवीन तरुण कार्यकर्ते यांच्यावर मदार ठेवा, विश्वास ठेवा. त्यांना बळ व ताकद द्या. लढण्याची जिद्द व उमेद द्या. ते भाजप-सेनेला निवडणुकीत खडे चारल्याशिवाय राहणार नाहीत. त्यासाठी फक्त त्यांच्या पाठीवर थाप टाकून 'तू लढ' म्हणा. बाबा आमटे यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास, "नवे किल्ले सर करण्यासाठी तुम्ही पुढं व्हा! तुमच्यासाठी ही एक खिंड मी लढवीन! किमान एक खिंड मी लढवीन." एवढाच आशावाद पवार साहेब तुम्ही तरुणांच्या पाठीशी उभा करा. पक्ष पुन्हा जोमाने व मजबुतीने उभा राहील आणि गद्दारांना त्यांची जागा जनताजनार्दन दाखवेल एवढा विश्वास बाळगा!





# ईव्हीएमबाबत लोकांच्या मनात शंका, निवडणुका पारदर्शकच झाल्या पाहिजेत

**अजित पवार यांची मागणी**

मुंबई दि.२ऑगस्ट – महाराष्ट्राच्या निवडणुकांकडेही देशाचं वेगळं लक्ष असतं. या निवडणुकांना सामोरं जात असताना लोकांच्या मनात ईव्हीएम, व्हीव्हीपॅटबाबत शंका आहे. आमचा कुणावरही अविश्वास नाही, परंतु निवडणुका पारदर्शकच झाल्या पाहिजेत! अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी पत्रकार परिषदेत केली.

ईव्हीएम विरोधात आज विरोधी पक्षाच्या नेत्यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे विधीमंडळ पक्षनेते अजितदादा पवार यांनी ईव्हीएमबाबत पक्षाच्यावतीने मत मांडले. मागच्या काळात अनेक स्वयंसेवी संस्थांनीसुद्धा अशाप्रकारची मागणी केली होती. अनेक प्रगत देशांमध्ये ईव्हीएमच्या वापरावर बंदी आहे. त्यामुळे बॅलेट पेपरवर निवडणुका व्हाव्यात, ही कुण्या एका राजकीय पक्षाची नव्हे! संपूर्ण जनतेची मागणी म्हणून ती पुढे यावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत असेही अजितदादा पवार यांनी सांगितले. देशात अनेक ठिकाणी विधानसभेच्या निवडणुका येऊ घातल्या आहेत.भाजपने जो अंदाज व्यक्त केला तसा निकाल लागला.अनेकांनी याबाबत ईव्हीएम मशीनवर निवडणूक होऊ नये अशी भूमिका व्यक्त केली परंतु हे अमान्य करण्यात आले असेही अजितदादा पवार म्हणाले.

आता या निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात अशी मागणी केली जात आहे यासाठी सगळेच पक्ष एकत्र आले आहेत असेही अजितदादा पवार यांनी यावेळी सांगितले. देशात पारदर्शक निवडणुका झाल्या पाहिजे. अशा व्यवस्थेवर सगळयांना शंका आहेत. त्यात हे लोक अंदाज व्यक्त करतात आणि तितक्या जागा येतात हे अजब आहे असे आश्चर्य व्यक्त केले. आता देशात संभ्रमाचे वातावण निर्माण झाले आहेत. त्यामुळे निवडणुका या बॅलेट पेपरवर झाल्या पाहिजे यासाठी अजितदादा पवार यांनी जनतेला आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपमुख्यमंत्री आमदार छगन भुजबळ यांनी आपले विचार मांडले. अनेकांनी ईव्हीएम मशीनवर होणाऱ्या निवडणूकांवर अविश्वास व्यक्त केला आहे. राज ठाकरे यांचे आभार मानले पाहिजे. त्यांनी हा लढा सुरू केला आहे. या लढ्यात सर्वांनी सामील व्हावे असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले. अमेरिका, जपान यांनी हे तंत्रज्ञान फेकून दिले आहे तरीदेखील आपल्याला हे का हवे आहे?असा सवालही छगन भुजबळ यांनी केला. निवडणुकीवर सगळ्यांचा विश्वास बसला पाहिजे यासाठी सरकारला गदगदा हलवण्याची गरज आहे असेही छगन भुजबळ म्हणाले.






## खासगी विमान कंपन्या संसदेत??

कानोकानी आलेली ही गोष्ट !

एअर इंडिया ही सरकारी व प्रतिष्ठेची मानली जाणारी विमान कंपनी आहे. सरकारी प्रतिनिधी, संसदसदस्य, मंत्री, नोकरशहा यांनी एअर इंडियाच्या विमानाने प्रवास करावा अशी अपेक्षा असते. परंतु अलीकडच्या काळात एअर इंडियाची दुरावस्था आणि अनेक मार्गांवर त्यांची उड्डाणे नसल्याने खासदार मंडळींची पंचाईत होते व त्यातून खासदारांना जेथे एअर इंडियाची उड्डाणे नसतील किंवा सोयीच्या वेळेची नसतील तेथे खासगी विमानकंपन्यांच्या विमानांनी जाण्याची मुभा देण्यात आली आहे.



आता खासदारांनी यापुढे जाऊन आणखी एक मागणी केली की या खासगी विमान कंपन्यांची तिकिटे मिळण्यात काही अडचणी येत आहेत.

खरंतर आता बहुतेक तिकिटे ऑनलाईन मिळत असूनही खासदारांना अडचण कशाची येत






आहे हेच समजेनासे झाले आहे.

परंतु खासदारांच्या मदतीला लोकसभा अध्यक्ष धावले. त्यांनी तत्काळ जाहीर केले की संसदेत एअर इंडियाच्या बरोबरीने खासगी विमान कंपन्यांची कार्यालयेही उघडण्यात येतील.

काही अनुभवी खासदारांना यातील अडचणींची व विशेषतः सुरक्षाविषयक मुद्यांची माहिती असल्याने त्यांनी त्याबाबत काही शंका व्यक्त केल्या. परंतु लोकसभा अध्यक्षांनी सांगितले, 'त्यांचा निर्णय अंतिम राहील.'

आता मिळत असलेल्या माहितीनुसार खासगी विमानकंपन्यांचे एक एकत्रित सुविधाकेंद्र संसदेत सुरु करण्यात येईल ज्यामुळे खासदारांना संसदेतच खासगी विमान कंपन्यांची तिकिटे मिळू शकतील.

जय हो !!

## पावलावर पाऊल ??

आधीच्या मोदी सरकारमध्ये आरोग्यमंत्री असलेल्या जगतप्रकाश नड्डा यांची भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

सध्या नड्डा यांना भरपूर काम आहे. विशेषतः भाजपमध्ये होणाऱ्या 'आयाती'चा वेग व ओघ एवढा आहे की त्यांना वेळ पुरेनासा होऊ लागला आहे.

नड्डा हे राज्यसभेचे सदस्य पण आहेत. संसदेचे अधिवेशन असल्याने व सरकारने अनेक विधेयके संमत करण्याचा चंग बांधल्याने त्यांना संसदेत हजर राहणे क्रमप्राप्त झाले. त्यात ते राज्यसभेचे सदस्य आणि या सभागृहात तर भाजपला विशेष चौकस रहावे लागत असल्याने कार्याध्यक्ष या नात्यानेही त्यांना संसदेत उपस्थित राहणे अनिवार्यच ठरले.

पण सदासर्वकाळ तर सभागृहात बसणे त्यांना शक्य नसते. पक्षाची कामेही भरपूर आहेत.

मग बसायचे कुठे हा प्रश्न निर्माण झाला.

सध्याचे गृहमंत्री व अजुनही अध्यक्ष असलेले अमितभाई शहा हे पूर्णत्वाने पक्षाचे






राष्ट्रवादी स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार !!

काम सांभाळत असताना राज्यसभेचे नेते व तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली किंवा रेल्वेमंत्री पियुष गोयल यांच्या संसदेतील कार्यालयांचा वापर त्यांच्या कामासाठी करीत असत. तेथेच ते त्यांच्या लोकांना भेटत असत.

आता नड्डा यांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवले आहे.

सध्या नड्डा राज्यसभा नेते व सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गेहलोत यांच्या खोलीत म्हणजेच संसदेतील कार्यालयात बसून पक्षाचा कारभार हाकत असतात.

गेहलोत हे शिस्तबध्द असल्याने राज्यसभेचे नेते या नात्याने जवळपास पूर्णवेळ राज्यसभेत बसून कामकाजात सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्या कार्यालयात बसून नड्डा यांनाही पक्षाचे कामकाज पाहणे सोपे जाते.

पूर्णकालिक अध्यक्षांच्या पावलावर पाऊल ठेवूनच कार्यकारी अध्यक्षांचीही वाटचाल सुरु आहे !

## माहिती व प्रसारण नियंत्रण

वर्तमान युगपुरुषी राजवटीवर जेव्हा माध्यमांची मुस्कटदाबी करण्याचा आरोप होतो तेव्हा 'राजवट-समर्थक' म्हणजेच 'भक्त-गण' तत्काळ खवळून उठतात.

तुम्ही एवढे त्यांच्या विरोधात लिहिता-बोलता तुम्हाला कधी त्रास झालाय असा प्रतिप्रश्न करुन ते समोरच्या पत्रकाराला गप्प करण्याचा प्रयत्न करीत असतात.

परंतु या मंडळींचे एक गुपित नुकतेच कानावर आले.

ज्या दिवशी भाजपला अडचणीत आणणारी मोठी बातमी असेल त्या दिवशी 'राजवट पुरस्कृत' आणि राजवटीचा वरदहस्त असलेल्या वृत्तवाहिन्यांना म्हणे पक्षकार्यालयातून एक फोन जातो.

विलक्षण 'प्रेमळ स्वरात' त्या वृत्तवाहिन्यांच्या प्रमुखांना या अडचणीत आणलेल्या बातमीकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यास सांगितले जाते.

पण इतर ज्या काही स्वतंत्र मोजक्या वृत्तवाहिन्या आहेत त्यांचे काय? त्यांच्यातर्फे तर संबंधित बातमी तर प्रसारित केली जाणारच ना?

मग त्यासाठी काही पुड्या सोडणाऱ्या बातम्यांची माहिती या 'फोन'वरुन पुरवली जाते.

यामध्ये मुख्यतः हिंदुत्व, हिंदु-मुस्लिम, राष्ट्रवाद व देशभक्तीचे मुद्दे असतात. काश्मीर व काश्मिरी मुसलमान व त्यांच्या नेत्यांना बदनाम करण्याचा मुद्दा तर खास 'हातचा' असतो. नाहीतर पाकिस्तानला धडा शिकवण्याबद्दलची एखादी बातमी तयार करण्यात येते. कुठेतरी पाकिस्तानी एजंटांच्या असलेल्या कारवायांची पुडी सोडली जाते.

जेणेकरुन भाजपला अडचणीत आणणारी बातमी दुर्लक्षित होईल यासाठी हे प्रकार करण्यात येतात.






सामान्य माणसाला देशभक्ति, हिंदुत्व व राष्ट्रवादाची गोळी देऊन गुंगवण्याचे प्रकार या 'पुरस्कृत माध्यमां'तर्फे पध्दतशीरपणे केले जात आहेत. निवडणुकीच्या वेळी हाच प्रकार करण्यात आला होता.

मेरा भारत महान !!!!!

## माध्यमांबरोबर संघर्ष ?

भारी भरभक्कम बहुमताने सरकार सत्तेत आल्याचे फायदे असतात त्याचप्रमाणे तोटेही असतात.

ते तोटे सहन करण्यामध्ये माध्यमांचा नंबर सर्वात वरचा लागेल. त्याचा एक प्रयोग सध्या सुरु आहे.

अर्थसंकल्प तयार केला जाताना पाळल्या जाणाऱ्या गोपनीयतेमुळे एक महिना आधीपासून पत्रकारांना अर्थमंत्रालयात मज्जाव असतो. ही गेल्या अनेक वर्षांची प्रथा आहे व तिचे पालन पत्रकार करीत असतात.

अर्थसंकल्प संसदेत सादर झाल्यानंतर हा प्रतिबंध मागे घेण्यात येतो.

यावर्षी मात्र तसे काही घडले नाही.

5 जुलैस अर्थसंकल्प सादर झाला. 8 जुलै रोजी अर्थमंत्रालयाचे वार्तांकन करणारे वार्ताहर मंत्रालयापाशी पोहोचल्यानंतर त्यांना 'प्रवेश बंदी' चालू असल्याचे सांगण्यात आले. त्यांनी त्याबद्दल निषेध करायला सुरुवात केली.

ही बाब अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यापर्यंत गेल्यानंतर त्यांनी सांगितले की हे माझे मंत्रालय आहे. येथे कुणाला प्रवेश द्यायचा किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार त्यांचा आहे.



वार्ताहरांनी सांगितलेल्या माहितीनुसार निर्मला सीतारामन यांनी त्यांच्याशी अत्यंत उर्मट वर्तन केले. 'तुम्हाला निषेध करायचा असेल तर करा, तुम्हाला प्रेस क्लबपाशी जाऊन निदर्शने, मोर्चा काय करायचे ते करु शकता पण मी प्रवेशबंदी मागे घेणार नाही. वाटल्यास तुम्ही सुप्रीम कोर्टातही जाऊ शकता.

प्रकरण पेटण्याची चिन्हे दिसू लागली.

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थमंत्री आर्थिक वार्ताहरांना एक भोजनही देत असतात.


वार्ताहरांनी त्यावर बहिष्कार टाकला.

पण गरीब वार्ताहरांच्या बहिष्काराने काय होणार ?

त्यांच्या वरिष्ठांनी मात्र या वार्ताहरांना साथ देण्याऐवजी अर्थमंत्र्यांच्या पंचतारांकित रात्रिभोजनाचा आस्वाद घेण्यात धन्यता मानली. या प्रकाराचा बहुतेक पत्रकार संघटनांनी निषेध केला. ज्या एडिटर्स गिल्डने या प्रकाराचा निषेध केला त्यामधील काही सदस्यही या भोजनात सहभागी झाले होते.

एवढे होऊनही वार्ताहरांनी

**पत्रकारांना अर्थमंत्रालयात येण्यास बंदी आहे, येथे कोणाला प्रवेश द्यायचा किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार माझा आहे... सीतारामन**




हार मानलेली नाही.

आपले दैनंदिन वार्तांकनाचे काम व कर्तव्य पार पाडणे त्यांच्यावर बंधनकारक आहे कारण आता त्यांच्या वरिष्ठांनी त्यांच्यावर दबाव आणण्यास सुरुवात केलेली आहे.

ते अभिनव पध्दतीने निषेध चालूच ठेवणार आहेत.

ही लढाई किती दूरवर जाईल ??

माहिती नाही !

पण बहुमताचा बडगा आणि आपले खरे दात दाखविण्यास सुरुवात झालेली आहे !

## बाबूंची पाचावर धारण !!

पत्रकारांना मंत्रालयांमध्ये मज्जाव करण्याने मोदी सरकारने एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत.

चिनी म्हणीप्रमाणे 'माकडाला घाबरवण्यासाठी कोंबडी मारा!'

एकदा पत्रकारांना मंत्रालयात मज्जाव केला आणि कोणत्याही अधिकाऱ्याकडे केवळ पूर्वपरवानगी व वेळ निश्चित करुनच भेटण्याचे बंधन घातल्यानंतर पत्रकारांना एवढ्या अधिकृतपणे, उघड उघड कोणता अधिकारी भेटणार आहे?


आणि अधिकारी भेटलेच तर पत्रकारांना पाहिजे ती माहिती देण्याची हिंमत ते दाखवणार आहेत का?

अजिबात नाही !

त्यामुळे अर्थमंत्रालयात मज्जाव करुन सरकारने केवळ पत्रकारांनाच नव्हे तर बाबू मंडळींना देखील







'इशारा' दिलेला आहे.

हा इशारा कोणता?

'बोललात तर याद राखा !'

सरकारला जे साध्य करायचे होते ते सरकारने साध्य केलेले आहे. आता कोणत्याच अधिकाऱ्यांचे पत्रकारांशी बोलण्याचे साहस होणे अशक्य आहे.

एवढे झाल्यानंतर एका पत्रकाराने सहज खडा टाकण्याच्या हेतुने त्याच्या अगदी रोजच्या भेटीतल्या व माहितीतल्या अधिकाऱ्याला घरी फोन केल्यावर त्याने अक्षरशः गयावया करुन त्या पत्रकाराला सांगितले की त्यालाही पोरेबाळे, बायको आहे. कृपा करुन त्याच्यावर , त्याच्या नोकरीवर गदा येईल असे काही करु नका. पुन्हा फोन करु नका, असे सांगून फोन बंद केला.

केवढी ही दहशत ?

असे सांगोसांगी किंवा कानोकानी समजले की या प्रतिबंधानंतर गृहमंत्रालयाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांनी गृहमंत्र्यांना या प्रतिबंधाबद्दल छेडले असता त्यांनी, ते त्यांच्या मंत्रालयात(गृह) अशी बंदी वगैरे आणणार नाहीत कारण त्यांना कोण पत्रकार कुणाला भेटतो याची माहिती तत्काळ कळत असते असे सांगून पत्रकारांना गप्प केले.

मेरा भारत महान !

## मला काळजी नाही,मला सर्व काही कळते!

याच मालिकेतला आणखी एक प्रसंग !

अर्थमंत्रालयाच्या नाकेबंदीनंतर त्याच नॉर्थ ब्लॉकमध्ये असलेल्या गृहमंत्रालयाचे प्रमुख अमितभाई शहा यांनाही



पत्रकारांनी प्रश्न केला की अर्थमंत्र्यांप्रमाणे तुम्हीही गृहमंत्रालयात पत्रकारांना मज्जाव करणार काय?

मंद स्मित करीत अमितभाई उद्गारले, 'मी अशी चिंता करीत नाही. कारण कोण पत्रकार कुणाला भेटतो याची सर्व माहिती माझ्याकडे लगेचच येत असते ! त्यामुळे तुम्ही बिनधास्त रहा!'

व्वा, याला म्हणतात आत्मविश्वास !!!

## बिर्याणी, खिचडी, पुलाव की खीर ??

काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राहूल गांधी यांनी राजीनामा देऊन टाकला.

पण पुढे काय ?

नव्या अध्यक्षांचा पत्ता नाही ! राहूल गांधी काय करत आहेत याची कुणाला माहिती नाही !

सारे काही अधांतरी चालू आहे !

राहूल गांधी एका पत्राद्वारे अध्यक्षपद सोडण्याच्या निर्णयावर ते ठाम असल्याचे सांगितल्यानंतर मात्र पक्षात त्याची गंभीर दखल घेण्यात आली आणि नव्या अध्यक्षपदाबाबत विचार सुरु झाल्याचे कळते.

नव्या अध्यक्षांबाबत निर्णय करण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणीची बैठकही लवकरच बोलावण्यात येत आहे.

परंतु कर्नाटकातील पेचप्रसंगामुळे कदाचित या प्रक्रियेला उशीर लागू शकतो.

काँग्रेसमधील या अनागोंदीबद्दल काही नेते आपसात चर्चा करीत होते.

पत्रकारांनी त्यांनी कुतुहलाने विचारले की काँग्रेसमधील ही अनिश्चितता कधी संपणार आहे ?

त्यावर एका नेत्याने मोठ्या मिष्किलपणे उत्तर दिले ......... 'असं आहे की स्वंयपाकघरात भोजन बनविण्याची सर्व सामग्री जय्यत तयार आहे. भाज्या आणून ठेवल्यात. आटा आहे. डाळ आहे. तांदूळ आहेत. चिकन, मटण आहे.

मसाले, तेल सर्व काही आहे.

आता प्रश्न आहे की या सामग्रीतून बनवायचे काय ? पदार्थ कोणता बनवायचा ?'

कुणी म्हणते बिर्याणी बनवा !

कुणी म्हणते खिचडी बनवा !

तर कुणाचा आग्रह पुलावसाठी आहे.

काही मंडळींनी सांगितलंय की चला खीर बनवा !

आता एवढी सगळी सामग्री हाताशी असताना त्याचा पदार्थ कोणता बनवायचा यावरच एकमत होईनासे झाले आहे.

त्यामुळे आता पदार्थावर एकमत झाले की पुढील कृति सुरु करण्यात येईल !

हे विनोद येथेच थांबत नाहीत !

एकाने एका गोष्टीकडे निर्देश करताना म्हटलं 'काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामासत्र सुरु केलं आहे. बहुतेक सरचिटणीसांनी राजीनामे दिले आहेत. मग प्रियंका गांधी पण सरचिटणीस आहेत. त्यांनी अजून राजीनामा का दिलेला नाही?






आणखी एक शंका कुणीतरी उपस्थित केली.

राहूल गांधी यांनी तर अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेला आहे. मग सध्या काँग्रेसमध्ये ज्या वेगवेगळ्या नियुक्त्या केल्या जात आहेत त्या कोण करीत आहे?

त्यावर एकाने आणखी मिष्किलपणा करीत म्हटले की भारतीय परंपरेनुसार चार वेद हे कुणी लिहिलेले नाही. म्हणजेच वेदांचे कुणी विशिष्ट असे लेखक नाहीत. त्यामुळे त्यांना 'अपौरुषेय' म्हटले जाते.

काँग्रेसमध्ये सध्या ज्या नियुक्त्या किंवा कुणाकुणाला काढले जात आहे त्या सर्व निर्णयांचा कुणीही एक त्राता नाही. ते निर्णयही वेदांप्रमाणेच 'अपौरुषेय' आहेत. त्या निर्णयांचे कर्तेकरविते अज्ञात आहेत.

या टिप्पणीवर सर्वत्र एकच हंशा पिकला !

## लोकसभा अध्यक्षांची लगबग

ऐकावे ते नवलच !

सध्या संसदेचे अधिवेशन सुरु आहे.

सकाळी 11 वाजता पत्रकार शिरस्त्याप्रमाणे लोकसभेच्या माध्यम-कक्षात प्रवेश करते झाले.


पाहतात तो काय ?

या कक्षातील पहिल्या दोन रांगांमध्ये बसण्यासाठी मनाई करणारा फलक तेथे लावलेला त्यांना आढळला.

माध्यम प्रतिनिधींच्या कक्षात पहिल्या दोन रांगा या प्रमुख वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींसाठी राखून ठेवलेल्या असतात. त्यामध्ये विविध वृत्तसंस्था, आकाशवाणी व प्रमुख वृत्तपत्रे यांचा समावेश आहे.

या दोन रांगांमध्ये बसण्यास मनाई करण्याचे कारण काय अशी विचारणा चकित झालेल्या पत्रकारांना केली.

बिचाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी 'वरुन आदेश' असे सांगून



स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!




हतबलता प्रकट केली. मग प्रकरण लोकसभेच्या माध्यम संपर्क संचालकांकडे पोहोचले. त्यांना देखील या प्रकाराची माहिती नव्हती. ते देखील या प्रकाराने बुचकळ्यात पडले. कारण असे निर्णय त्यांच्यामार्फतच लोकसभा अध्यक्षांतर्फे केले जात असतात.

मग संपर्क अधिकारी लोकसभा अध्यक्षांकडे व महासचिवांकडे गेले. हे आदेश लोकसभा अध्यक्षांकडून दिले गेले आहेत काय अशी विचारणा केल्यावर त्यांनीही नकारार्थी उत्तर दिले.

मग हे आदेश दिले कुणी ?

लोकसभा अध्यक्षही काहीसे चकित झाले. त्यांनी चौकशीचे आदेश दिले आणि त्यापूर्वी तत्काळ माध्यम कक्षातील बंदीची सूचना मागे घेण्याचा आदेशही दिला.

मागाहून कळले ते भन्नाटच निघाले !

लोकसभा अध्यक्षांनी सभागृहातील विविध कक्षांच्या डागडुजी व सुशोभीकरणाचे आदेश दिले होते.

संसदेच्या बांधकाम विभागाने सुशोभीकरणाच्या नादात पत्रकारांनाच सर्वप्रथम दणका दिला.

आता तो या विभागाच्या अंगाशी आला.

या प्रकरणाची दखल थेट लोकसभा अध्यक्षांनीच घेतल्यामुळे प्रकरण गंभीर झाले.

आता यात कुणावर कारवाई होते की काय अशी काळजी व्यक्त केली जात आहे!

## स्वच्छतेच्या गमती जमती !

आपल्या अवतीभवती सभोवती स्वच्छता राखली पाहिजे यात अजिबात शंका नाही.

यासंदर्भात पंतप्रधानांनी सुरु केलेल्या मोहिमेचे स्वागतच केले पाहिजे.

परंतु कोणत्याही गोष्टीचा अतिरेक किंवा प्रदर्शन सुरु होते तेव्हा त्यातील गंभीरपणा नाहीसा होता.

गेल्या आठवड्यात शनिवार व रविवार असे दोन दिवस संसद भवन परिसर स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

मुळात संसद भवनाचा परिसर हा तुलनेने खूपच स्वच्छ ठेवला जात असतो. त्याची नियमित काय जवळपास दैनंदिन पातळीवर देखभाल केली जात असते. सुशोभीकरणही नियमितपणे केले जात असते.

सांगण्याचा मुद्दा हा की संसद भवन परिसराची निवड स्वच्छता मोहिमेसाठी करणे हे काहीसे आश्चर्यकारक होते. परंतु तरीही अनेक सन्माननीय संसदसदस्य या मोहिमेसाठी संसद परिसरात जमा झाले होते. स्वतः लोकसभा अध्यक्ष यामध्ये सहभागी झाले होते. त्यांच्या खेरीज तरुण अर्थ राज्यमंत्री अनुराग ठाकूर, हेमा मालिनी वगैरे मंडळी होती. या मोहिमेला भरपूर प्रसिध्दी मिळेल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात माध्यमांनी या प्रकाराची फारशी दखल घेतली नाही. मुळात ज्या परिसराची नियमित देखभाल व स्वच्छता होत असते तेथेच स्वच्छता मोहिम राबवण्याचे कोणतेच कारण नाही. त्याचप्रमाणे एखाद्या प्रदर्शनी सामन्याप्रमाणे या प्रसंगाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळेही माध्यमांनी त्याबाबत उदासीनता दाखवली. मुळात या कार्यक्रमात केवळ देखावाच अधिक असतो. कारण चित्रीकरणापुरते झाडू मारले जातात, कॅमेऱ्यासमोर स्वच्छता मोहिमेचे गुणगान केले जाते आणि तो प्रसंग व प्रकार तेथेच संपुष्टात येतो. त्यामुळेच एका गंभीर कार्यक्रमाचे रुपांतर आता सवंगपणात होऊ लागले आहे. याची वेळीच दखल घेऊन त्याचे गांभीर्य टिकविल्यास आणखीही सार्वजनिक स्वच्छतेचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल!!!





# देवसाने मांजरपाडा प्रकल्पस्थळी आमदार छगन भुजबळ यांच्या हस्ते जलपूजन



# महाराष्ट्राच्या धरतीवर पडलेले सर्व पाणी अडवा, राज्य दुष्काळमुक्त होईल

## छगन भुजबळ

**नाशिक-देवसाने : ''महाराष्ट्राच्या धरतीवर पडणारा प्रत्येक थेंब अडवून वळविला तर महाराष्ट्र दुष्काळमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही,'' असे उद्‌गार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आमदार छगन भुजबळ यांनी काढले.**

देवसाने- मांजरपाडा प्रकल्पाचे जलपूजन आमदार छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्यांनी या प्रकल्पाचा उद्देश यशस्वी होताना पाहून मनस्वी आनंद होत असल्याचे स्पष्ट केले. गुजरातमध्ये वाहून जाणारे पाणी महाराष्ट्राला मिळू शकते याचे उदाहरण म्हणजेच देवसाने-मांजरपाडा प्रकल्प आहे असेही आमदार छगन भुजबळ यांनी सांगितले.

आमदार छगन भुजबळ यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या देवसाने मांजरपाडा प्रकल्पाचे जलपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी आमदार नरहरी झिरवाळ, आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, कादवा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्रीराम शेटे, धनराज महाले, दिलीप बनकर, जयवंतराव जाधव, रंजन ठाकरे,जिल्हाध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड, गजानन शेलार, दिलीप खैरे, अर्जुन टिळे, निवृत्ती




अरिंगळे, संजय बनकर, महेंद्र काले, साहेबराव मढवई, वसंतराव पवार, अरुण थोरात, भास्करराव भगरे , विजय पाटील, डॉ.योगेश गोसावी आदीसह येवला, चांदवड, नांदगाव, दिंडोरी, निफाड तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

''तेलंगणा सरकारने कालेश्वरम प्रकल्प राबविला या प्रकल्पात ६५० मीटरहुन अधिक उंचीवर पाणी लिफ्ट केले आहे. त्याचप्रमाणे देवसाने मांजरपाडा प्रकल्पाकडे उदाहरण म्हणून बघावे आणि महाराष्ट्राचे गुजरातला वाहून जाणारे पाणी अडवून ते महाराष्ट्रात वळविले तर नाशिक जिल्ह्यासह मराठवाडा आणि महाराष्ट्र दुष्काळमुक्त झाल्याशिवाय राहणार नाही,'' असेही भुजबळांनी सांगितले. महाराष्ट्रातून गुजरातला वाहून जाणारे पाणी वळण बंधारे आणि बोगद्याद्वारे गोदावरी खोऱ्यात आणणारा राज्यातील हा एकमेव प्रकल्प आहे. तर १०.१६ किमी बोगद्याद्वारे पाणी वळवणारा हा पहिलाच प्रकल्प आहे असेही छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले.



गुजरातमध्ये जाणारे पाणी आपण पूर्वेकडे वळवू शकतो त्याचे हे एक यशस्वी उदाहरण आहे. गुजरातला वाहून जाणारे पाणी आज ना उद्या उचलू पण पाण्याचा हक्क गुजरातला लिहून देऊ नका, यासाठी कितीही कर्ज काढावे लागले तर ते काढा त्यासाठी पक्षभेद विसरून एकत्र या आणि महाराष्ट्राच्या मातीवर पडणारा प्रत्येक थेंब महाराष्ट्राला मिळवून द्या असे आवाहन आमदार छगन भुजबळ यांनी केले.

देवसाने मांजरपाडा प्रकल्प माझ्या ड्रीम प्रोजेक्ट पैकी एक प्रकल्प असून आज तो पूर्ण केला आहे. याचा मला मनस्वी आनंद आहे.तसेच डोंगरगाव पुणेगाव दरसवाडी कालव्याचे अस्तरीकरण व विस्तारीकरण करण्यासाठी पाठपुरावा सुरू असून शासनाने लवकर यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणीदेखील आमदार छगन भुजबळ यांनी केली.

ज्या देवसानेसह परिसरातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या

त्या स्थानिक शेतकऱ्यांचे त्यांनी आभार मानून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

जलसंपदा विभागाने आयोजित केलेल्या जलपूजन कार्यक्रमाबाबत बोलतांना ते म्हणाले की जलसंपदामंत्र्यांनी जलपूजनासाठी बोलावले असते तर आजचा कार्यक्रम घेण्याची गरज पडली नसती असे सांगून पाण्याच्या बाबतीत राजकारण करण्याचा कोणताही हेतू नसल्याचे आमदार छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले. यावेळी 'वळचणीचे पाणी आढ्याला गेले' हा संत एकनाथांचा अभंग गाऊन छगन भुजबळ यांच्या अथक प्रयत्नामुळे पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळाल्याने ते आधुनिक भगीरथ असल्याचे आमदार नरहरी झिरवाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले.



दुष्काळी चांदवड व येवला तालुक्यांना पाणी पोहोचविण्याचे श्रेय त्यांनी छगन भुजबळांना दिले. त्याचबरोबर दिंडोरी तालुक्यातील जनतेचा त्याग अधोरेखित करून स्थानिक शेतकऱ्यांना चारणवाडी धरणामध्ये १०० दशलक्ष घनफूट पाणी राखीव ठेवण्याची मागणी त्यांनी केली. माजी आमदार धनराज महाले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.या जलपूजन सोहळ्यासाठी येवला तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारपार व दमणगंगा पिंजाळ

नारपार आणि दमणगंगा, पिंजाळ या पश्चिम वाहिनी नद्या असून त्या महाराष्ट्रातील सह्याद्री डोंगरात उगम पावतात आणि पुढे गुजरातमध्ये वाहात जाऊन अरबी समुद्राला मिळतात. या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात जवळपास तीन ते चार हजार मिलीमीटर इतका प्रचंड पाऊस पडतो. या सर्व नद्यांचे पाणी आपण महाराष्ट्राने किती वापरावे व गुजरातने किती वापरावे. यासंबंधीचा निर्णय अद्याप झालेला नाही. हा निर्णय अगोदर करून घ्यावा लागेल. त्यासाठी लवादाकडे जायचे का दोन्ही राज्यांच्या संमतीने एक समिती नेमून या पाण्याचे वाटप करायचे, याचा निर्णय करावा लागेल. तापी नदीच्या पाणीवाटपाबाबत आपण लवादाकडे गेलो नाही. मध्य प्रदेश,महाराष्ट्र आणि गुजरात या तीन राज्यांचा तापी नदीशी संबंध येतो. तापीच्या या पाणी वाटपासाठी १९५८ मध्ये एम.एस. तिरूमला अय्यंगार

# या नद्यांचे आधी पाणीवाटप करून घ्यावे छगन भुजबळांची मागणी

समिती नेमण्यात आली होती. तिने ठाकून-ठोकून प्रत्येक गोष्टीचा स्पष्टपणे निर्णय दिला व पाणीवाटप करून दिले. त्यामुळे गेल्या साठ-सत्तर वर्षांत तापीच्या पाणीप्रश्नावरून कोणताही वाद उद्भवला नाही. त्याच धर्तीवर व तशाच पद्धतीने नारपार, दमणगंगा व पिंजाळ या नद्यांचे पाणीवाटप गुजरात आणि महाराष्ट्र यांच्यामध्ये करण्यासाठी आधी एक थेंबही पाणी आज मिळत नाही. ही दुर्दैवी स्थिती आहे.

पार ही नार नदीची उपनदी आहे. पार ही उकई धरणाच्या खालच्या भागातून तापी नदी ओलांडून जाते आणि तिचा कालवा पुढे नर्मदा नदी ओलांडतो. मग हे पाणी कच्छ, सौराष्ट्राकडे नेण्याची योजना गुजरात सरकारने आखली आहे. उताराने हे सर्व पाणी वाहत जाते. नारपारचे



समिती नेमली पाहिजे. या समितीने प्रत्येक राज्याचा पाण्याचा हिस्सा ठरवून दिला पाहिजे. आज महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन्ही राज्ये मंत्रालयीन स्तरावर आपापसात पाणी वाटपासंबंधीचा प्रयत्न करताहेत. त्यामुळे जनतेला कोणतीही माहिती मिळत नसून महाराष्ट्राच्या हिश्श्याला कमी पाणी येण्याचा मोठा धोका आहे. दमणगंगा नदीवर गुजरातेत गुजरात सरकारने मोठमोठी धरणे बांधली असून सर्व पाणी अडविले आहे, त्यामुळे आज या सर्व नद्यांचे पाणी गुजरातला चालले आहे. महाराष्ट्राला या नद्यातील हे पाणी नाशिककडे आणायचे झाले तर उपसा सिंचन योजना करून उचलावे लागेल. काही पाणी उताराने वैतरणा खोऱ्यात येऊ शकते. वैतरणेचे प्रवाही पद्धतीने दीड टीएमसी आणि उपसा जलसिंचन योजनेमार्फत जवळपास ३३ टीएमसी असे एकूण ३५ टीएमसी पाणी उचलून गोदावरीत व गिरणा नदी खोऱ्यात टाकता येते. वैतरणेचे आज जे पाणी मुंबई शहराला पिण्याकरिता जाते आहे, त्याऐवजी दमणगंगा नदीचे पाणी मुंबईला दिले तर वैतरणेचे पाणी गोदावरी खोऱ्यातील दुष्काळी भागाला वापरता येईल.

निर्मितीच्या दिवसांपासून म्हणजे जवळपास 446 वर्षांपासून ते आजतागायत आपले वैशिष्ट्य टिकवून असणारे आणि मध्ययुगातील जलतंत्रज्ञानाची विस्मयकारी प्रगती दर्शवणारे एका अप्रतिम जलस्मारक म्हणजे बीड शहराच्या नैऋत्य दिशेला बीड-सोलापूर महामार्गावर असणारी 'खजाना बावडी' होय.


शेतीला पाणीपुरवठा करून कृषीउत्पादनामध्ये वाढ करण्याच्या मुख्य उद्देशाने अहमदनगरच्या निजामशाहीचा प्रमुख मुर्तुजाशाह निजामहुसेन निजाम याने बीडचा तत्कालीन जागीरदार सलाबतखान यांच्या हस्ते इ.स.1572 मध्ये ही बावडी बांधली. दखखनच्या पठारावरील प्रसिद्ध भूजल शास्त्रज्ञ राजा भास्कर हा या आश्चर्यकारक बावडीचा स्थापत्यकार होता. सलाबतखान जहागीरदार हा तसा मुळचा इराणचा होता. तो अत्यंत विकासप्रिय होता. बीड नगरीच्या सुशोभिकरणात पक्के रस्ते, वृक्षारोपण व विविध जनहितार्थ कामांमुळे बीडच्या ख-या सुशोभिकरणास त्यानेच आरंभ केला असे म्हटले जाते. सम्राट मुर्तुजाशाह निजामाने



# मराठवाड्याच्या दुष्काळाची दाहकता सांगणारी 'खजाना बावडी'


**डॉ. सतीश साळुंके**

बीड नगरीच्या विकासासाठी मोठा खजिना (निधी) दिला. त्याने प्रत्यक्ष येऊन बीडला भेट दिल्याचा शिलालेख उपलब्ध आहे. मुर्तुजाशाहने दिलेला खजिना विविध विकासकामांसाठी होता मात्र भूजल तज्ज्ञ व स्थापत्यकार राजा भास्करने हा सर्व खजिना केवळ शेतीसिंचनासाठी बांधत असलेल्या बावडीवरच खर्च केला त्यामुळे या बावडीला 'खजाना बावडी' असे नाव पडले. सगळा खजिना केवळ एकाच बावडीवर खर्च केल्याने निजाम चिडेल व शिक्षा करेल या भीतीने राजा भास्कर यांनी आत्महत्या केली. त्यांची समाधी खजाना बावडीच्या पाटा शेजारी बलगुजारमध्ये आहे. बीड शहराच्या दक्षिणेला हजारो एकर सुपीक जमीन आहे. मध्ययुगात हा भाग बर्ग-ए-झरा म्हणून ओळखला जात असे. ही सुपिक जमीन पाण्याअभावी नापिक झाली होती. म्हणून जलसिंचन या एकमात्र उद्देशासाठी खजाना बावडी बांधली गेली. कोणत्याही उपकरणांच्या मदतीशिवाय 23.5 फूट खाली असणारे या खजाना बावडीतील पाणी वर भूस्तरावर आणून ते चार ते पाच किलोमीटर दूर एक हजार एकर शेतीला दिले जाते. विशेष



**बीड शहरापासून पाच कि.मी. अंतरावर असणारी ४०० वर्षांपूर्वीची इतिहास प्रसिद्ध 'खजाना बावडी' यंदाच्या वर्षी पूर्ण कोरडी होती. पुरेसा पाऊस झालेला नसल्यामुळे या विहिरीत पाणी आले नाही. गेल्याचारशे वर्षांत फक्त चार वेळा ही विहिर कोरडी पडली. या विहिरीचे ऐतिहासिक महत्त्व व वैशिष्ट्ये सांगणारा हा इतिहास तज्ज्ञाचा लेख.**

म्हणजे या बावडीची मुख्य आऊटलेट नहर ही मध्ययुगात प्रचंड वेगाने वाहणाऱ्या कलिंदकन्या बिंदुसरा नदीच्या खालून वाहणारी ही बावडी आजही देशातील भूजल शास्त्रज्ञांना तिच्या तंत्र संशोधनासाठी खुणावत आहे. मध्ययुगातील जलस्त्रोत संशोधन, जलवितरण व जलसिंचनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असणाऱ्या या बावडीच्या स्थापत्याचे अनेक पैलू आहेत. बावडीचे पाणी भूतलापासून २३.५ फूट खोल आहे. या बावडीला दोन पॉइंट पाच फूट रुंद व पाच फूट उंचीचे तीन नहरी बोगदे आहेत. या नहरीतून ताशी ३९८ घनफूट पाणी वाहते. बावडीला तीन नहरी आहेत. पैकी दोन इनलेट मधून नहरीच्या या विहिरीला जलपुरवठा होतो व तिसरी नहर ही सिंचनासाठी पाणी वाहून नेणारी आऊटलेट मुख्य नहर आहे. दोन इनलेट नहरी पैकी एक नहर भूगर्भापासून





जवळपास ८१४० मी. लांब असून ती सह्याद्री पर्वताच्या उपरांग असणाऱ्या कलिंग पर्वत पाळीचा घाट डोंगरापर्यंत गेली आहे तर दुसरी इनलेट नहर अग्नेय दिशेला तितकीच लांब असावी, पण सध्याची पंधरा फुटावर बंद अवस्थेत आहे. या दोन्ही नहरी मधून येणारे पाणी बावडीत जमा होते. पाणी उत्तरेकडील नहरीने पुढे जवळपास चार ते पाच किलोमीटर अंतरावरील बळ गुजरच्या शेकडो एकर शेतीला पुरवले गेले. या बावडीला स्वतःचे पाणी नाही. विहिरीच्या तळाला स्वच्छ अशा जुन्या खडीचा गिलावा आहे. त्यामुळे ही विहिर मध्ययुगातील एक वॉटर कलेक्ट वेल ठरते. या बावडीच्या नहरी व त्याचा जमीन स्तरावर उगम यांचे स्थापत्य आश्चर्यकारक आहे. जलसिंचनासाठी पाणी वाहून नेणाऱ्या नगरीवर साधारणतः प्रत्येक शंभर फुटावर उसास झरोके आहेत. याची दोन कारणे असावीत. एक म्हणजे



जमिनीखालून विहिरीतील पाणी वाहून नेणारा ऑब्झर्व्हेशन टॉवरचा दिसणारा आतला भाग. सध्या दुष्काळामुळे हे टॉवर कोरडे पडून आतील वहन मार्ग दिसत आहे.

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार !!



जलप्रवाहात येणारे अडथळे दूर करणे व पाण्यास सूर्यप्रकाश मिळणे. हे उसास भूगर्भातील नहरीच्या स्तराप्रमाणे आहेत. कुठे ते पंधरा फुटावर तर कुठे ते दहा फुटापर्यंत खोल आहेत. आऊटलेट नगरीवर अशी ५२ इनलेट नहरीवर हे उसासे सापडतात. मात्र त्यांचीही संख्या पन्नासवर असावी. हे सगळे उसासे दगडी केळ्यांचे वरून चौकटीतून गोलाकार पक्के बांधकाम करण्यात आले आहे. मुख्य आउटलेट नहर विहिरीपासून उत्तरेस जवळपास चार ते पाच किलोमीटर अंतरावर जमिनी स्तरावर खुली होते. या भागाला स्थानिक भाषेत फुटका नळ म्हणतात. फुटक्या नळातून या नहरीचे पाणी पुढे पुढे तब्बल एक हजार टँकरला दिले जाते. त्यासाठी शेतीचा भू स्तराप्रमाणे समूह करून पाट पद्धतीने हे जल वितरण केले जाते. ते आजही कायम आहे. मात्र लोकसंख्या वाढीमुळे बीड शहर मोठ्या प्रमाणात विस्तारल्याने या बावडीच्या जलसिंचन क्षेत्रातील एक हजार एकर शेती पैकी तब्बल चारशे ते



खजाना बावडी विहिरीतून सिंचनासाठी जमिनीखालून वाहून नेले जाणारे पाणी या निरीक्षण (ऑब्झर्व्हेशन) टॉवरमधून आपल्याला पाहता येते. असे ५६ टॉवर १० कि.मी. अंतरापर्यंत तयार केलेले आहेत आणि ते पक्क्या दगडांनी बांधलेले आहेत.

**बीड शहरातून वाहणारी पूरप्रवण असणारी बिंदूसरा नदी आता बऱ्याचदा कोरडीच असते.**





पाचशे एकर कृषी भूमीवर आज घरे उभारली आहेत. या मंडळींनी त्यांच्या घराआड येणाऱ्या नहरी चक्क बुजवून टाकल्या आहेत. वास्तविक याच नगरीवर बीड शहरातील मध्ययुगातील प्रसिद्ध उद्यान खासबाग विकसित झाले होते. त्याचे अवशेष आजही दिसतात. मात्र आजही बावडीच्या नगरीवर जवळपास पाचशे एकर जमीन भिजते आहे हे विशेष. प्रत्यक्ष शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या बॉडीची उत्तरेकडील नहर ही कलिंग कन्या बिंदुसरा नदीच्या खालून काढण्यात आली आहे. असे उदाहरण देशाच्या जलसिंचनात मध्ययुगात अपवादाने सापडते. विशेष म्हणजे बिंदुसरा नदी ही त्याकाळी प्रचंड वेगाने वाहणारी नदी असल्याचा उल्लेख विल्यम नॉरिस या प्रवाशाने त्याच्या रोजनिशीत केला आहे. तो १७०१ मध्ये बीडहून पन्हाळा किल्ल्यावर आजारी औरंगजेबला भेटायला जात असल्याचा त्यात उल्लेख आहे. एवढ्या प्रचंड वेगवान नदी खालून हा बोगदा कसा खोदला असेल हे आश्चर्य आहे.

ही बावडी दोन टप्प्यात विभागली आहे. खजिना बावडी २३.५ फूट खोल आहे. जमिनीतून १७.३ फुटावर पहिला टप्पा असून तिथे १०.५ फूट रुंदीचा गोलाकार एक छान ऐसपैस भरडा आहे. त्यावर आपण वावरू शकतो. या गोलाकार वर्णामुळे मूळ गिरीचा दुसरा टप्पा असून त्याची खोली ६.३ फुटा त्यात शेकडो वर्षांपासून चार फूट पाणी आहे या गोलाकार विहिरीचा व्यास ही दोन टप्प्यात विभागला गेलाय. विहिरीचा बाहेरून २० व आतून

# दुष्काळाचे भविष्य सांगणारी 'खजाना बावडी'

**संतांची भूमी म्हणून ओळखला जाणारा मराठवाडा हा गेली तीन वर्षे लागोपाठ सातत्याने दुष्काळाचा सामना करतो आहे. मराठवाड्यात तीव्र दुष्काळ पडणार की नाही हे बीड मधील 'खजाना बावडी' वरून लक्षात येते. गेल्या ४०० ते ४५० वर्षांत फक्त तीन ते चार वेळा ही विहिर पूर्णपणे कोरडी पडली आहे. विहिर पूर्ण कोरडी पडली की मराठवाड्यातला दुष्काळ तीव्र आहे हे वेगळे सांगण्याची गरज पडत नाही. आजूबाजूच्या पाणलोटातून भूजलाद्वारे विहिरीत येणारे पाणी १० कि.मी. अंतरावरच्या शेतीला सिंचनासाठी भूगर्भातूनच वाहून नेले जाते. हे वाहते पाणी बघण्यासाठी ५६ निरीक्षण टॉवर्स उभे करण्यात आले असून विशेष म्हणजे बिंदूसरा नदीच्या खालून बोगद्यातून हे पाणी वाहून नेले जाते. चारशे वर्षांपूर्वी किती प्रगत तंत्रज्ञान होते याचा हा पुरावा आहे. एका मुस्लिम धर्माच्या राजाने हिंदू धर्मातील शेतकऱ्यांची १ हजार एकर शेती भिजविण्यासाठी केलेली ही विहिर धर्मनिरपेक्षतेचे एक फार मोठे उदाहरण आहे.**



एकूण १९.१० मीटर तर ४.७० मीटर खोलीवर आतून १२मीटर व्यास आहे. विहिरीला पूर्वी नमूद केल्याप्रमाणे उत्तर अग्नेय व नैऋत्य दिशांना पाच फूट उंच व दोन पॉइंट पाच फूट अरुंद बोगदे अर्थात नगरी आहेत. विहिरीत उतरण्यासाठी पश्चिमेकडून दोन टप्प्यात पायऱ्या आहेत. पहिल्या टप्प्यात आरंभी मजबूत दगडी चौदा पायऱ्यातून त्या सात दहा फूट रुंद व दहा इंच उंच आहेत तर दुसऱ्या टप्प्यात तीन फेऱ्यातून थेट त्या विहिरीत जातात.

यावेळचे वैशिष्ट्य म्हणजे दोन हजार पंधरा सालचा अपवाद सोडला तर गेल्या चारशे चाळीस वर्षांत ही विहीर कधी आटली नाही. शेकडो वर्षांपासून या विहिरीत केवळ चार फूट पाणी असते. ते कमी किंवा जास्त कधी कधीही झालेले नाही. इतकेच काय शेती सिंचनासाठी आजमितीला मोठ्या प्रमाणात या बावडीचा वापर होतो. पण बीड शहराला जेव्हा जेव्हा दुष्काळाची झळ लागली तेव्हा या बावडीतून शहराच्या विविध भागांना आजही टँकरने पाणीपुरवठा केला जातो.

मध्ययुगात या वैशिष्ट्यपूर्ण स्मारकाचा अनेक अंगाने अभ्यास करण्याची गरज आहे. जलस्त्रोत शोधण्याचे तात्कालीन तंत्रज्ञान कोणते असेल? त्यावेळी अभियंत्यांनी शेकडो वर्षे



**कोरडी पडलेली बिंदूसरा नदी. तिच्या खालून 'खजाना बावडी' या विहिरीचे पाणी 400 वर्षांपूर्वी कसे नेले असेल, याचे कोडे अजूनही उलगडलेले नाही.**

जलसाठ्याचा स्तर स्थिर ठेवण्यासाठी कोणते कौशल्य वापरले असेल? कोणत्याही उपकरणांशिवाय विहिरीत पाणी जमीन स्तरावर कोणत्या तंत्राचा वापर करून आणले असावे? अखंड व गतीने वाहणाऱ्या नदीखालून बोगदा काढण्यासाठी कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला असेल? आणि शेकडो एकर जमीन कोणत्याही उपकरणाशिवाय पुढे असंख्य वर्षे भिजू शकेल, असा शोध कोणत्या तंत्राने घेतला असेल? या सर्व प्रश्नांवर संशोधन झाल्यास मध्ययुगातील जलस्त्रोत संशोधनाचे विज्ञान जलसाठ्याचे तंत्रज्ञान व पारंपरिक जलसिंचन ज्ञानाची वाट भारताला कळू शकेल. याचा फायदा हजारो मेगावॅट वीज वाचवण्यासाठी होऊ शकेल आणि मराठवाड्याच्या कुशीत उपेक्षित असणारा सांस्कृतिक स्त्रोताचा हा खजिना वर्तमानाच्या जलसिंचन व जलस्त्रोत संशोधनाची दिशा बदलून टाकण्यासाठीही उपयोगात येईल. आश्चर्य म्हणजे ही खजाना बावडी राज्य व केंद्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या संरक्षित स्मारकांच्या यादीत नाही ही बाब अलिकडे उघडकीस आली आहे.

**– डॉ. सतीश साळुंके, बीड,**
9422295352

# पिक विमा योजनेमुळे खासगी विमा कंपन्यांचेच उखळ पांढरे



## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचे लोकसभेतील कृषी मागण्यांवरील भाषण

अध्यक्ष महोदय, आज एक शेतकऱ्याचा मुलगा कृषी मागण्यांवर बोलत आहे, याबद्दल मी आपला आभारी आहे. कृषी मंत्र्यांनी कृषी क्षेत्रासाठी उपजीविकेच्या साधनांचे शंभर नवीन समूह, दहा हजार एन.जी.ओ. या सारख्या अनेक कल्पना मांडल्या. या सर्व कल्पना परिणामकारक वाटत असल्या तरी, त्याच्या तळागाळापर्यंतच्या अंमलबजावणीकडे अधिक लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. कारण, सध्या त्यासाठी बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागत आहे व भविष्यातही अशा आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पथदर्शक नकाशा तयार करण्याची आवश्यकता आहे. कृषी मंत्र्यांनी आपल्या भाषणात अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबी असल्याचे सांगितले. दूध उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबी असल्याचे म्हटले. हे सगळे यश 'यूपीए' सरकारच्या काळात मिळालेले होते. त्या यशाचा उल्लेख करून कृषी मंत्र्यांनी भाषण केले. पण, मी त्यांना विचारू इच्छितो की, आज अन्नधान्य उत्पादन हे 260 ते 265 दशलक्ष टन आहे. 2025 मध्ये आपल्याला 360 दशलक्ष टन इतकी अन्नधान्याची गरज भासेल. त्यामुळे आपल्याला केवळ पाच वर्षांत अन्नधान्याचे उत्पादन हे 100 दशलक्ष टनाने वाढवावे लागेल. या मागणीच्या पूर्ततेसाठी आपल्याकडे अगदी सुस्पष्ट असा पथदर्शक नकाशा असण्याची आवश्यकता आहे.

अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात 'झिरो बजेट फार्मिंग'चा उल्लेख केला. सर झिरो बजेट फार्मिंगमध्ये स्वावलंबी होण्यासाठी 3 ते 5 वर्षांचा कालावधी लागू शकतो. या कालावधीत अन्नधान्याच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी नियोजन केल्यास अधिक बरे होईल. या वर्षीच्या अर्थसंकल्पात 57 हजार 600 कोटी पेक्षा जास्त तरतूद करण्यात आलेली आहे. अर्थात, हे 'पीएम किसान'मुळे झाले आहे. कृषी खात्यासंबधीचा कोणताही प्रश्न प्रत्येक वेळेस अशा वळणावर नेला जातो की, शेतकऱ्यांना दरवर्षी 6 हजार रुपये मिळतील, दरवर्षी 6 हजार मिळतील. परंतु, दररोज 17 रुपये देऊन आपण शेतकऱ्यांचा सन्मान करतो आहोत की, त्याची चेष्टा करीत आहोत? दरमहा 500 रुपयांत घरखर्च भागविणे शक्य आहे का? महिना 500 रुपये देऊन शेतीला मदत करणे शक्य आहे का? मजुरीबाबत विशेषत: महाराष्ट्रातील





मजुरीबाबत बोलायचे झाल्यास महिला मजुरास दररोज 250 रुपये मजुरी दिली जाते तर, पुरुष मजुरास 500 रुपये मजुरी दररोज दिली जाते. या वरून 'पीएम किसान' चा ढोल पिटणे कितपत योग्य आहे, याचा आपण अंदाज करू शकता.

तीच गोष्ट किमान आधारभूत किंमतीची(एमएसपी) आहे. आज 25 पिकांना एमएसपी निर्धारित करण्यात आलेली आहे. या संदर्भात मी असे सुचवू इच्छितो की, 'एमएसपी' राज्यनिहाय असता कामा नये, ती स्थानिकस्तरावर करण्यात आली पाहिजे. कारण, महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भातील गव्हाच्या उत्पादनासाठी येणारा खर्च हा पश्चिम महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे. त्यामुळे अन्नधान्य उत्पादनाचे आव्हान लक्षात घेता, अन्नधान्याच्या किमान आधारभूत किमतीत 150 टक्क्यांवरून 200 टक्क्यांपर्यंत वाढ केली जावी त्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल व तो अधिक धान्य उत्पादन करण्याचा प्रयत्न करेल.

एकीकडे आपण 5 ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेवर चर्चा करतो. देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर असेल, चौथ्या क्रमांकावर असेल असे म्हणतो, त्याच वेळी एक लाजिरवाणी घटना समोर येते. 2015 ते 2018 या कालावधीत एकट्या महाराष्ट्रात 12 हजार 31 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. 2015 ते 2018 या कालावधीत दररोज आठ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.(शेमऽऽशेम). जर, आपण मुलांना म्हटले, आपली अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे, चौथ्या क्रमांकावर आहे, त्याबद्दल हे पेढे घे. तर, मुलगा म्हणेल, आधी माझ्या बापाला परत घेऊन या.

माझ्या माहितीप्रमाणे संपूर्ण कर्जमाफीचा उल्लेख सत्तारूढ पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात होता. अलिकडे माननीय मंत्र्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात कर्जमाफीचा काहीही उपयोग नाही, असे विधान केले होते. मात्र, त्याच वेळी महाराष्ट्रात भाजपचेच सरकार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे कर्जमाफीबद्दल बोलत आहेत. एकीकडे केंद्रातले भाजपचे मंत्री म्हणतात, कर्जमाफीचा काहीही उपयोग नाही, तर दुसरीकडे त्याच पक्षाचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कर्जमाफीबाबत बोलतात. हा दुटप्पीपणा कशाला? का हा देखील एक 'चुनावी जुमला' आहे? माझी सरकारला हात जोडून विनंती आहे की, हा शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न

## भाषणातील ठळक मुद्दे

1) सरकारचे आयात-निर्यात धोरण हे शेतकऱ्यांना अनुकूल असले पाहिजे.
2) बैलगाडा शर्यतीमुळे ग्रामीण भागातील युवकांच्या रोजगारात वाढ होईल.
3) 'झिरो बजेट फार्मिंग'ची व्याख्या होणे गरजेचे.
4) 'किमान आधारभूत किंमत' राज्यनिहायऐवजी स्थानिकस्तरावर करण्यात आली पाहिजे.
5) शेतकऱ्यांची कर्जमाफी हा 'चुनावी जुमला' न करता 'यूपीए' सरकारच्या धर्तीवर कर्जमाफी द्यावी.

असल्याने तो 'चुनावी जुमला' करू नये. 'यूपीए' सरकारने ज्या प्रमाणे शेतकऱ्यांचे 71 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते, त्याच धर्तीवर या सरकारने शेतकऱ्यांना दिलासा दिला जावा. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याविषयी बोलले जाते, मात्र, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शीतगृहे उभारली गेली पाहिजेत, बाजारपेठेकडे जाण्यासाठी सुलभ वाहतूक व्यवस्था, गोठवलेल्या फळभाज्यांसाठी खुली बाजारपेठ उपलब्ध होणे आदि गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर सरकारचे आयात-निर्यात धोरण हे 'एमपीओ' तसेच वैयक्तिक शेतकऱ्याच्यादृष्टीने अनुकूल असले पाहिजे. अलिकडे कांद्याच्या दराबाबत पाहिले, गेल्या दोन वर्षात द्राक्षाच्याबाबतीत पाहिले तर, असे म्हणावे लागेल की, सरकारचे आयात-निर्यात धोरण हे शेतकऱ्यांना अनुकूल असले पाहिजे.

पुढे 'झिरो बजेट फार्मिंग'चा मुद्दा आला आहे. 'झिरो बजेट फार्मिंग' हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. मात्र, 'झिरो बजेट फार्मिंग'ची एक निश्चित व्याख्या होणे गरजेचे आहे. त्याचा नेमका हेतू काय आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मला फक्त दोन मुद्दे मांडण्याची अनुमती द्यावी. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. तो म्हणजे, पिक विमा योजनेचा आहे. आधीच्या सदस्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला आहे. पिक विमा योजनेचा मूळ उद्देश हा शेतकऱ्यांना दिलासा देणे हा होता. परंतु, या योजनेतून जे दिसते ते म्हणजे, 2016 मध्ये खरीप हंगामात विमा कंपन्यांना झालेला नफा हा 6 हजार 315 कोटी रुपये असून 2016-17 मध्ये रब्बी हंगामात झालेला नफा हा 885 कोटी रुपये आहे. व खरीप हंगामात त्यांचा नफा 8 हजार 8098 कोटी रुपये आहे. याचाच अर्थ या योजनेमुळे विमा कंपन्यांचेच उखळ पांढरे झाले आहे. यावर आपण विचार केला पाहिजे.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा, ज्याचा अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आला नाही, तो मुद्दा म्हणजे, 'कृषी पर्यटन' होय! सर, कृषी पर्यटन हा असा विषय आहे की, ज्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू शकतो. शेतकऱ्यांच्या संदर्भात जे सण आहेत, परंपरा आहेत, त्या जर आपण जागतिक व्यासपीठावर आणल्या तर, (फक्त दोन मिनिट. कारण, हा माझ्या मतदार संघातला महत्त्वाचा मुद्दा आहे.)



त्यामुळे पर्यटनास मोठा वाव मिळू शकतो. त्यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, 'बैलगाडा'! आपण नेहमी बैलगाडा शर्यतीबद्दल बोलतो. बैलगाडा शर्यतीसाठी जे खिलार बैल वापरले जातात, त्यांची उत्पत्ती महाराष्ट्राच्या दुष्काळी भागात होते व त्याची विक्री पश्चिम महाराष्ट्रात होते. त्यामुळे केवळ महाराष्ट्रच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय पर्यटनासही चालना मिळू शकेल.

शेवटी, एवढेच सांगेन की, छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका अशी सूचना केली होती. तशा प्रकारच्या व्यवस्था व उपाययोजनांची अपेक्षा आम्ही या सरकारकडून करीत आहोत. धन्यवाद!

Best

Compliments

# राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा ६ ऑगस्टपासून...




पत्रकार परिषदेत जयंत पाटील बोलत असून शेजारी हसन मुश्रीफ, के. पी. पाटील आणि अे. वाय. पाटील.


# नव्या स्वराज्याचा 'नवा लढा'

## शिवनेरीच्या पायथ्याशी जुन्नर येथून यात्रेला सुरुवात...

## पत्रकार परिषदेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली घोषणा

मुंबई – राष्ट्रवादीच्या शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात ६ ऑगस्टला होणार असून शिवरायांच्या जन्मस्थळी शिवनेरीच्या पायथ्याशी जुन्नरपासून सुरु होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी कोल्हापूर येथील पत्रकार परिषदेत दिली. ही शिवस्वराज्य यात्रा ६ ते २८ ऑगस्टला राज्यातील २२ जिल्हे, ८० तालुके आणि ३ हजार किलोमीटरचा प्रवास करणार आहे.

खासदार अमोल कोल्हे आणि खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले हे यात्रेचे नेतृत्व करणार आहेत. शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून शिवस्वराज्य सनद सादर केली जाणार असून हाच पक्षाचा जाहीरनामा महाराष्ट्रातील लोकांपर्यंत घेवून जाणार असल्याचेही जयंत पाटील यांनी सांगितले. या यात्रेत बेरोजगार युवकांची नोंदणी केली जाणार आहे. त्यांच्या भविष्याचा विचार यातून सक्षमपणे केला जाणार आहे.युवकांच्या हाताला काम देणं, राज्यातील सगळ्या थरातील व्यवस्थेला मदत करण्याची भूमिका असणार आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले. ही शिवस्वराज्य यात्रा कुठल्या पक्षाच्या विरोधात नाही. घोर फसवणूक, युवकांची निराशा यावर प्रकाश टाकण्यासाठी आणि रयतेच्या हितासाठी ही शिवस्वराज्य यात्रा असणार आहे. महाराष्ट्रात, देशात लोकशाहीने चालतो. सरंजामशाही शाहीचा काळ कधीच संपला आहे. परंतु संरजामशाहीला अपवाद होता तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात. त्याकाळातही या युगपुरुषाने रयतेचे राज्य आणले. शेकडो वर्षानंतरही छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान कोट्यावधी लोकांच्या हदयात आदराचे आहे.सर्व घटकांना न्याय देण्यासाठी राष्ट्रवादीच्यावतीने शिवस्वराज्याची सनद देवून आम्ही काय देवू इच्छितो यासाठी ही सनद घेवून जाणार आहे.



# तरुणांची सामाजिक भूमिका अण्णाभाऊंच्या भूमिकेशी बांधील असावी




## राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचे विचार

सांगली - अण्णाभाऊंनी समतेचे विचार जगाला सांगितले. त्यामुळे तुमची राजकीय भूमिका काही असो पण सामाजिक भूमिका ही अण्णाभाऊंच्या भूमिकेशी बांधील असावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी तरुणांना केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सांगलीत कार्यक्रमात ते बोलत होते. जगभरात श्रमिक,कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर ज्या साहित्यिकांनी भाष्य केले त्यांच्या यादीत अण्णाभाऊंचे नाव आग्रहाने घेतले जाते असेही शरद पवार यांनी सांगितले. राजारामबापू आणि अण्णाभाऊ साठे दोन्ही दिग्गजांचे जन्मशताब्दी वर्षे सुरू होत आहे. त्यामुळे या परिसरात उपस्थित राहत असताना अत्यंत आनंद झाला. या दोन्ही सुपुत्रांनी आपल्या मातीसाठी काम केले आहे असेही शरद पवार म्हणाले. अण्णाभाऊ हे उपेक्षित समाजात जन्माला आले. उपेक्षित समाजाच्या वेदना आणि समस्या त्यांनी आपल्या लेखणीतून मांडल्या. त्यांनी नुसत्या वेदना मांडल्या नाही तर त्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केला असेही सांगितले. अण्णाभाऊंचे आदर्श म्हणजे फुले, शाहु, कार्ल मार्क्स हे होते.अण्णाभाऊंनी आपले स्थान आणि पदाचा वापर हे शेवटच्या माणसाच्या फायद्यासाठी केला असेही शरद पवार म्हणाले. सांगली जिल्ह्याचे सुपुत्र लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्ताने मानवहीत लोकशाही पक्षाच्यावतीने अण्णाभाऊंचे जन्मगाव वाटेगाव येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याठिकाणी अभिवादन सभा पार पडली. त्यावेळी उपस्थितांना शरद पवार यांनी संबोधित केले.

## राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षपदी नवाब मलिक



**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई विभागीय अध्यक्षपदी पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते नवाब मलिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी ही नियुक्ती जाहीर केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने आज नवाब मलिक यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

## राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्षपदी रुपाली चाकणकर



**मुंबई** - राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन महिला प्रदेशाध्यक्षपदी सौ. रूपाली चाकणकर यांची नेमणूक झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला. शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी रुपाली चाकणकर यांची महिला प्रदेशाध्यक्षा म्हणून नियुक्ती जाहीर केली होती. रुपाली चाकणकर यांनी मुंबई येथील प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्षा पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

# बुथ कसे मजबूत व ताकदवान होतील यावर मेहनत घ्या

**जयंत पाटील यांची सूचना**



**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेसचा बुथ कसा मजबूत होईल, ताकदवान होईल यावर प्रचंड मेहनत घ्या असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्रातील बुथ कार्यकर्त्यांसाठी वक्ता प्रशिक्षण शिबीर आज प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांच्या उपस्थितीत पार पडले. महाराष्ट्रात आपण जिथे निवडणूक लढवू तिथे बुथ कमिटीची सभा होईल असे सांगतानाच लवकरच पाटणला पहिली सभा होईल अशी माहितीही प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी दिली. राज्याच्या प्रश्नांवर बोला असे सांगताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कसे अपयशी झाले आहेत आणि त्यांचे अपयश कसे हे जनतेला कळवा असे आवाहनही प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी केले. प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांनी बुथ कार्यकर्त्यांची मते यावेळी जाणून घेतली. पक्षाची भूमिका लोकांपर्यंत पोहोचवा, राज्यसरकार ही केंद्रसरकारची झेरॉक्स कॉपी असुन केंद्रसरकार आपल्या पापांना पाठिशी घालते आहे तसेच राज्य सरकारही भ्रष्टाचारी आणि इतर चुकीच्या गोष्टींना पाठिशी घालतात असा आरोप आमदार हेमंत टकले यांनी केला. बुथ कार्यकर्त्यांची संवादाची भूमिका असायला हवी. सरकारचे चुकीचे धोरण जनतेला समजावून सांगा असेही आमदार हेमंत टकले म्हणाले. पाच वर्षात यांनी काही केले नाही.पण निवडणूका जिंकल्या.या निवडणुकीत साम दाम दंड भेद हे अस्त्र वापरून यांनी निवडणूका जिंकल्या. त्यामुळे सर्वांची अवस्था वाईट होईल त्याआधीच आपण कंबर कसली पाहिजे ही परिस्थिती लोकांसमोर मांडा असे आवाहनही आमदार हेमंत टकले यांनी यावेळी केले. या शिबीराला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील, पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार हेमंत टकले, प्रदेश सरचिटणीस बसवराज नागराळकर, वक्ता सेलचे अध्यक्ष प्रदीप सोळुंके, आयटी सेलचे अध्यक्ष सारंग पाटील, निरंजन टकले, सुधीर भोंगळे उपस्थित होते.



# राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मंत्रालयावर धडक...



# बेरोजगारी विरोधात राष्ट्रवादी युवक आक्रमक

**मुंबई** – बेरोजगारीच्या विरोधात आक्रमक झालेल्या राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आज मंत्रालयावर अचानक धडक देत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. राष्ट्रवादी युवकने अचानक केलेल्या आंदोलनामुळे पोलिसांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे पहायला मिळाले. सरकारने दरवर्षी २ कोटी रोजगारनिर्मिती करण्याचे दिलेले आश्वासन हवेतच विरले आहे. या फसव्या आश्वासनांचा निषेध करत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. राज्यातील तरुण वर्ग हवालदिल झाला असताना मुख्यमंत्री निवडणुक प्रचाराच्या यात्रा काढण्यात व्यस्त आहेत म्हणून सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करुन राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी सरकारच्या नाकर्तेपणाचा निषेध करत थेट मंत्रालयात धडक दिली आणि सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष रविकांत वर्पे, कार्याध्यक्ष सुरज चव्हाण आणि युवकचे इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



# सज्जनांची निष्क्रियता अधिक घातक

आपल्यापैकी बहुतेक जणांची दिवसाची सुरुवात होते ती सकाळचा पहिला चहा आणि त्याबरोबर हातात येणारी वर्तमानपत्रं, आज काल तर मोदी सरकारचा उदो उदो आणि फडणवीसांचा जयजयकार यांनी पेपरातील बहुतेक जागा व्यापलेली असते. त्याच्याबरोबरीने खून, दरोडे, महिलांवर अत्याचार, अपघात यांचाही रतीब नियमाने घातलेला असतो. खरं तर एक सामान्य वाचक म्हणून आपल्यावर त्याचा चांगला किंवा वाईट कुठलाच परिणाम होत नाही किंवा ह्यातली कोणतीही बातमी आपल्या मनाला चटकाही लावत नाही. मग जाहिरातदारांनी वर्तमान पत्रातील भली मोठी जागा वापरल्यानंतर जर काही जागा शिल्लक राहिली तर दोन चार ओळींच्या बातम्या छापलेल्या असतात. सहसा आपली नजरही त्यावर पडत नाही. चुकून जर त्यातली एखादी बातमी आपण वाचलीच तर घडलेल्या गोष्टींचा आपल्याशी काहीही सुतराम संबंध नाही म्हणून ती गोष्ट आपल्या स्मरणातून निघून जाते. परवा सहज पेपरमध्ये कुठल्यातरी मधल्या पानावर एक चार ओळीची बातमी मी वाचली. खरंतर मी सवयीप्रमाणे लगेचच ती नजरेसमोरुन घालवायला हवी होती. पण मनात उगाचच काही तरी बोच लागून राहिली आणि मी त्या बातमीत अडकून गेलो. काय होती ती बातमी ? आणि मी इतका बेचैन का झालो ? थांबा आता ती बातमी मी तुमच्यासाठी परत हयाठिकाणी सांगतो.


✲ सहाशे मनोरुग्ण तीन दिवस अंधारात येरवडा : येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील उच्च दाबाची वीजवाहिनी जळाल्याने महिला विभागातील वीजपुरवठा तीन दिवस खंडित झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळेवर दुरुस्ती न झाल्याने तीन दिवस सहाशे मनोरुग्ण महिलांना अंधारात रहाण्याची शिक्षा भोगावी लागली. यासंदर्भात रुग्णालय प्रशासन आणि पीडब्लूडी एकमेकांकडे बोट दाखवून जबाबदारी झटकत असल्याचे समोर आले आहे. सोमवारी रात्री उशिरा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. ही बातमी येरवडा पुणे येथील प्रादेशिक




मनोरुग्णालयाची आहे. मध्यंतरीच्या मोठ्या पावसात हया रुग्णालयातील महिला विभागाचा वीजपुरवठा तीन दिवस खंडीत झाला. मनोरुग्ण म्हणजे ज्याला सामान्यांच्या भाषेत वेडयांचे इस्पितळ म्हणतात ते. आणि अशा ६00 मनोरुग्ण महिला तीन दिवस अंधारात काढत होत्या. इस्पितळाचे प्रमुख आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम खाते एकमेकांवर जबाबदारी ढकलून मोकळे होत होते. कल्पना करा आपल्या घरात काही मिनिटांसाठी वीज गेली तर आपण किती अस्वस्थ होतो. शिवाय पत असेल तर बॅकअपसाठी जनरेटरही असतोच ना. मग हया ६00 निराधार महिलांना त्यातही मनोरुग्ण असलेल्यांना कोणी वालीच नाही. ही जबाबदारी कुणाची ? असल्या गलथान कारभाराबद्दल कुणाला तरी शिक्षा होईल का ? राज्याच्या मंत्र्यांना या गोष्टींकडे लक्ष द्यायला वेळ तरी आहे का? नुसतच आपल निवडणुकांच राजकारण पुढे रेटत जायच. राज्य कारभार कुणी करायचा ? हया सगळ्या संवेदना जेव्हा हरवून जातात तेव्हाच असे गलथान प्रशासन जनतेच्या डोक्यावर ठाण मांडून बसते.

खरं तर मला वाटत आता तुमच्या आमच्या अशा सामान्य माणसांनी हि हक्काची लढाई हातात घ्यायला हवी. निवडणुका जिंकता येतील पण 'लोक कल्याणकारी । राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची सध्याच्या कारभाऱ्यांकडे कुवतच नाही हे स्पष्टपणे दिसते. त्यामुळे त्या प्रसिद्ध वचनाची आठवण होते.

**दुर्जनांच्या वाढत्या प्रभावापुढे सज्जनांची निष्क्रियता अधिक घातक असते.**



## शेवटचे पान

